दिवाळी विशेषांक २०२६

नवा वास्तुविचार

संपादक
डॉ. विलास पवार



ओम पब्लिकेशन

स्वागत मूल्य :- २३०/-

With best compliments from



RV

CONSTRUCTION



606, 6th Floor, M Square IT Park, Road No 33 Ambica Nagar,Thane,
Kamgar Hospital Thane 400604

With best compliments from

Harsh®
Constructions Pvt. Ltd.




Managing Director
Vilas Birari

दिवाळी विशेषांक २०२६

नवा वास्तुविचार


-: संपादक :-
डॉ. विलास पवार



प्रकाशन
ओम पब्लिकेशन

ओम पब्लिकेशनने हा दिवाळी अंक प्रकाशक डॉ. विलास पवार यांनी, एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे फोन नं. ०२२- ६९३०९१९७ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केला. अंकात छापलेल्या मताशी संपादक संपूर्ण सहमत असतीलच असे नाही.

Email - info@ompublication.com, **Website :** www.ompublication.com



अंतरंग

लेख

१.अमूल्य वास्तूविचार....!- सुचित्रा कुंचमवार..... ०५
२.मैत्री- भूषण सहदेव तांबे ०९
३.चिऊताई चिऊताई अंगणात ये- माधुरी चौधरी..... १३
४.मराठी भाषा वृद्धिंगत करण्यासाठी उपाययोजना- भूषण सहदेव तांबे.... १९

कथा

५.दीपस्तंभ -वैभव धनावडे..... २३
६.कोड- संतराम पाटील..... २९
७.बक्षीस -साधना झोपे..... ४१
८.मुस्कं- संतराम पाटील..... ४५
९.इमानी - नेहा उजाळे..... ४९
१०.कर्जाचा दगड -निलेश बामणे..... ५३
११.सतीचं वाण- भारती सावंत..... ५९
१२.शाळा ते शाळाबाह्य... -अस्मिता सावंत..... ६५
१३.फटफजिती- भारती सावंत..... ६९
- काव्यसृष्टी..... ७३
- पाककृती..... ८१



संपादकीय...

वास्तूविचारासाठी सहवास आणि सोबत हवी

माणसाचे आयुष्य त्याचा आकृतीबंध काही वेळेला निश्चितच असतो. आपल्या मानवी आयुष्यात अन्न, वस्त्र, निवारा या तीन मूलभूत गरजा आहेत. या गरजांच्या पोटी मानव आयुष्यभर धडपड करत असतो. कदाचित प्रत्येकाच्या हृदयाची धडधड सुद्धा या सगळ्याशी संबंधित आहे. मानव जेव्हा गुहेत राहत होता तेव्हा तो आपल्या गुहेला सुशोभित करत होता. वेगवेगळी चित्र त्या गुहेतील दगडांवरती कोरत होता. समूहाने राहत होता. आता आपण घराचा रंग, पडदे आणि आकर्षक चित्र, वॉलपेपर, फर्निचर इत्यादींनी आपल्या वास्तूला शोभा आणण्याचा प्रयत्न करतो मग ती वास्तूआपल्या निवाऱ्याची असेल किंवा आपले कार्यस्थळ असेल. या सुशोभित करण्यासाठी फक्त एकाच व्यक्तीचा विचार असत नाही कदाचित सुरुवात एखाद्या व्यक्तीपासून होत असेल, परंतु विषय अस्तित्वात येईपर्यंत अनेक व्यक्ती अनेक विचार त्यांच्यासोबत आलेले असतात. म्हणजे इमारत बांधणे, त्याचे आर्किटेक्चर करणे, रंग लावणे, प्लंबिंग करणे, इलेक्ट्रिक जोडणी करणे, फर्निचर, इंटेरियर, डेकोरेटर आणि मग त्या वास्तुपूजन करण्यासाठी लागणारे गुरुजी आणि मग सगळ्यांना खाऊ -जेऊ घालण्याकरता कॅटरर्स हे सर्व एकत्रित आल्याने वास्त- निर्मिती होते आणि वास्तूच्या सहवासाला सुरुवात होते. माणसांच्या बरोबर त्या वास्तूत आवडत्या प्राण्यांची सुद्धा सोबत सुरू होते.


वास्तू म्हटल्यावर एकटी व्यक्ती संबंधित राहू शकत नाही. वास्तू विचार म्हटलं तर आपल्याला मानवी विचारांशी संबंधित सगळ्यांना सोबत घेऊनच. नातेसंबंध तुटले तरी सोबत प्राणी असतात. कधी कधी त्या वास्तूत सहवास केलेल्या व्यक्तीच्या आठवणी असतात आणि त्या आठवणी सुद्धा सुखद, दुःखत आणि काही वेळेला संमिश्र असतात परंतु वास्तूच्या अवतीभवती मानवी आयुष्य गुंफलेले आहे. त्यामुळे वास्तूचे सुशोभन करणे, वास्तूंमध्ये परस्पर नातेसंबंध सदृढ ठेवणे. मैत्रिणी आणि मित्रमंडळी यांच्ये वेळोवेळी संमेलन घडून आणणे. वास्तूमध्ये सण आणि उत्सव, उत्साहाने साजरे करणे आणि आपल्या बाबतीत आलेल्या अडचणी या निराकरण होण्यासाठीच आहेत असा विचार करून वास्तूचा उपभोग घेणे म्हणजे खऱ्या अर्थाने वास्तूविचार आहे.

दिवाळीचा सण हा वास्तू उजळून टाकतो. आपल्या आजूबाजूच्या संबंधित जवळीक घडून आणतो. एकत्रित सण उत्सव साजरे केल्याने सणाचा आनंद द्विगुणीत होतो. चला तर मग आनंद, उल्हास आणि तिमिरातून प्रकाशाकडे नेणारा दिवाळीचा सण उत्साहात साजरा करू या.

दिवाळीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा !







www.tjsb.bank.in | Toll Free: 1800 266 3466 | 1800 103 466

अमूल्य वास्तूविचार


- सुचित्रा कुंचमवार

घर बांधताना इमारतीमध्ये खोल्यांचे दरवाजे,स्वयंपाकघर, शौचालय,बैठक,शयनकक्ष, मुलांची अभ्यासाची जागा, त्यांची खोली,देवघर हे सर्व कोणत्या दिशेला असावेत याचे परिपूर्ण मार्गदर्शन वास्तूशास्त्रांनुसार करणे महत्त्वपूर्ण आहे.

निसर्गनियम आणि वास्तुशास्त्र यांचा एकमेकांशी अनादिकाळापासून संबंध आहे.आज विज्ञान कितीही प्रगत झालेले असले तरी पूर्वापार चालत आलेल्या काही रूढी,प्रथा,परंपरा, दाखले यांना दुर्लक्षित करून चालणार नाही,निसर्गनियम आणि चेतन अचेतन उर्जेचा मानवी जीवनावर त्याच्या राहणीमानात बदल घडवून आणण्याची ताकद ठेवतात.

आजच्या धावपळीच्या युगात आधुनिक साम्रगी, साधनांनी घर बांधले पण त्यात जर काही वास्तुदोष असतील तर ते घर घरमालकांसाठी परिपूर्ण नाही असेच म्हणता येईल चुकीच्या पद्धतीने बांधलेली वास्तू सौख्य मिळवून न देता त्या घरात राहणाऱ्यांसाठी अपायकारक ठरू शकते याची अनेक उदाहरणे आपल्या आसपास आढळून येतात. वास्तुशास्त्रकार यांच्या मदतीने त्यांनी सांगितलेल्या काही उपायांचा अवलंब केल्यास यांत चांगले अनुभव आपणास दिसून येतात हे देखील आपण पाहिलेले असेल.... ! शेवटी काय कोणत्याही गोष्टींवर आपण किती विश्वास ठेवतो यांवर कोणतेही शास्त्र अवलंबून असते. वास्तुशास्त्र हे देखील इतर शास्त्रांप्रमाणेच एक परिपूर्ण शास्त्र आहे हे जगमान्य आहे.आपल्या पूर्वजांनी अनेक ग्रंथातून याची शास्त्रोक्त माहिती लिहून ठेवली आहे.त्यांचा अभ्यास आजच्या पिढीला मौलीक माहिती मिळवून देत आहे. सध्याच्या धावपळीच्या युगात आपले आपले घर कितीही आरामदायक, सुखसोयींनी व आपल्याला हवे तसे असले तरीही त्या वास्तूमध्ये मनःशांती मिळत नसेल तर ते घर राहणाऱ्यांसाठी निश्चितच फायदेशीर नाही.वास्तूमध्ये होणारे संघर्ष,दुःख वारंवार येणारे अपयश काही अंशी वास्तूदोषामुळे घडत असतात. अशा वास्तूमध्ये वास्तुदोषांवरील

योग्य उपाय करण्याने त्यात निश्चित बदल घडून येतात व जीवन सुखकर होण्यास मदत मिळते. वास्तूमध्ये 'वास्तुअष्टक' चक्राचे पालन केल्यास ती वास्तू वास्तूदोष विरहित होते आणि त्यात राहणाऱ्या व्यक्तीचे जीवन सुख समृद्धी आणि धनसंपत्तीने भरभराटीचे होते. हे वास्तुशास्त्राचा अभ्यास केल्यावर प्रथमतःच जाणवायला लागतो. वास्तुशास्त्रात ब्रम्हांडातील अष्टदिशा लक्षात घेऊन सूर्यकिरणांचा त्या दिशांवर काय परिणाम होतो त्यानुसार हे 'अष्टचक्र' बनवले गेले आहे. अग्नी,वायू,जल या तीन बाबींना वास्तूमध्ये महत्वाचे स्थान आहे. या तिन्ही पैकी एक जरी,ज्या दिशेला त्याचे वास्तव्य असावे पण तिथे दुसरेच काही म्हणजे...जिथे अग्नी म्हणजेच स्वयंपाकघर हवे त्याऐवजी तिथे जल म्हणजेच बेसीन नळ किंवा तत्सम जलमय साठा असेल तर त्याचे विपरित परिणाम त्या वास्तुत घडत असतात. अशावेळेस बांधलेले घर न पडता वास्तुशास्त्रज्ञ सांगतात त्याप्रमाणे काही फेरबदल केले तर अधिक नुकसान आपण काही अंशी कमी करू शकतो. पंचतत्त्वांना योग्य ते स्थान देऊन अशी वास्तू दोषविरहित परिपूर्ण वास्तू बांधल्यास उत्तम मनःशांती मिळते. वास्तुशास्त्र हे पंचमहाभुतांशी घनिष्ठ संबंध बाळगून आहे हे विसरता कामा नये.



वास्तूशास्त्राच्या दृष्टीकोनातून नक्षत्रे, दिशा, विधी, स्थान, पंचमहाभूते यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे, मुळात ते वरील बाबींवरच आधारित आहे. सुखी आणि समाधानी जीवन जगावयाचे असेल तर प्रत्येक मनुष्याने आपल्या घराची रचना वास्तुशास्त्राप्रमाणे करून घ्यावी किंवा निवडावी,जेणेकरून पुढे होणारा त्रास टाळता येईल.

घर बांधताना इमारतीमध्ये खोल्यांचे दरवाजे, स्वयंपाकघर, शौचालय, बैठक, शयनकक्ष, मुलांची अभ्यासाची जागा, त्यांची खोली, देवघर हे सर्व कोणत्या दिशेला असावेत याचे परिपूर्ण मार्गदर्शन वास्तूशास्त्रांनुसार करणे महत्त्वपूर्ण आहे. स्कंदपुराण, गरुडपुराण, अग्नीपुराण, नारदपुराण, वायुपुराण, बृहत

संहिता, मत्स्यपुराण, भविष्यपुराण या पुराणामध्ये वास्तुशास्त्रासंबंधीत परिपूर्ण माहिती दिलेली आहे. वास्तुशास्त्राचे प्राचीन विज्ञान परिपूर्ण आहे,पण आपण तथाकथित आधुनिकतेच्या सावटाखाली आहोत.वास्तुशास्त्राबरोबरच इतरही अनेक वास्तू विषयक बाबींचे प्रकार प्रचलित आहेत.नेमके कोणते शास्त्र अवलंबावे अशा संभ्रमात असल्यामुळे हे पौराणिक बहूमूल्य ज्ञान आत्मसात करण्यास अपूर्ण ठरत आहेत. मानवाने वास्तुशास्त्र ज्ञानाच्या पूर्णत्वाकडे जाण्यास व त्यांवर विश्वास ठेवून ते ज्ञान ग्रहण करून अंमलात आणल्यास नक्कीच फायदेशीर राहता येईल.पण त्यासाठी त्या शास्त्रावर दृढ विश्वास असणे गरजेचे आहे.संपूर्ण वास्तुशास्त्राचा यथासांग अभ्यास केल्यास वास्तुशास्त्राची महती पटल्या– शिवाय मात्र राहत नाही हे देखील अमान्य करता येणार नाही.

आरसा

१)आरशाचा विचार केला तर आपल्या घरात आरसा कुठेही लावला नाही पाहिजे. जर आरसा असेल तर त्याला पडदा लावला पाहिजे, कारण आरशात नेहमी बाहेरची प्रतिबिंबं पडतच असतात, आणि ती प्रतिबिंबं पॉझिटिव्ह व निगेटिव्ह असू शकतात.

२)ज्या ठिकाणी तुम्ही आरसा लावला असेल तेथे त्या आरशातून बघणे, की बाहेरचं प्रतिबिंब पडतं का नाही, जर पडत असेल तर तेथून आरसा काढून टाकणे.

३)आरसा हा नेहमी बंद असावा, कारण तो जर ओपन असेल तर सर्व प्रतिबिंबे तो खेचत असतो, तेही डबल वेगाने आपल्यावर टाकत असतो.

४)आरशाचा महत्त्वाचा गुणधर्म आहे की आलेली वस्तू फेकून देणे, हे त्याचं कामच आहे आणि म्हणून आरसा नको, कारण आरसा खूप निगेटिव्ह आहे.

५)आरशाला भारतीय वास्तुशास्त्रात प्रवेश नाही.

टीप्स

कपड्यांवरील बुरशीचे डाग काढण्यासाठी

तुमच्याही कपड्यांवर ओलाव्यामुळे बुरशीचे डाग लागले असतील तर काळजी करू नका. कारण काही सोप्या टीप्स वापरून तुम्ही घरीच हे डाग काढून टाकू शकता.

लिंबू आणि मिठाचा करा वापर

स्वच्छतेसाठी लिंबू नेहमीच वरदान ठरतो. कारण लिंबामध्ये क्लिंझिंग इफेक्ट्स असतात. एखादा कठीण डाग काढण्यासाठी तुम्ही लिंबाचा नक्कीच वापर करू शकता. यासाठी लिंबाचा रस आणि मीठ एकत्र करा, फंगस लागलेल्या ठिकाणी लिंबाचे मिश्रण काही वेळ लावून ठेवा. रगडून तो डाग काढा आणि कोमट पाण्याने कापड धुऊन टाका.

कोमट पाण्यात कपडे धुवा

पावसाळ्यात जर तुम्हाला कपड्यांना फंगसचे डाग लागू नये असं वाटत असेल तर कोमट पाण्याने कपडे धुवा. आजकाल वॉशिंग मशीनमध्येही हे फंक्शन असतं. शिवाय असं केल्याने तुमचे कपडे डिसइंफेक्टदेखील होतात. कारण कोमट पाण्यात जीवजंतू नष्ट होतात.

बेकिंग सोडा वापरा

फंगसचे डाग कपड्यांवरून काढण्याचा सोपा मार्ग म्हणजे बेकिंग सोडा वापरणे. यासाठी फंगस लागलेल्या डागाकडील भाग भिजवा आणि त्यावर बेकिंग सोडा लावा. अर्ध्या तासाने ते कापड ब्रशने घासून स्वच्छ करा आणि कोमट पाण्यात विसळा.

बोरेक्स पावडर वापरा


बोरेक्स पावडर हे असं एक केमिकल आहे, ज्यामुळे कपड्यांवरील फंगसचे डाग निघून जातात. यासाठी कपडे धुताना तुमच्या डिटर्जेंटसोबत या पावडरचा वापर करा.

चिंतामणी ज्वेलर्स

तर्फे

दिवाळीच्या आणि

पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा



डायमंड
ज्वेलरी
मजुरीवर
100% डिस्काउंट

मराठमोळा
साजश्रृंगार

सोन्याचे
दागिने
घडणावळीवर
25% डिस्काउंट

नातं विश्वासाचं...

चिंतामणी

ज्वेलर्स (इंडिया) प्रा. लि.

ठाणे • डोंबिवली

ठाणे: जांभळी नाका, ठाणे (प) 022 2543 2241 / 42 / 43

डोंबिवली: फडके रोड, डोंबिवली (पू) 0251 2470 117 / 18 / 19 / 10

With best compliments from

M/s. Sanjay Madgulkar

Govt. Registered Contractor, Thane



मैत्री

-भूषण सहदेव तांबे

इंग्रजी दिनदर्शिकेप्रमाणे प्रत्येक वर्षाच्या ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी आंतरराष्ट्रीय मैत्रीदिन सर्व जगात उत्साहात आणि आनंदात साजरा केला जातो. हा विशेष दिन संपूर्ण भारतात देखील अगदी उत्साहात साजरा केला जातो.

एक अनमोल नातं मैत्री हे असं एक नातं आहे जे आपल्या कुटुंबातील आई, वडील, भाऊ, बहीण यांच्या सारखंच अगदी जवळच नातं असतं. किंबहुना काहींच्या बाबतीत तर मैत्री हे प्रथम प्राधान्य गृहीत नातं असतं. म्हणजेचं काही व्यक्तींसाठी मैत्री हे सर्वांत महत्त्वाचं नातं असतं त्यांच्या आयुष्यात. त्यांच्या आयुष्यातले सुख, दुःख, प्रसंग, संकट, आनंदी क्षण हे सर्वात प्रथम ते त्यांच्या जिवलग मित्रांशी सामायिक करतात आणि त्यावर त्यांच्या अभिप्रायचा विचार करतात. हे असे का..? त्या मागचं कारण काय...? त्याच उत्तर हेच आहे की, कधीकधी काही मुलांच त्यांच्या आई वडिलांशी पटत नाही. त्या दोघांमध्ये संवाद फार कमी प्रमाणात असतो किंवा काही मुलांचे आई-वडील त्यांच्या मुलांना अपेक्षाप्रमाणे तेवढ्या प्रमाणात समजून घेत नाहीत. मुलांचे आणि आई-वडिलांचे विचार एकसमान नसून, भिन्न भिन्न असतात आणि याच गोष्टी त्यांच्या भावंडांबाबत देखील समान असतात. अशावेळी काही मुलं आपल्या स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तींना प्राधान्य न देता आपल्या जवळच्या आणि जिवलग मित्रांना प्रथम प्राधान्य देतात त्यांच्या आयुष्यात.

मैत्री म्हणजे प्रेम
मैत्री म्हणजे जिव्हाळा,
अनमोल हे ऋणानुबंध
हर्षोत्सवाचा सोहळा.!

अगदी बालवाडीतल्या बालपणीच्या मैत्रिपासून जो प्रवास सुरू होतो तो थेट म्हातारपणापर्यंत असतो तो खरा मैत्रीपूर्ण प्रवास. या जगात असेल अनेक लोकं असतात की त्यांनी त्यांच्या आयुष्यात हा असा सुखद प्रवास अनुभवलेला असतो. म्हणून त्यांना काही लोकं राम-शाम, सीता-गिता, करण-अर्जुन,

चंदू-बंदू अशापण नावाने संबोधितात. आयुष्यातल्या प्रत्येक निर्णयात जो आपल्या सोबत असतो. सकाळ झाल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत असा कोणता क्षण नसेल ज्या क्षणी बोलणं झालं नसेल. सुप्रभात पासून ते शुभ रात्री पर्यंतचा संदेश ज्याच्या मोबाईलवर दैनंदिन पाठविला जातो. आपल्या भूतकाळ ज्याला माहीत असतो, आपल्या वर्तमानकाळात जो नेहमी आपल्या सोबत असतो आणि आपल्या भविष्यकाळासाठी जो मार्गदर्शन करतो. अशा सर्व मित्रांच्या आठवणींसाठी आणि त्याच्या मैत्री योगदानासाठी 'मैत्री दिनाच्या' हार्दिक शुभेच्छा...!

मैत्री अशी असावी की
जीवापाड जपणारी,
कितीही वाद झाला
तरी कधीच न तुटणारी.!

इंग्रजी दिनदर्शिकेप्रमाणे प्रत्येक वर्षाच्या ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या रविवारी आंतरराष्ट्रीय मैत्रीदिन सर्व जगात उत्साहात आणि आनंदात साजरा केला जातो. हा विशेष दिन संपूर्ण भारतात देखील अगदी उत्साहात साजरा केला जातो. शाळा, क्लासेस, विद्यालय, महाविद्यालय, कार्यालय, आणि इतर संस्थांमध्ये देखील साजरा केला जातो. या मैत्री दिनानिमित्त विशेष सांस्कृतिक आणि कलामनोरंजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. त्यास सर्व स्तरावरील मंडळी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवतात आणि राबविलेल्या उपक्रमाच्या आयोजनाला सहकार्य करतात. आयुष्यातला प्रत्येक क्षण




आनंदाने जगा, आयुष्यातल्या प्रत्येक संकटाला धैर्याने सामोरे जा, आयुष्यात दुखाचे भांडवल करू नका, आयुष्यात स्वतःला कधीच कमी लेखू नका, आयुष्यात नेहमी पुढेच जात रहा या सर्व गोष्टी आपल्याला फक्त आणि फक्त एखादी मैत्रीचं शिकवू शकते.

तदितर खग भेणे वेगळाले पळाले ।
उपवन–जल–केली जे कराया मिळाले ?
स्वजन गवसला जो, त्याजपाशी नसे तो ।
कठिण समय येता कोण कामास येतो ?

जेव्हा नलराजाने एका राजहंसाला पकडले, तेव्हा तो हंस भीतीने नलाला म्हणाला की, बागेत पाण्यामध्ये एकत्र क्रिडा करणारे इतर पक्षी संकट आल्यावर भ्याडपणे पळून गेले. ज्यांना आपले स्वजन किंवा सोबती समजले, ते संकटाच्या वेळी जवळ नसतात. पण, मैत्री त्याला अपवाद आहे. आपण जेव्हा एखाद्या संकटात असतो तेव्हा सर्वांत प्रथम धावून येणारी व्यक्ती म्हणजे आपला मित्र असतो. सुखाच्या काळात किंवा आनंदाच्या प्रसंगी शेकडो लोक सोबत असतात; परंतु जेव्हा खरी कठीण वेळ किंवा संकट येते, तेव्हा फक्त आपले मित्रच मदतीला येत असतात.

एक जिवलग मित्र असावा
ही प्रत्येकाची असते इच्छा,
सर्वांनी अनुभवाव हे नातं
मैत्री दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.!





टॉयलेट व बाथरूम

टीप्स

१)आंघोळ करताना चेहरा नेहमी उत्तरेला जाईल असे बसावे.

२)टॉयलेटला गेल्यावर चेहरा उत्तरेला गेला पाहिजे तसा Pot बसवावा.

३) जर उत्तर नाहीच मिळाली तर पूर्व दिशा.

४) टॉयलेट व बाथरूमच्या दरवाजावर नॉर्मल डिझाईन ठेवावी, चित्राचं combination करू नये.

उदा, जर आग्नेयला टॉयलेट आहे तर चित्र जर पाण्याचं लावलं तर अजून भडका होईल, त्याचा त्रास जीवनावर होतो.

५) म्हणून कलर, चित्र कसेही ठेवू नये. टॉयलेट पश्चिम वायव्येला तोंड (कचराकुंडी या भागात) ईशान्येला टॉयलेट नको. उत्तर-पूर्वला बाथरूम चालेल.

आपल्या घराची कचराकुंडी

१) दिवसभराचा कचरा जो आहे, तो पश्चिम व वायव्येच्या भागात ठेवावा.

२) कचरा अखंड २४ तास घराबाहेर ठेवावा म्हणजे पश्चिम किंवा वायव्येला पॅकबंद ठेवावा.

३) किचनच्या पश्चिम व वायव्य भागात आपल्या घरातील कचराकुंडी ठेवावी.

४) जर आपल्या घरातील एखादी वस्तू लवकरात लवकर जावी असं एखाद्याला वाटत असेल तर त्याने ती वस्तू संपूर्ण घराच्या वायव्य भागात ठेवावी. म्हणजे ती वस्तू हळूहळू बाहेर जाईल.





With best compliments from



Sneha Tavde
Akash Gopal
Vishal Jadhav


Contractor
PWD Thane



With best compliments from







Mangesh Awale
Raju Sheth
Hansraj Ahirrao
Chetan Shinde

Contractor
PWD Thane



चिऊताई चिऊताई अंगणात ये

- माधुरी चौधरी

आई– हो ना जंगले, झुडुपे, आणि आर्द्रभूमी नष्ट झाली त्यामुळे पक्ष्यांना आश्रय मिळत नाही. वातावरणातील प्रदूषण, ज्यामुळे पक्ष्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होतो.

आई– ऋचा अगं काय चाललंय तुझं? त्या गॅलरीत काय करतेय केव्हाची?

ऋचा– आई जरा थांब गं. मला माझं काम करू दे गं.

आई– अगं पण असं काय काम करतेय केव्हापासून?

ऋचा– अगं आज आमच्या बाईंनी चिऊताई चिऊताई अंगणात ये हा प्रोजेक्ट दिलाय करायला तो करतेय.

आई– हा ग कसला प्रोजेक्ट?

ऋचा–खूप छान प्रोजेक्ट आहे बघ. खूप मजा येणार आहे आम्हाला सगळ्यांना.

आई –हो का मलाही सांग बरं.

ऋचा– आज ना आमच्या मॅडम विज्ञान विषय शिकवताना पक्ष्यांविषयी माहिती सांगत होत्या. पण आम्ही बरेच पक्षी तर पाहिलेलेच नाही. मग मॅडमनी आम्हाला हा प्रोजेक्ट दिला आणि तुला माहितीये का हा संपूर्ण वर्षभर चालणार आहे. खूप मजा येईल.

आई–अच्छा असे आहे तर.... चल मीपण मदत करेल तुला. सांग काय करायचे?

ऋचा– काही नाही अगदी सोपं. आपली ही गॅलरी झाडांनी हिरवीगार करायची. मग पक्षांसाठी पाणी आणि दाणे ठेवायचे बस.

आई– अच्छा म्हणजे अशाप्रकारे तू चिऊताई अंगणात बोलाविणार आहे तर...

ऋचा – हो ना आणि कोणकोणते पक्षी कधी व किती येतात याची नोंद ही करणार आहे मी.

आई– ऋचा यालाच 'पक्षी संवर्धन' असेही म्हणतात बघ.

ऋचा – हो हो हेच म्हणत होत्या बाई. पण आई 'पक्षी संवर्धन' म्हणजे नक्की काय गं?

आई– ऋचा अगदी सोप्या भाषेमध्ये सांगायचे तर 'पक्षी संवर्धन' म्हणजे पक्ष्यांच्या अस्तित्वाचे रक्षण आणि त्यांच्या वातावरणाचे संरक्षण करणे.

ऋचा– पण हे करायची काय ग गरज? पक्षी आपलं बघून घेतील की.....



आई (हसून)- ऋचा अगं ते काय बघतील राजा. आपणचं तर त्यांची घरं नष्ट केली ना. झाडे जंगल तोडून.... त्यामुळे त्यांचा अधिवास नष्ट झाला. त्यांना रहायला घर नाही, खायला अन्न नाही मग हळूहळू त्यांची संख्या कमी होत चालली. आतातर बरेच पक्षी दिसतपण नाहीत.....

ऋचा– आई दिसतात की पक्षी आपण कुठे बाहेर फिरायला गेलो की....

आई– अगं वेडी पण त्यासाठी गावाच्या बाहेर जावे लागते ना? आणि आता तर तिथेही जास्त दिसत नाही. तुला एक गंमत सांगते....

ऋचा– गंमत वा वा सांग ना आई.

आई– आमच्या ना लहानपणी अशा फार मोठ्या मोठ्या इमारती नव्हत्या. गावामध्ये सुध्दा भरपूर झाडे असायची. मग आम्ही मुलं संध्याकाळी त्या झाडाखाली बसायचो. रात्री तर मस्तपैकी गच्चीवर झोपायचो. संध्याकाळ झाली की पक्षी झाडावर यायचे आणि एकदोन नव्हे हं अगदी थवेच्या थवे... पोपट, बगळे, चिमण्या, कावळे,कबुतर असे पक्षी बसायचे... बगळे बसले की संपूर्ण झांज पांढरं दिसायचं. उडणारे पक्षी बघण्याची मजा तर काही औरच होती बघ...

ऋचा– अरे वाह किती मजा ना.....

आई– हो ना. अगं रात्रीची त्यांचीही झोपायची लगबग आणि सकाळी सकाळी तर त्यांच्याच चिवचिवाटान जाग यायची. पक्ष्यांचा आवाज ऐकला की सकाळ प्रसन्न व्हायची. चिमण्या, कावळे, खारूताई, कबुतरं दारात खेळायची, पाण्यात डुंबायची, लहान मुले एक घास

काऊचा, एक घास चिऊचा करत जेवण करायची...

ऋचा– आई किती मज्जा येत असेल ना तेव्हा.... आणि आता तर आम्हाला पक्षीच बघायला मिळत नाही बघ....

आई– वातावरण बदल, जंगलतोड, शिकार, आणि प्रदूषण ही काही प्रमुख कारणे आहेत ज्यामुळे पक्ष्यांची संख्या कमी झाली आहे.

ऋचा– हो ना आमच्या बाई पण हेच सांगत होत्या. त्या म्हणाल्या की आजकाल चिमण्यांची संख्या खूप कमी झाली आहे. चिमण्यांना घरात किंवा जवळपास झुडुपे, झाडे हवी असतात, पण आता त्या जागा नष्ट होत आहेत हवेचे आणि ध्वनीचे प्रदूषण चिमण्यांना त्रास देते. त्यांना खायला दाणे आणि कीटक मिळत नाहीत. यामुळेच तर चिमण्यांच्या प्रजनन आणि वसतीवर परिणाम होतो.म्हणून आजकाल चिमण्या दिसत देखील नाहीत.

आई– हो ना जंगले, झुडुपे, आणि आर्द्रभूमी नष्ट झाली त्यामुळे पक्ष्यांना आश्रय मिळत नाही. वातावरणातील प्रदूषण, ज्यामुळे पक्ष्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होतो. रासायनिक पदार्थांचा वापर, ज्यामुळे पक्ष्यांच्या आहारावर परिणाम होतो. विजेच्या तारा आणि पवनचक्क्या, ज्यामुळे पक्ष्यांना धडक बसते आणि ते मरतात. अशी अनेक कारणे आहेत.

ऋचा– बापरे... पण आई मला एक कळत नाही आम्ही असं थोडंसं दाणा पाणी ठेवून काय उपयोग होणार गं... उगाच वाया नाही का जाणार ते?

आई– अगं ऋचा अजूनही पक्षी आहेतच



की; त्यांची संख्या कमी झाली आहे हे मात्र खरे. पण जे काही शिल्लक आहेत त्यांची मात्र आपण काळजी घ्यायला हवी ना ग. आता उन्हाळा सुरू होतोय. पाण्याचे साठे कोरडे पडतात, खायला काही मिळत नाही मग हे पक्षी उन्हात तडफडून

मरण पावतात. पाणी न मिळाल्याने पक्ष्यांना खूप त्रास होतो. त्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होतो. पक्षी निर्जलीत होतात आणि मरतात. पाण्याअभावी पक्ष्यांचे प्रजनन कमी होते, ज्यामुळे त्यांची संख्या कमी होते.,ज्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडते. आपण प्रत्येकाने जर असं गॅलरीत, घरासमोर झाडांखाली, झाडांवर जिथे शक्य असेल तिथे पाण्याची सोय केली खायला थोडे दाणे ठेवले तर हेच पक्षी आनंदाने चिवचिवाट करतील.तेवढाच आपला निसर्ग संवर्धनाला हातभार. नाही का!

ऋचा– अच्छा म्हणूनच तू इथं तुळशी जवळ या वाडग्यात पाणी भरून ठेवतेस, थोडे तांदूळ पसरून ठेवते तर.... आता मी पण ठेवत जाणार ...

आई– चांगलेच की. आपण आजच बाजारात जाऊन छानपैकी काही गॅलरीत ठेवण्यासाठी मोठी झाडे आणू या.

ऋचा– आई बाजारात छानपैकी कृत्रिम घरटी, पाणी ठेवायची भांडी ही मिळतात असं बाई सांगत होत्या. मला घेऊन देशील का?

आई– देईल की. पण एका अटीवर.... तू रोज जातीने हे सर्व करायचं बरं का... नाही तर दोन दिवसांचा उत्साह राहील फक्त.

ऋचा– नाही हं मीच करणार आहे सगळं आणि बाईंनी सांगितलं तसं नोंदही ठेवणार आहे बरं... आमच्या मॅडम सांगत होत्या की, यासाठी सरकारने कायदे पण केलेले आहेत मला 'पक्षी संवर्धन' सरकारी कायद्याबद्दल अधिक माहिती हवीं आहे. तुला माहिती आहे का?

आई–भारतीय सरकारने वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ पारित केला आहे, जो पक्ष्यांसह वन्यजीवांच्या संरक्षणासाठी आहे. यामध्ये अधिनियम शिकार, पकडणे, मारणे किंवा पक्ष्यांना इजा पोहोचवणे प्रतिबंधित करते, पक्षी व प्राणी यांच्या साठी राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये आणि संरक्षण राखीव क्षेत्रे स्थापन केली जातात कायद्याचे उल्लंघन केल्यास ७ वर्षांपर्यंत शिक्षाही होऊ शकते.

ऋचा– बापरे... तरीपण लोक शिकार करतात.

आई– बघ की काही लोक शिकार करतात तर काही लोक पक्षी व प्राणी संवर्धनासाठी प्रयत्नही करतात.

ऋचा– जसं आता आम्ही करतोय तसे ना?

आई – हो पण अजूनही बरेच मार्ग आहेत पक्ष्यांच्या संरक्षणासाठी काम करणे हे खूप महत्वाचे आहे .जसे की पक्ष्यांचे वसतिस्थान संरक्षित करणे आणि त्यांचे संवर्धन करणे. पक्ष्यांच्या संरक्षणाबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि शिक्षण देणे.पक्ष्यांच्या व्यवहार आणि वातावरणाबद्दल संशोधन करणे. सरकारी योजना व कायद्यांबद्दल माहिती देणे आणि त्यांचे पालन करणे.अजून बरेच काही....

ऋचा–सर्वांनी हे केलं तर चिऊताई अंगणात येईल का ग... मलाही चिऊताई सोबत खेळायचे आहे....

आई– हो ना.. मग मी टाकलेले दाणे टिपायला रोज दोन चिमण्या येतात. तू पण त्यांच्याशी मैत्री कर.

ऋचा– ते तर मी करणारच.पण इतर पक्ष्यांना आकर्षित करण्यासाठी ही प्रयत्न करणार. आई तू मला मदत करशील ना?

आई– अगदीच.

ऋचा– मग उद्या पासून 'चिऊताई चिऊताई अंगणात ये' मिशन सुरू...आई– अगदीच. तुला यासाठी खूप खूप शुभेच्छाआणि हो मी सोबत आहेच की..

ऋचा– लव्ह यू आई

आई– लव्ह यू बेटा

वास्तुटीप्स

१.आरोग्यदायी जीवनासाठी झोपताना पूर्वेला व दक्षिणेला पाय करून झोपू नये . आपण कुठे व कसे झोपतो यावर आपले आरोग्य अवलंबून असते.

२.उत्तम आरोग्यासाठी उत्तर दिशेला पाय करून झोपावे. म्हणजे आर्थिक, मानसिक, शारीरिक प्रगती चांगली होते.

३.आजार बरे होत नसतील तर झोपण्याची जागा बदलून पाहा. म्हणजे आजार लवकरात लवकर बरा होईल.

४.बेड समोर आरसा अथवा आरशाचे कपाट येऊ देऊ नये. त्यामुळे शरीरातील ऊर्जेची हानी होते व

किचन टीप्स

१.साखर मुंग्यांपासून सुरक्षित ठेवण्याकरिता साखरेच्या डब्यात वरच ४-५ लवंग ठेवाव्यात.

२.सुखे खोबरे तूरडाळीत खुपसून ठेवले तर खराब होत नाही.

३.रस्सा भाज्या खारट झाल्यास त्यात उकडलेला बटाटा घालावा,खारटपणा कमी होतो.

४.लिम्बाचा रस जास्त हवा असल्यास पाच-दहा मिनिटे लिम्बू कोमट पाण्यात भिजवून मगच रस काढावा, रस जास्त निघतो.

५.कोणताही पुलाव किंवा मसालेभात करताना तांदूळ १-२ तास पाण्यात भिजवून ठेवला तर साध्या तांदळचा पण दाणा वेगळा आणि मोठा होतो.

६.बटाटे झटपट उकळण्याकरिता पाण्यात चिमटीभर हळद घालावी.

७.हिंगाचा वास टिकविण्यासाठी हिंग तुरीच्या डाळीच्या डब्यात ठेवावा.

८.डाळ किंवा तांदूळाला कीड लागण्यापासून जपण्याकरिता त्यात कडूलिंबाचा पाला घालावा.

९.दुधाला वीरजण लावताना आतून थोडीशी तुरटी फिरवावी.दही घट्ट होते.

१०.भाज्यांमध्ये मीठ शेवटी घातल्यास भाजीतले लोह (iron) टिकण्यास मदत होते.

११.भेंडीची भाजी शिजवताना त्यात दोन चमचे दही घातले तर ती चिकट होत नाही.

१२.पुरयांच्या कणकेत चिमटीभर साखर घातली तर पुरया बराच वेळ फुगलेल्या राहतात.

१३.छोले रात्री भिजवताना त्यात मूठभर हरभरा डाळही भिजवावी, त्याने छोले छान रस्सादार आणि दाट होतात.

१४.कटयावर लिम्बाच्या रसाचे पांढरे डाग पडल्यास त्यावर आल्याचा तुकडा घासावा, डाग जातात.

१५.कढीलिंब एकदम बराच आणल्यास शिल्लक राहिला की सुकतो. अशा कढीलिम्बाची पाने तेलात तळून, डब्यात भरून ठेवावीत. त्याचा हिरवा रंग कायम राहतो व ते बराच दिवस टिकतात.

१६.गाजर, टमाटर, काकडी, बीट, मुळा मऊ किंवा शिळा झाल्यास रात्रभर मिठाच्या पाण्यात घालून ठेवा. ताज्या व टवटवीत होतात.

१७.कच्ची केळी दीर्घ काळ ताजी राहण्याकरिता थंड पाण्यानी भरलेल्या पातेल्यात ठेवावी. साधारण १ आठवड्या पर्यन्त केळी टवटवीत राहतात. हे पाणी २ दिवसांत एकदा बदलावे.

१८.पालेभाज्या शिळ्या सुकलेल्या असल्यास पाण्यात १ चमचा विनेगार किंवा लिम्बुरस घालून ठेवल्या तर ताज्या होतात.

१९.शेंगदाणे भाजून झाल्यावर त्यात २ चिमटी मीठ टाकावे आणि गॅस बंद करून थोडे परतावे. त्याने सालं लवकर सुटतात.




With best compliments from

Harsh construction
Shraddha construction
Mahindra



Contractor - PWD Thane

With best compliment from



2 & 3 BHK Luxury Balcony Homes starting 1.52 Cr++

मराठी भाषा वृद्धिंगत करण्यासाठी उपाययोजना

-भूषण सहदेव तांबे

सध्याचा काळ हा बदलत चाललेला नवीन काळ आहे. आपण सर्वजण एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करत असताना, विज्ञानवादी दृष्टिकोन मनात ठेवून आधुनिक संस्कृती जोपासत असतो.

मराठी भाषा म्हणजे अभिमान, परंपरा, संस्कृती, आदर्श, माणुसकी, बंधुता, प्रेम, आदर, अस्तित्व, माया, सौंदर्य, आपुलकी, इतिहास, एकमेव ओळख इत्यादी. मराठी भाषा महाराष्ट्र राज्याची एकमेव पारंपरिक आणि सांस्कृतिक भाषा आहे. या भाषेला सर्वोत्तम दर्जा महाराष्ट्र राज्यात दिला जातो आणि अभिमानाने आणि गर्वाने तो पाळला देखील जातो. पुरातन काळापासून ते आजवरच्या इतिहासात अनेक शूर, योद्धे, मावळे, संत, महात्मे, नेते, आदर्श व्यक्तिमत्त्व या महाराष्ट्रात घडले आणि त्यांची भाषा देखील मराठी हीच होती म्हणूनच महाराष्ट्र राज्याची नाळ इथल्या मराठी भाषेशी जोडली गेलेली आहे. मराठी भाषेवर आधारित सर्व प्रकारचे साहित्य मराठी कवी आणि लेखकांनी आपल्या मराठी साहित्य क्षेत्रात लोकार्पण केले आहे. त्यांच्या या अमूल्य योगदानामुळेच मराठी साहित्याचे अस्तित्व अजूनही अबाधित आहे. कोणत्याही प्रकारचे गालबोट न लागता आपली ही मराठी भाषा जगातील सर्व प्रकारच्या स्पर्धेमध्ये प्रतिनिधित्व करून आपले सर्वोच्च स्थान नेहमीच राखून ठेवत असते.

आपली मायबोली मराठी भाषा ही फक्त गाव, खेडे, शहर, तालुका, जिल्हा, राज्य, किंवा देश या पुरतीचं मर्यादित न ठेवता संपूर्ण जगभरात तिचा प्रसार केला पाहिजे आणि नावलौकिक घडवले पाहिजे. आपल्या मराठी भाषेचे कौतुक आणि तिची एकमेव ओळख जगभरात वाढविण्यासाठी आपल्या सर्व मराठी भाषिकांची एकजूट असली पाहिजे. मराठी कर्म, मराठी धर्म आणि मराठीच आपले खरे आयुष्य ही भावना आपल्या मनी असली पाहिजे. तसेच मराठी भाषेचा आदर आपल्या सर्वांच्या प्रती असलाच

पाहिजे. "मराठा तितुका मेळावा महाराष्ट्र धर्म वाढवावा" हे वाक्य आपल्या महाराष्ट्रातील थोर संतांचे आहे. प्रत्येक मराठी बांधवाने या वाक्याचा विचार करून त्याचे प्रात्यक्षिक रूपांतर आपल्या स्वतःच्या आयुष्यात करावे तरच आपल्या या मराठी भाषेला देशातच नाही तर "जगातील एकमेव भाषा" म्हणून नक्कीच सर्व जगात संबोधिले जाईल. प्रत्येक मराठी माणसाला आपल्या मायबोली मराठी भाषेचा खरंच अभिमान असतो आणि मनस्वी प्रेम देखील असते.



जसे गुजराती, कानडी, पंजाबी, मुसलमान, ख्रिस्ती लोकांना त्यांच्या भाषेबद्दल प्रेम असते. मराठी भाषेचा प्रत्येकाला अभिमान असला तरीही मराठी माणसाला त्याची भाषिक जबाबदारी देखील असते. आपल्या भाषेला कोणी तुच्छ मानले न जावे किंवा आपल्या भाषेबद्दल जर एखादी व्यक्ती गैर पद्धतीने वागणूक देत असेल तर त्या सर्व गोष्टींना आळा बसवण्यासाठी आपले धाडसाचे पाऊल सर्वप्रथम पडलेच पाहिजे.

सध्याचा काळ हा बदलत चाललेला नवीन काळ आहे. आपण सर्वजण एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करत असताना, विज्ञानवादी दृष्टिकोन मनात ठेवून आधुनिक संस्कृती जोपासत असतो. सध्याच्या नवीन पिढीमध्ये सारे नवनवीन बदल घडून येत आहेत. पूर्वीच्या गोष्टी ह्या सध्याच्या पिढीतील लोकांमध्ये फार क्वचित जाणवत आहेत. सध्याचे मराठी नागरिक आपल्या पाल्यांना मराठी शाळेत प्रवेश न घेता इंग्रजी माध्यमातूनच शिकवण्याचा जास्त पुढाकार घेतात. याचे मुख्य कारण म्हणजे प्रत्येक पालकाला आपला पाल्य हा सुशिक्षित, हुशार आणि आदर्श विद्यार्थी व्हावा असे वाटत असते. तसेच त्याने उच्च शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहून चांगली नोकरी किंवा व्यवसाय करावा असे वाटत असते आणि या सर्व गोष्टींसाठी इंग्रजी भाषेवर मोठ्या प्रमाणावर प्रभुत्व असावे लागते. काही पालकांची अशी इच्छा असते की ज्या गोष्टी आपल्याला मिळाल्या नाहीत त्या गोष्टी आपल्या पाल्याला जरुर मिळाव्यात आणि त्याने मोठे व्हावे. यातील काही गोष्टी जरी थोड्या प्रमाणावर योग्य असल्या तरीही मराठी

शाळांवर त्याचा फार गंभीर परिणाम झालेला आहे. सद्य परिस्थिती पाहता बहुतेक शहरांमध्ये मराठी शाळा ओस पडू लागलेल्या आहेत. तसेच बहुतांश ठिकाणी मराठी शाळेचं अस्तित्व संपुष्टात आलेले आहे. एखाद्या विद्यार्थ्याने जर त्याचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून पूर्ण केले असेल आणि त्याला त्याची मातृभाषा असणारी मराठी भाषा स्पष्ट बोलता आणि लिहिता येत नसेल तर ती फार मोठी शोकांतिकाच असेल. यामुळे मराठी भाषेचे अस्तित्व टिकवण्यासाठी फार भयानक परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यासाठी योग्य काळजी वेळीच घेणे अत्यंत आवश्यक आहे.

सर्व मराठी भाषिकांना आपल्या भाषेबद्दल अभिमान असला पाहिजे. तसेच सर्व क्षेत्रांतील कार्यरत असणाऱ्या व्यक्तींनीसुद्धा एकत्र येऊन मराठी भाषेचा विकास होण्यासाठी सहकार्य केले पाहिजे. लेख, कथा, कविता, निबंध, पत्र लेखन, अशा विविध प्रकारच्या विभागांतून मराठी भाषेतील साहित्य सर्व लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे आणि मराठी भाषेचे संवर्धन झाले पाहिजे. वर्तमानपत्र, साप्ताहिक, काव्यसंग्रह, कथासंग्रह, पुस्तक, सोशल मीडिया, ऑनलाइन वेबसाईटस इत्यादीं मार्फत देखील मराठी भाषेचे संवर्धन झाले पाहिजे. सध्य परिस्थिती पाहता संपूर्ण जगात मराठी भाषिक वास्तव्यास आहेत. मराठी भाषेबद्दल जेवढे बोलायचे तेवढे कमीच होईल. याचे मुख्य कारण म्हणजे सांस्कृतिक, ऐतिहासिक, पारंपरिक आणि जगातील एकमेव असलेल्या मराठी भाषेचा दर्जा सर्व भाषांपेक्षा भिन्न आहे.

माझी मराठीची थोरवी
वाढवी संस्कृतीची शान,
ऐतिहासिक मायबोली
सर्वजगी एकमेव मान.!

With best compliments from


united ventures


www.unitedv.net
MOB- 9821010212
Mail- avinash@unitedv.net
503, Regency Park 1 CHS Ltd, Chikanghar,
Kalyan Thane 421301.

औषधे

१)औषधं आपल्या घरातील अविभाज्य भाग झाला आहे. आपण औषधं जवळ घेऊन झोपतो.

२)जी गोष्ट आपल्याजवळ नको तीच आपण जिकडे -तिकडे घेऊन बाळगतो.

३)आपल्या घरातील साधा बाम व विक्सचा पण display कमी करायचा आहे.

४)औषधं ही पॅक बंद box मध्येच हवी. बाहेरून दिसली नाही पाहिजेत. कपाटाच्या आत box मध्ये ठेवावीत.

५)औषधांचा box संपूर्ण घराच्या पश्चिमेला ठेवा किंवा संपूर्ण घराच्या पूर्व दिशेला ठेवला गेला पाहिजे.

६)पूर्व व पश्चिम दिशा नाही मिळाली तर दक्षिण, आग्नेय व वायव्य ह्या तीन दिशांपैकी कुठेही ठेवू शकता.

७)चुकूनही नैर्ऋत्य व ईशान्येला औषधे कधीच ठेवू नका. खूपच negative आहे. उत्तरेला पण नकोच.

८)योग्य जागी औषधे ठेवली तर त्याचा परिणाम चांगला होतो. आपली बचत चांगली राहते.

९)जी health tonic वापरतो, ते म्हणजे च्यवनप्राश यासारखी शक्ती देणारी tonic त्यांचा display करायचा आहे.



With best compliments from

MANIK INFRATECH PVT. LTD.

This Festival of lights, gift Safety and Care.

Call For Emergency FIRE 101

Happy Diwali



This Diwali Gift Your, Near And Dear Ones The Gift of Safety, Like a Fire Extinguisher Show Them You Care.

8 Head Office: 203/ 204, Plot No. K3, Udyog Bhavan No. 2, Nr. Nakshtra Hotel, Anand Nagar MIDC, Ambernath (E). Email: Manikenterprises@ymail.com
0251 262 1166/8108238886

With best compliments from

APICES

studio pvt. ltd.

With best compliments from



Ready Possession Shops and Office spaces for Sale and Lease

Location: Nisarg Plaza, Nisarg Greens, B Cabin Road, Ambernath East, Thane-421501

Contact No. 96194 82007

With best compliment from



M/s. Vaishnavi Construction

Prop. Avinash Jayvant Vekhande

Mob-9527928456

Address:- S-02, 2nd Floor, VitthalDham Apt., Rahul Nagar, Cherpoli
Tal:- Shahapur, Dist:- Thane Pin 421 601
Email: vaishnavi.construction1974@gmail.com avinashvekhande270@gmail.com

दीपस्तंभ

-वैभव धनावडे

आपल्याला छोटे छोटे प्रॉब्लेम आले तर आपण वैतागून जातो. असं वाटत की सगळं सोडून द्यावं. कुठेतरी गायब व्हावं काह दिवस. खूपदा जवळच्यांवर चिडचिड होते.

पात्र परिचय:– दर्शनः वय वर्ष ३२, रामदास : वय वर्ष ४८, नित्यानंद सरः वय वर्ष ५९प्रसंग :–(सगळे एकाच कंपनीत कामाला . समुद्रा जवळील हॉटेलमध्ये कंपनीचे गेट टू गेदर सुरू आहे.

रामदास : काय रे इकडे काय एकटा बसला आहेस? आणि हे काय हातात काहीच कसं नाही? काय घेतो बोल? काय आणू सॉफ्ट की हार्ड ?

दर्शन : या रामदास सर, असंच बसलोय. जास्त काही कोणाशी ओळख नाही मग एकदम सगळ्यांच्यात जायला कस तरी वाटतं. जरा म्हटलं निवांत समुद्र बघत बसू लांबून इकडून. लांबून Lighthouse चा प्रकाश बघायला मजा वाटते.

रामदास : अरे पण आम्ही आहोत ना? आता महिना होत आला तुला, मिसळून घे सगळ्यांच्यात. लाजू नकोस. सगळी आपलीच आहेत. वर्षातून एकदाच फक्त आपली कंपनी पिकनिक असते. फुल्ल एन्जॉय करायचं.

दर्शन :(दूर बोट दाखवून) ते ग्लास उंचावून नाचत आहेत ते कोण ?

रामदास : तू ओळखत नाहीस? अरे ते नित्यानंद सर. सगळ्यात सिनियर माणूस आमच्या डिपार्टमेंटचा.

दर्शन : मी आल्यापासून बघतोय सगळ्यांशी गप्पा मारत आहेत, नाचत आहेत फुल्ल धम्माल सुरु आहे त्यांची.

रामदास : हा ..एकदम जिंदादिल माणूस आहे. खूप मेहनती आणि नॉलेज असलेला. अनेक प्रोजेक्ट्स मध्ये त्यांनी मोठं काम केलंय. घरात रास पैसा पण तरीही एकदम जमिनीवर. रॉयल माणूस.

दर्शन : मी आत्ताच आलोय त्यामुळे जास्त ओळख नाही झाली.

रामदास : चल तुमची ओळख करून देतो.

दर्शन : नको नको आत्ता नको, नंतर करून घेतो. रिटरमेंटला आलेले असे एन्जॉय करणारे कमी बघितलेत. आधीच्या कंपनीत काही सिनीयर माणसं एक तर शांत बसून राहायचे, कोणाशी बोलणार नाहीत किंवा ठरावीक माणसांशीच बोलायचे. काही आपला इगो सांभाळत बसायचे. पण हे मात्र सगळ्यांशी चेष्टा मस्करी करताना दिसत आहेत.

रामदास : मित्रा, मोठ्या दुःखाला पार केल्यावर, बरंच काही सोसल्यावर, काही माणसं पार बदलून जात असावीत. सोसलेल्या कळा अंगात वेगळीच ऊर्जा निर्माण करत असाव्यात.

दर्शन : म्हणजे? काय झालेलं?

रामदास : तुला त्यांच्याबद्दल काहीच माहित नाही ?

दर्शन : नाही सर ..

रामदास : अरे दोन वर्षांपूर्वी ते मृत्यूच्या दाढेतून बाहेर आले.

दर्शन : म्हणजे ..?

रामदास : कॅन्सरवर त्यांनी मात केली केली. जवळपास दोन अडीच वर्ष ते झुंजत होते. काही दिवस असेही आले की, आता सगळं संपलं.

दर्शन : बापरे हे मला माहीत नव्हतं.

रामदास : साधारण चार वर्ष झाली



असतील. रोजच्या मीटिंग संपल्या. आम्ही रूम बाहेर पडलो. पण नित्यानंद सर बाहेर आले नाहीत, म्हणून आम्ही परत आत मध्ये गेलो. तर सर नुसते बसून होते. त्यांच्या चेहऱ्यावर एक वेदना जाणवत होती. आम्ही विचारलं ' काय झालं?' तर ते म्हणाले की, 'मला उठता येत नाही'.आम्हाला वाटलं की cramp आला असावा म्हणून आम्ही हात देऊन उठवायचा प्रयत्न

केला पण त्यांना चालणे पण मुश्किल होत होते. शेवटी कसेबसे त्यांना चालवत आम्ही जागेवर आणून सोडले. काही वेळांत दुखणं अजून वाढलं म्हणून शेवटी कंपनीची गाडी घेऊन त्यांना घरी सोडून आलो.

चार दिवस ते सुट्टीवरच होते. आल्यावर समजलं की, कंबरेपासून पायापर्यंत दुखणं सुरू होते. डॉक्टरने पेन किलर देऊन दुखणं कमी केले. थोडं बरे वाटले पण पूर्ण रिलीफ नव्हता.

दर्शन :बापरे भयानक .

रामदास :मग काही ठिकाणी मसाज केले की तात्पुरता फरक पडायचा. पेन किलर सरू होत्या पण दुखणं सुरूच होते. डॉक्टरांना वाटलं स्लिप डिस्क असेल, म्हणून तेही ऑपेरेशन करून पाहिलं. पण फरक पडेना . पुन्हा काढलेल्या X रे मध्ये मात्र डॉक्टरांना शंका आली. आलेले रिपोर्ट्स इतर ठिकाणी पाठवून त्यांच्यात चर्चा झाली आणि ज्याची शंका डॉक्टरांना आली होती तेच झाले. त्यांना कॅन्सर डिटेक्ट झाला. दुखणं वाढत होते. कंबरेला एक गाठ आलेली,जी वाढत होती. ती वेदना इतकी जास्त होती की सामान्य माणूस सहनच करू शकत नव्हता. ते जोराने ओरडायचे, ती कळ जणू त्यांचे प्राण घेऊ पाहत होती. त्यांचं ऑपेरेशन होऊन गाठ काढण्यात आली आणि मग किमो सुरु झाले. या काळात ते सुट्टीवर होते. घरीच त्यांची ट्रीटमेंट सुरू होती. आम्हाला सगळ्यांना समजल्यावर आमच्या पाया खालची वाळूच सरकली. त्यांना बघायचे,भेटायचे धाडस होईना. त्यांच्याकडे जाऊन आलेले त्यांच्या त्रासाबद्दल सांगत. ७० किलोचा माणूस जवळपास ४० किलो पेक्षा कमी झालेला. त्यांना त्या अवस्थेत बघणं म्हणजे हृदयाला पीळ बसायचा.

दर्शन : ऐकून पण डोकं सुन्न झालं. अश्यावेळी माझ्यासारख्याने हार मानली असती.

रामदास : कदाचित तीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खासियत असावी. लहानपणापासून केलेले कष्ट, बनवलेले कणखर मन त्यांच्या कमी आले. त्यांची जगण्याची इच्छा शक्ती प्रचंड होती. आपल्याला आपल्या कुटुंबासाठी जगायचंय आहे हा विचार ते नेहमी बोलून दाखवायचे. खरतर कुटुंबानेही त्यांना खूप जपलं. वहिनींनी दिवस रात्र मेहनत घेतली. त्यांचं आत्मबल जपलं. प्रेम करणारे कुटुंब त्यांचा आधार बनले. अक्षरशः त्यांना मृत्यूच्या दाढेतून बाहेर आणणारे कुटुंब- प्रेम हेच कारण असावं.

दर्शन : हो त्यांनी सगळ्यांना लावलेला

जीव मी बघतोच आहे

रामदासः ही त्यांच्या स्वभावाची दुसरी चांगली बाजू. छोटा असो वा मोठा सगळ्यांशी गोड बोलणं. प्रत्येकाच्या मदतीला जाणं हा त्यांचा स्वभाव असल्याने त्यांच्या पाठीशी अनेकांच्या प्रार्थना होत्या. यासाठी गत जन्माची पुण्याई असावी लागते जी त्यांच्याकडे खूप होती. फक्त गत जन्माचीच नाही, तर याही जन्माची असेल. कारण त्यांनी सढळ हाताने अनेकांना मदत करताना आम्ही पाहिलेल आहे. या सगळ्या दिवसांत त्यांना कोणाचीही सहानभूती नको होती. स्वाभिमानी स्वभाव.

दर्शन : आपल्याला छोटे छोटे प्रॉब्लेम आले तर आपण वैतागून जातो. असं वाटतं की सगळं सोडून द्यावं. कुठेतरी गायब व्हावं काही दिवस. खूपदा जवळच्यांवर चिडचिड होते.

रामदास : मित्रा तुझं काय आणि आणि माझं काय आपण इकडेच चुकतो. आपण आयुष्याकडे पॉसिटीव्ह बघत नाही. आलेल्या प्रॉब्लेम्सने गांगरून जातो. पलायनवाद स्वीकारतो. पण नित्यानंद सरांसारखी माणसं वेगळ्या धारणेची असतात. सकारात्मक बघणं जणू त्यांच्या रक्तात असते. जगण्याचा प्रचंड आशावाद बाळगताना आलेल्या संकटातून हे धीरोदात्तपणे मार्ग काढतात. काहींना बाहेरून motivation गरज लागते, तर काही self motivated असतात. त्यातील नित्यानंद सर.

दर्शन : आपण किती रडत बसतो ना ? हे नाही, ते नाही? हे कसं करू ? काय होईल? असे अनेक प्रश्न आपल्याला भेडसावत असतात. खूपदा आपण विचार केलेल, अति विचार म्हणू. आपण अति विचार केलेलं घडतही नाही. पण सशाच्या पाठीवर पान पडल्यावर "आभाळ पडलं, पळा पळा" ओरडत पळणारा ससा आपणच आहोत की काय असं स्वतःबद्दल वाटू लागतं. आपल्यापेक्षा जास्त दुःख सोसलेली माणसं आहेत हे आपण विसरून जातो.


रामदास : तुला तो दूर समुद्रात दीपस्तंभ दिसतोय ?

दर्शन : हो..

रामदास : अडचणीत, संकटावेळी किंवा गरजेवेळी नित्यानंद सरांसारखी माणसं बघायची. अशी माणसं दीपस्तंभासारखी असतात. दीपस्तंभ जसा जाणाऱ्या-येणाऱ्या जहाजांना मार्गदर्शक, उजेड देणारा, दिशा दाखवणारा असतो; तसेच नित्यानंद सरांसारखी माणसं आशेचा किरण

ठरणारी असतात .नित्यानंद सरांनी अनेकांना प्रेरणा दिली, मार्गदर्शन केले, संकटात दिशा दाखवली. असे दीपस्तंभ आपल्या आजूबाजूला असतात. आपण ते ओळखायचे असतात आणि त्यांच्याकडे बघून आपली दिशा ठरवायची असते. ते कायम तिथेच असतात मार्गदर्शनास पण आपणच खूपदा मार्गापासून भरकटतो.

दर्शनः हसऱ्या चेहऱ्यामागे असलेला



संघर्ष आपल्याला खूपदा ठाऊक नसतो. काही व्यक्ती त्यांच्या नावाप्रमाणे असतात. नित्यानंद ..नित्य आनंद ..हा नावाचा गुण की व्यक्तीचा या विषयात आपण पडायचं नाही. नित्यानंद नाव ते सार्थक करत आहेत हे खरं.(इतक्यात अचानक नित्यानंद सर येतात)

नित्यानंद सरः काय रे? काय नाचत नाही आहात? अरे एन्जॉय करायचं. वर्षातून एकदिवस तर मिळतो पिकनिकचा कंपनीकडून. त्यात पण कसल्या गप्पा मारत बसला आहात ? (हात उंचावून) ENJOYYY!

रामदास : अरे सर १०० वर्षं आयुष्य तुम्हाला. तुमच्या बद्दलच बोलत होतो.

नित्यानंद सरः (हसून)नको रे बाबा १०० वर्ष. आधीच माझा पुनर्जन्म झालाय आणि नावं ठेवायची तर तोंडावर ठेवा ना! मागून काय बोलताय ?

रामदास : नाही ..नाही ..काहीही काय सर? तुम्हाला कोण नाव ठेवेल काय? आमचे गुरू आहात तुम्ही. हा दर्शन नुकताच जॉईन झालाय त्याला तुमच्या बद्दल सांगत होतो.

दर्शन : नमस्कार साहेब .

नित्यानंद सरः साहेब बिहेब काय ?अरे मी साधा तुमच्यासारखा आणि साहेब वगैरे कंपनीत. इकडे आपण पार्टीला आलोय.

दर्शन : तुमच्याबद्दल खूप ऐकल, तसेच आहात आनंदी, मनमिळावू.

नित्यानंद सरः आपल्याला काय न्यायचं का वर ? जाताना 'खालीच जाणार' आपण, मग गर्व कसला करायचा? उलट मला वाटत की, आपल्याला जे येते ते स्किल असेल किंवा नॉलेज

असेल ते समोरच्याना देत जावं. पण हा रामदास शिकेलतर ना? बघावं तेव्हा ..नुसता साहेबा मागे ..(हसत हसत)(सगळे हसतात)अरे पुढे काय होईल याचा विचार करत बसायचा नाही. आज हा क्षण आहे तो आनंदात जगायचा. पुढचं कोणी काय बघितलं आहे. प्रॉब्लेम सगळ्यांना असतात आपण कसे बघतो त्याकडे ते शिकायचं.

दर्शन :पण तुम्ही दिलेली झुंज शब्दांच्या पलीकडील आहे.

नित्यानंद सर : या लढाईत आपली टीमच नाही तर सर्वजण पाठीशी होते. सगळ्यांच्या शुभेच्छा, प्रार्थना पाठीशी होत्या. नाचायला चला. जाम झालं लेक्चर. चला आता, रिटायरमेंटला माझ्या बद्दल बोला काय बोलायचं ते, नाहीतर नुसता नारळ द्याल हातात.(सगळे हसू लागतात)

दर्शन :रामदास सर बघा त्या दीपस्तंभाचा प्रकाश अजून उजळल्यासारखा वाटतोय.(सगळे हातात हात घालून नाचू लागतात).

वास्तुटीप्स

आपल्या घरात असलेली अडगळ

१)सर्वप्रथम अडगळीची खोली वास्तुशास्त्राला मान्य नाही, आपल्या घरात अडगळ-अडचण असू नये.

२)आपल्या घरातील प्रत्येक वस्तू ही सतत वापरात असली पाहिजे, काही अशा वस्तू आहेत की ते सतत लागत नाही पण त्या आठवड्यातून एकदा तरी वापराव्यात.

३) वस्तू सतत वापरायला पाहिजे कारण ती स्थीर राहिली तर त्याची एनर्जी थांबते व ती थांबली तर त्यावर धूळ साठते. मग तिच्यात फंगस तयार होतात, जेव्हा वस्तूला खुरशी लागते तेव्हा ती सडायला लागते

४)वर्षोनुवर्ष वस्तू जपून ठेवू नये, ज्या वस्तूंना आपण १,२,३,४ वर्षे हात लावत नाही त्या वस्तूत निगेटिव्ह एनर्जी तयार होते. मग त्या एनर्जी आपल्याला घातक ठरतात.

५)जर चौरंग असेल तर तो इतर लोकांना वापरायला द्या, सतत त्या वस्तूचा वापर झाला पाहिजे.

दिवाळीच्या हर्षभरीत शुभेच्छा!

भारत जगलानी

नगरसेवक भिवंडी नगरपालिका.



दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा!

सुचिंतन डेव्हलपर्स

नाशिक..

दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा !

S. S टुर्स अँड ट्रॅव्हल्स

आमच्याकडे सर्व प्रकारच्या गाड्या भाड्याने मिळतील.



सुजन शिगवण

मो.७०२०३२८३६१ / ७२०८९६७२१६

पत्ता :- मु. पन्हळघर बुद्रुक, ता. माणगांव, जि. रायगड.

दिवाळी निमित्त हर्षभरीत शुभेच्छा !

वैष्णवी मजूर कामगार सहकारी सोसायटी

चेअरमन

श्री. कल्पेश भारत केणे

युवासेना उप जिल्हा प्रमुख
माजी अध्यक्ष-: जिल्हा परिषद शाळा व्यवस्थापन समिती, गोरसई, सावंदे
अध्यक्ष-: ॐ शिवसाई मंदिर समिती, पोस्टमन पाडा, गोरसई

मो.८३९०३१६५००

राजा कन्स्ट्रक्शन

Government contractor

श्री. राजेश भारत केणे

BE civil, LLB

मु. गोरसई पो. वडपे ता. भिवंडी, ठाणे

कोड

- संतराम पाटील

तिनं त्याला विचारल तुम्ही अशी काय चुक केलीय अस तुम्हाला वाटत नाही नव्हं. "नाही ग मी माझ्या पोरांची शपथ घेऊन सांगतो मी काय केलं नाही. तीच कुठे तरी शेण खाऊन आली असेल"

राघू वाण्याची तरणीताठी पोरं बेबी पोटुशी झाली आणि पोलीस पाटलाला कोडं पडलं. अर्धी खुळी आणि अर्धी शहाणी पोरं तिला नेमकं आपल्या बरोबर कुणी काय केलंय आणि कुठं कसं काय केलंय सांगता सुद्धा येइना राघू वाणी म्हणजे गावात गल्ली गल्ली फिरून चिरमुरे फुटाणे विकणारा आणि ते विकुन मिळालेल्या कमाईतून आपलं कुटुंब चालणारा हातावरचे पोट आसलेला एक सामान्य माणूस. नवरा बायकू आणि ही खुळी सावळी पोरं अस त्याचं कुटुंब पण त्या कुटुंबाला कुणाची तरी नजर लागली आणि राघू वाणी अचानक एक दिवशी हे जग सोडून गेला. तो गेला आणि त्याचं कुटुंब रस्त्यावर आले. तशी त्याची बायकू यमनाबाई लोकांच्या शेतावर जाऊन शेतमजुरी करून आपलं कुटुंब चालवू लागली ही वयात आलेली खुळी सुळी पोरं संभाळत बसणेशिवाय तिला पर्याय राहिला नाही ही पोरं घरांत बसून काय करणार तिचं मन रमणार नाही म्हणून शेजारी असलेल्या बाळू माळ्याच्या हॉटेल मधे तिला पाणी भरायचं काम मिळाले त्या हॉटेल मधे पाणी भरल्या बद्दल बाळु माळी तिला महिना एक हजार रुपये द्यायचा. यमनाचा शेतमजुरीचा पगार आणि बेबीचा पगार यावर त्यांचं कुटुंब दोन वेळचं जेवण चहा पाणी खाऊन पिऊन व्यवस्थित चालू होतं. राघूच्या जाण्यानं त्यांच्यावर झालेला आघात सहन करून या मायलेकी सुखाचे दिवस जगत होत्या. त्यातच हे प्रकरण बाहेर आले नी ही गोष्ट यमुनेन पोलीस पाटलांच्या कानावर घातली. पोलीस पाटील लक्ष्मण कुंभार हे ऐकून चकीतच झाला आणि बोलला "अरेच्या....या मोडक्या खुपावर हे वावटळ कुठन आलं म्हणायचं, यमने!

तुझा कुणावर संशय हाय काय; नुसतं नाव सांग त्या रांडच्याच तेला फोडूनच काढतो" 'नाही

मामांजी ह्यातल मला काय बी म्हाईत नाय, म्या सकाळी कुणाच्या शेतावर कामाला गेली की सांच्याला घरात येतूया, सकाळी पोरं अंगुळ न्हाऊन आली नी कापड बदलतान माझी नजर गेली. तिला बरंच ईचारून बघीतलय खरं नाव सांगायला तयार नाही आता काय करायचं कसं ह्यातन बाहीर पडायचं तुम्हीच ठरवा.' अस म्हणाली आणि पदर पसरून पाटलांच्या समोर उभी राहीली



एकाद्या अपराध्यासारखी. पोलीस पाटील गावातल्या रापल्याल्या पुढाऱ्यापैकी एक होता त्यान यमुनाची समजूत काढली आणि म्हणाला "हे बघ यमने, तू आता या पोरीची काळजी सोड नी पुढं बघून रोजगार कर, मी त्या रांडच्याला हुडकून काढतो नी तेला काय शिक्षा करायची ते ठरीवतो. तु जा ही गोष्ट अजुन कुणाला बोलु नगं " तशी तोंडाला पदर लावुन यमना निघून गेली आणि पोलीस पाटील या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावायच्या तयारीला लागला त्यानी लागलीच गाव कोतवाल केरबा मांगाला बोलवून घेतलं. केरबा अदबीने आला नी "बोला पाटील बाबा काय सेवा करू" गाव पंचायतीच सगळ पंच आणि सरपंचाना चावडीत बोलवून घे असा माजा निरोपच त्यास्नी दे पडत्या फळाची आज्ञा पाळून सगळे निरोप पोहचवण्यासाठी गेला बघता बघता सगळे पंच चावडीत दाखल झाले. पाठोपाठ पोलीस पाटील आले. तोवर केरबान चहा आणला सगळ्याना चहा दिला आणि पाटलानी विषयाला हात घातला. पाटील म्हणाले "हे बघा लोकानू गावात एक नको ती घटना घडलीया एका गरीबाच्या घराचं वाळवाण झालंया" अहो...पाटील सांगातर बघूया कुणाचं काय झालंय. सरपंच बोललं आणि पाटील सांगायला लागले "काय सांगायचं....मर्दानु राघू वाण्याची पोर कुणाची तरी पोटुशी राहीलीया... आता सांगा ही खुळी सवळी पोरं तिचा गैरफायदा कुणी घेतला हे तुम्हा आम्हाला बघायला पायजे. नाही तर गावात न्याय नाही अस व्हयील.

तवा ह्यो इशय जरा गांभीर्याने घिऊया. अस ते बोललं आणि सरपंचाना एक आयडिया सुचली ते म्हणाले "गावातली अशी जी उनाडगी लपडेखोर पोरं हाईत त्याना बोलवून घिऊया आणि त्याना पोलीसांची भीती दाखवून काय निघतय काय बघूया" आरं कुणाकुणाच्या पोरास्नी इचारायच, त्या परीस त्या पोरिच्या घरला जाऊया नी तिच्या आई करवी तिलाच इचारूयाकी हे सोलप हाय. आसं पोलीस पाटील म्हणाले नि इतर पंचानी सुद्धा संमती दिली आणि हा मोर्चा तसाच चावडीतन उठला आणि राघू वाण्याच्या घराकडे निघाला. ही सगळी मंडळी वाण्याच्या घराकडे जात आसताना गल्ली गल्लीतील माणसं पहात होती. काहीना वाटायचं कुठे तरी मारामारी किंवा कुणाच्या तरी घरा शेताच्या वाटण्या आसतील आसच काही तरी लोक तर्क वितर्क लढवत होते आणि एकदम हा पंच कमिटीचा मोर्चा यमणा बाई जवळ थांबला "यमने काय करायला लागलीस, जरा तुझ्याशी बोलायचं हाय" पाटील म्हणाले. 'पाटील बाबा काय बोलायचं ते बोला खरं मला ह्यातनं काय तर मारूग काढून द्या'. यमना बोलली. 'मार्ग काय नाय जरा घरात चल बघु, आम्हाला पोरीबरोबर जरा बोलायचं हाय. मग या घरात, हिथंच बसुन बोलुया.

गल्लीत बोलबाला नग.' यमना म्हणाली आणि सगळी मंडळी घरात गेली यमनाने घरात घोंगडी अंथरली सगळ्या मंडळीना बसायची विनंती केली आणि घरात चहा करणेसाठी गेली. चहा पाणी झाले, बेबीला सोबत घेऊन ती पंचासमोर आली. "ये...पोरी हे तुझ्या पोटात काय वाढलय तुला माहीत हाय काय? " नाय काय माहीत, काय झालय आबा? "आग...तू आय हुणार हाईस एका पोराची " नाय..नाय हुणार मी आई "आग...तुझ्या आयला इचार, ती काय म्हणती बघ " मधीच बोलन तोडुन यमना म्हणाली "आग खरंच तू आय व्हायची हाय, तुला प्वाट आलय सकाळी म्या बघीतलं नी आबाला बोलवून घेतलया. खरं सांग कुणी तुला जवळ केली ती तेच नाव तर सांग ग बाई" आय मला,काय दखल नाय, कुणी काय केलय ते, मला धेनात ईना झालया. या पोरीची गत फार वाईट झाली पण तिला नेमकं काय सांगता येईना याच्यावर एकच इलाज करायचा होता तो म्हणजे ती माळ्याच्या हॉटेल मधे कामाला होती म्हणजे त्या माळ्यानच काय तरी झोबंड केल आसेल म्हणून म्हणून पोलीस पाटील आणि सरपंच यानी बरेच प्रयत्न करून हॉटेल मधे जायचं ठरवलं

आणि हा मोर्चा त्या हॉटेल कडे गेला. हॉटेल मधे माळी कोण गिऱ्हाईक येते काय वाट बघत एका बाकड्यावर बसला होता त्याला हा मोर्चा येत आसल्याचे दिसल तसा तो बाहेर जाऊन उभा राहिला आणि सरपंचाना हाक दिली."आहो सरपंच साहेब या की हाटेलात लांब आलासा".

"लांब कुठलं मर्दा तुझ्याकडेच आलाव बघ" अस म्हणत सरपंच पो.पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यानी हॉटेल मधे बैठक टाकली आणि हॉटेलचा दरवाजा बंद केला माळ्याच्या बकुटीला धरलं कुठलाही विचार न करता कानाखाली दोन लगावल्या तसं माळ्यान तोंडावर हात मारला तो आवाज ऐकून काही लोक हॉटेल बाहेर जमले पण हॉटेलच दार बंद आसल्याने कुणाला आत जाता येईना तोवर माळ्याच्या कमरेत चार पाच लाथा घातल्या आणि उठवून त्याला जमिनीवर बसवलं आणि पो.पाटील म्हणाले "ये रांडच्या त्या वाण्याच्या खुळ्या पोरीला गरवार कुणी केली बोल" आबा नाय नाय आसलं काय म्या केलं नाय. अंबाबाईची शपथ. माझ्या बायकापोरांची शपथ करतो देवळात चला. खरं मला मारू नगा असं म्हणून तो पो.पाटील आणि सरपंचाच्या पायावर गडागडा लोळायला लागला. आता मात्र खरं खोटं काय आहे हे कळायचा मार्ग बंद झाला. पोलीसकेस केल्याशिवाय खरं निघणार नाही म्हणून या प्रकरणातील गुन्हेगार म्हणून माळ्याच्या नावावर केस घालायचं ठरवून तशी त्याला सूचना



देऊन पोलीस पाटील लागलीच तालुक्याच्या गावाला निघून गेले आणि माळ्याचे धाबे दणाणले इकडे गावात तो पळून खेळायला लागला 'आपण हा गुन्हा केला नाही मला वाचवा' म्हणून प्रत्येकाकडे मदतीची याचना करू लागला पण त्याला मदत करायला कोणी पुढे येइना तो घरात गेला आपल्या पत्नीला झाला प्रकार सांगून रडायला लागला. पत्नी सुद्धा घाबरून भितरलेल्या हरणी सारखी सारखं घरातुन गल्लीत तर गल्लीतुन घरात अशी येरझाऱ्या घालायला लागली. तिचा तिच्या नवऱ्यावर म्हणजे बाळूवर फार मोठा विश्वास होता.

त्या विश्वासाला तडा जाईल अस आपला नवरा वागणार नाही या मतावर ती ठाम होती.

तिनं त्याला विचारलं "तुम्ही अशी काय चूक केलीय अस तुम्हाला वाटत नाही नव्हं"

"नाही ग मी माझ्या पोरांची शपथ घेऊन सांगतो मी काय केलं नाही. तीच कुठे तरी शेण खाऊन आली असेल" मग गप बसा बघूया आपण पोलीस पाटील आबास्नी काय सांगायचं ते सांगूया 'नाही आता ते पोलीस पार्टी बोलवायला तालुक्याच्या गावाला गेल्यात', असे बाळू म्हणाला आणि आपल्या घराच्या माळ्यावर जाऊन लपून बसला. त्यामुळे बाळूचे सगळे कुटुंब घाबरून गेले होते. पुढे काय होणार हे कसं होणार हे कळायला मार्ग नव्हता म्हणून घराचा गल्लीकडचा आणि परड्याकडचा दरवाजा लावून दोन मुलं आणि ही दोन नवरा बायको घरात बसली होती. दुपारचे दोन वाजले होते बाळुची बायकू दोन्ही मुले भुकेली होती म्हणून त्याना जेवण वाढत होती. बाळू आजून माळ्यावरच चढून बसला होता. इतक्यात गल्ली कडील दारावर कुणी तरी थाप मारली दरवाज्या वर धड धड धडकी मारायला चालू केले बाळूला जे समजायचं होते ते समजले; आता पोलीस आलेत आता माझी काय धडगत नाही. आता पोलीस मला मारहाण करणार पोलीस स्टेशनला घेऊन जाणार तिथं मला तुरुंगात डांबून ठेवणार आणि मी न केलेल्या गुन्ह्याची मला शिक्षा होणार. हे सगळे चित्र त्याच्या समोर उभा राहिले आणि मग एक पर्याय त्याच्या समोर आला म्हणजे पोलीसाना चकवा देऊन पळून जायचं बर गेलं तर किती दिवस जायचं.

मी पळून गेलोच तर माझ्या बायकू आणि पोरांचं काय होणार. असे अनेक प्रश्न त्याच्या मनात थैमान घालत आसताना तिकडे त्याची बायकू उठून दार उघडायला निघून गेली. तिन दरवाजा उघडला समोर पोलीस पाटील आबा आणि एक पोलीस उभा होता. "त्यो कुठे हाय, हराम खोर?" पोलीस पाटील बोलला "घरात नाही त्यो! हाटेलात गेलाय" बाळुची बायकु बोलली तसं आल्या पावली पोलीस पाटील आणि पोलीस कॉन्स्टेबल अंगठेकर हे दोघं निघून गेले ते सरळ बाळूच्या हॉटेल कडे पहातात तर हॉटेल बंद. हा हॉटेल मधे नाही घरात नाही गेला कुठे काय समजायला मार्ग नव्हता. लागलीच पोलीस पाटलानी केरबाला निरोप दिला चावडीत यायला आणि हे दोघं चावडीकडे निघुन गेले. चावडीत हे पोहचले केरबा आला केरबाला पाटलानी विचारलं

"आरे केरबा, त्यो हाटेलवाला बाळ्या कुठ तुला दिसला का? रे " नाही दिसला मला, सकाळ पस्न हाटेल सुद्धा बंद हाय. म्हणजे हे बोलुन केरबान आपली हॉटेल कडे जायाची फेरी वाचवली खरं दुसर मोठं काम अंगावर घेऊन पडला. "बर, ते सगळे राहू दे, आम्हा दोघाना आमच्या घरातन चहा घेऊन ये आणि येता जाता तो हरामखोर बाळ्या कुठ दिसतोय का बघ आणि त्याला सुद्धा चावडीकडे यायला सांग" हे शब्द कानावर पडताच तो चहा आणायला पाटलांच्या घरी गेला. जाताना त्याने चौकशी केली, पण बाळ्या काही दिसला नाही. पाटलांच्या घरातून चहा घेऊन केरबा आला पण त्याला परत येताना सुद्धा तो दिसला नाही. चावडीत पाटील आणि पोलीस बसले होते. त्याना केरबान बाळ्या सापडत नसल्याचे सांगितले त्या दोघाना चहा दिला आणि परत तो शोधण्यासाठी गावभर फिरून आला, पण गाव सोडुन फरार झालेला बाळ्या त्याला सापडणार कोठून तो रिकाम्या हाताने परत आला. "सापडला का ? रे त्यो हरामखोर" नाही सापडला, त्यो सकाळ पस्न गावात नाही म्हणत्यात. केरबा म्हणाला. "बरं जाऊ दे, कुठे जातोय तिकडे. उद्या आनुया सांगडुन आणि टाकुया जेलात" पाटील म्हणाले आणि अंगठेकर पोलीस हवलदार याना परत घलवाव म्हणून त्याना उद्देशून पाटील म्हणाले "साहेब तुम्ही



आज जावा,उद्या परवा आम्ही सोताहुन तेला पोलीस स्टेशनला हजर करताव " ठीक हाय पाटील, मी आता जातो,पण परवा त्याला हजर नाही केल तर आम्ही पोलीस गाडी घेऊन येऊन गाडीत टाकून त्याला घेऊन जाणार "बर साहेब जाता जाता त्या वाण्याच्या खुळ्या पोरीला भेटुन जावा " आसे म्हणत पाटील त्याना घेऊन वाण्याच्या घरी गेले. तिथं त्या पोरीची परिस्थिती पाहिली आणि जाब जबाब घेऊन हवलदार अंगठेकर तालुक्याला गेले.

आता बाळूला पोलिसात हजर करायचं आव्हान पोलीस पाटलानी स्वीकारले होते. ते



आपल्या घरी जाताना त्याच्या घराकडे गेले; घरात बाळूची दोन मुलं चातका सारखी बाळूची वाट पहात होती दोन वाजल्यापासून त्याना तो दिसला नव्हता आणि परत घरात येईल की नाही याची शाश्वती नव्हती. "ये पोरी त्यो हरामखोर बाळ्या आला का नाही " पाटील, नाही आबा. अस ती म्हणाली ओक्साबोक्सी होऊन रडायला लागली तिनं पदर पसरला नी म्हणाली, "आबा,तुमच्या समोर पदर पसरते माझा नवरा त्यातला नाय, त्यो कुणा परक्या बाईच्या अंगाला बी हात लावायचा नाय तुम्ही आम्हाला न्याय द्या. मी तुमच्या पाया पडते " अस म्हणून तिनं आपलं डोकं पाटील आबांच्या पायावर ठेवलं,पण काय उपयोग झाला नाही. कारणं दस्तुरखुद्द पाटील यांचाच तो खरा संशयित होता. त्यामुळे बाळु त्यांच्या हाती लागणं महत्वाचे होते. तो गाव सोडुन फरार झाले मुळे तो सापडणे शक्य नव्हतं; पण ते या पोलीस पाटलाना कोण सांगणार. त्यानी दोन दिवस शोधले पण तो सापडला नाही तशी कल्पना पोलीस पाटलानी पोलीस हवलदार अंगठेकर याना दिली आणि पोलीस पाटील यांच्या सहकार्याने पुढील तपास चालु ठेवला. त्याच्या घरच्या मुलाबाळाना कोणताही त्रास न करता वेळोवेळी पोलीस पाटील, पोलीस त्याच्या घरी पै पाहुणे नातेवाईक याना भेटुन आले पण काय उपयोग झाला नाही. आता या घटणेला चार महिने उलटून गेले आणि विसर पाडुन पोलीस बाळूच्या गावाला यायला निघाले सोबत पोलीस पाटील होतेच आणि बाळू सुद्धा तिथेच होता तो हवलदार अंगठेकर यांच्या समोर उभा आसल्याने पोलीस पाटलाना वाटले अटक पूर्व जामीन घेऊन तो आला आसेल म्हणून ते स्वत:साठी बीडी काडी घेण्यासाठी पाणपट्टीत गेले आणि तिथंच त्यांचा खेळ झाला. पोलीस पाटलाना

बाळूने पाहीले आणि तिथंच कुठे तरी गायब झाला. पोलीस पाटील बीडी काडी घेऊन आले आणि अंगठेकर याना उद्देशून म्हणाले "बाळू कुठे गेला" आहो पाटील, तेच तर आम्ही शोधायला चाललोय "आहो साहेब ,आता त्यो तुमच्या समोरच व्हुता तुम्ही तेला पकडले नाही" "आहो मी त्याला कधी बघीतलेच नाही तर त्याला पकडणार कसं" असे हवलदार अंगठेकर म्हणाले नी पोलीस पाटलाना उलगडा झाला ते आश्चर्याने म्हणाले "आरा... .रा.... रा.....रा.... दांडगा घोटाळा झाला या बीडी काडी मुळे" असे म्हणून त्यानी बीडी काडी हातातल्या हातात चुरगळून टाकली आणि आपल्या गावाला परत आले. हातातली शिकार निसटल्यावर जशी शिकाऱ्याची अवस्था होते तशीच अवस्था त्यांची झाली होती. सावज हातातून निसटून गेल्यामुळे त्यांच मन सैरभैर झाले होते तशातच गावाला जायची एस टी लागली होती. त्या गाडीतून ते गावात आले ते तडक बाळूच्या घरात गेले. कोणत्याही मार्गाने बाळू घरात आला आसणार म्हणून ते त्याच्या घरात गेले कुणाला न विचारता घरात गेले सगळे घर तपासले तो घरात आलाच नाही तर सापडणार कसा, बाळुच्या शेजार पाजाऱ्यांना त्याच्यावर पाळत ठेवायला सांगितले नी मग त्या आपल्या घरात गेले.

कशीबशी रात्र काढली सकाळी उठले बाळूचे सगळे पै पाहुणे नातेवाईक यांच्या घरी अचानक जाऊन चौकशी केली तो सापडत नव्हता. तो एका डोंगरात रहात होता त्याला त्याच्या सासुसासरे जेवणं पुरवत होते ज्या दिवशी तो पोलीसाना दिसला त्या दिवशी पायी चालत तो तालुक्याच्या बाजाराला गेला होता तो आडमार्गाने आला गेला आसल्याने एस टी ने जाणाऱ्या पोलीसाना तो सापडत नव्हता आता बरेच दिवस शोधल्याने तो सापडत नसल्याचे एक फार मोठे कोडे पोलीस पाटलाना पडले होते तर तो फक्त संशयित आहे अजून त्याच्यावर आरोप सिध्द झाला नसल्याचे मुळ आरोपी कोण आहे याचं कोडं पोलीसाना पडले होते तर दुसरी कडे बेबी गरोदर आहे पण ते तिच्या पोटातील पाप कुणाचे आहे हे कोडं बेबीच्या आईला पडले होते. या कोड्याचे उतर हा बाळुच देणार होता हा फरारी होता तर बेबीच्या पोटातील गर्भातील गर्भाचे दिवस आणि महिने वाढत होते असा जटिल प्रश्न सर्वांना पडला होता. अचानक एक दिवशी अंगठेकर पोलीस गावात फेरी टाकायचे म्हणून गावात आले पोलीस पाटील आणि

त्यांची भेट झाली ते पोलीस पाटलाना म्हणाले "हे बघा पाटील तो बाळू सापडेल किंवा न सापडेल त्या पोरीला उद्या तालुक्याला घेऊन या ती किती महिन्याची पोटुशी आहे. ते तपासून घ्यावे लागेल आणि मग पुढे काय करता येइल ते बघुया" लागलीच पाटलानी त्याला मान हलवून होकार दिला त्या दिवशी मस्त पैकी जेवणाचा बेत आखला



आख्खा गावठी कोंबडा केरबा पाटील आणि अंगठेकर हवलदार यानी संपवला आणि संध्याकाळी चार वाजता साहेबांना घालवायला पोलीस पाटील तालुक्याला निघाले हे दोघं एस टी स्टॉप वर आले इतक्यात गाडी आली गाडीत बसले आणि या दोघांच्या इकडच्या तिकडच्या गप्पा रंगल्या गाडी घाट चढायला लागली घाटातील वळण पास करीत गाडी घाट माध्यावर आली आणि अचानक गाडीला ब्रेक लागला गाडी ड्रायव्हरने गाडी थांबवली स्टॉप नसलेल्या जागी गाडी का थांबली कंडक्टर इकडे तिकडे बघायला लागला तर पाठीमागुन एक चाळीसीतला तरुण पळत येताना दिसला त्याला गाडीत घेतलं इकडे पोलीस पाटील आणि अंगठेकर यांच्या गप्पा रंगल्या होत्या त्या गप्पांच्या नादात ते दोघं होते. वंडक्टरने त्या प्रवाशाला हाक दिली "तिकीट....तिकीट.... " "तिकडून आवाज आला "कोल्हापूर एक द्या"

पोलीस पाटलाना आवाज ओळखीचा वाटला त्यानी त्या माणसाकडे बघता बघता नजर मारली आणि पोलीस पाटील ओरडले "ह्यो काय बाळ्या हीथंच हाय.... अरे... पकडा... पकडा.... " अंगठेकराना काय कळेना खरंच बाळ्या आलाय का हा पोलीस पाटील जाबडायल लागलाय लगेच हे दोघं उठलं आणि बाळूच्या बकुटीला धरलं गेले तीन महिने फरार आसलेला बाळ्या आपसुकच हाताला लागला होता त्यालाही आता पळून जाता येत नव्हते आता या कोड्याचे सापडणार होते बेबीच्या पोटातील बाळ कुणाचे

आहे याचा निकाल लागणार होता गाडी तालुक्याच्या ठिकाणी पोहचली आणि बाळुला घेऊन पोलीस ठाण्यात गेले.

पोलीस ठाण्यात अंगा पिंडाने जाडजूड आसलेले गोबऱ्या गुटगुटीत गालाचे मिशाळु पी एस आय इनामदार साहेब खुर्चित आरामात बसले होते. त्यांच्या समोर बाळूला संशयित आरोपी म्हणून उभा केले बाळुला पाहुन साहेब म्हणाले "म्हणजे गुन्हा तु केलास तर,आणा रे त्या पोरीला याच लगीनच लाऊया हे च्या बरोबर " "नाही नाही साहेब मी अस काय केलं नाही, तिच्या अंगाला मी हात सुद्धा लावला नाही, आईची शपथ करतो साहेब, माझ्या बायका पोरांच्या डोक्यावर हाथ मारून सांगतो साहेब,मी काय केलं नाही " . बाळु बोलला आणि टेबलाच्या खाली घुसून साहेबांचे पाय धरले पण साहेबांनी त्याला भीक घातली नाही परत साहेब बोलले "अंगठेकर उचला याला आणि थर्ड डिग्री लावा सगळे आरोपी गुन्हेगार सुरवातीला आसेच म्हणतात आणि शेवटी गुन्हा कबूल करतात " साहेब नुसतं बोललं तसं अंगठेकर आणखी दोघांनी बाळुला उचलल आणि एका खोलीत घेतलं आणि बदडायल चालू केल .

त्याने खुप आरडाओरडा केला हातापाया पडला पण त्याला सोडलं नाही कोठडीत बाळुला अर्धमेल केल पण त्यानं गुन्हा कबूल केला नाही. दुसऱ्या दिवशी त्याची बायकु पोर आणली त्यांच्या समोर मारलं तरी ही तो कबूल झाला नाही. तो पोलीस कोठडीत तसाच चार दिवस राहिला आणि मग जिच्या साठी याला हीथं आणलं त्या बेबीला आणली ती सुद्धा याच नाव घेईना शेवटी तीची डॉक्टर तपासनी करून किती महिन्याची पोटुशी आहे हे तपासायचे ठरलं गावातून पोलीस पाटील सरपंच पोरीची आई आलेली होती तिथल्या जोशी नर्सिंग होम मधे पोलीस तिला घेऊन गेले महिला डॉक्टरनी तिची व्यवस्थित तपासून तिचा रिपोर्ट बंद पाकीटातुन दिला तो पोलीसांनी पी एस आय इनामदार साहेबांच्या कडे दिला तो त्यानी वाचला आणि बेल मारली अंगठेकर आत केबीन मधे जाताच साहेब म्हणाले "त्या आरोपीला घेऊन ये" पडत्या फळाची आज्ञा पाळुन अंगठेकर कोठडीत जाऊन बाळुला घेऊन आला तो मार खाऊन इतका बेजार झाला होता त्याला चालायला सुद्धा येत नव्हते .

इनामदार साहेबांनी त्या पोरीची आई पोलीस पाटील सरपंच याना बोलवून घेतलं बाळु

अजून घाबरला होता त्याने परत एकदा साहेबांचे पाय धरले नी म्हणाला "साहेब मला माफ करा, मी गुन्हा केला नाही मला मारू नका" अस म्हणून ढसा ढसा रडायला लागला साहेब म्हणाले "गुन्हा तु केला नाहीस, गुन्हा आम्ही केला आहे तु आम्हाला माफ कर, तुला आम्ही न केलेल्या गुन्ह्याची शिक्षा दीली आहे" साहेबांना हे बोलताना पाहुन सरपंच पोलीस पाटील आणि पोलीस सगळे त्यांच्या कडे बघतच राहिले न रहाऊन पोलीस पाटील म्हणाले "साहेब ह्याने गुन्हा केला नाही मग कुणी केला त्याचे नाव सांगा तेला बकुटीला धरून पोलीस ठाण्यात आणतो" पाटील थांबा गुन्हेगार कोणच नाही कारण ही मुलगी गरोदर नाही, तिला वात सुटली आहे. म्हणून तीचं पोट पुढे आलेल दिसतं तिला दुसराच आजार आहे. तुम्ही सगळेजन बाळुची माफी माझ्या समोर मागा तसं सगळे जन एक वर ऐकवर होऊन त्यानी बाळुची माफी मागितली आणि न घडलेल्या गुन्ह्याची आणि न होणाऱ्या लग्नाची वरात आल्या पावली गावात आली बाळु आपल्या घरात गेला त्याची मुले त्याला बिलगली बायकुने औक्षण केले आणि झाल्या प्रकरणावर पडदा पडला. बाळुचे हॉटेल बंद करून तो आता एम आय डी सी ला वॉचमन म्हणून कामाला जात आहे.

वास्तुटीप्स

- घरामध्ये नकारात्मक शक्ती प्रवेश करू नये म्हणून मुख्य दरवाजाजवळ तुळस असणे आवश्यक आहे.
- दरवाजाच्या चौकटीवर आतून बाहेरून विघ्नहर्त्याची म्हणजेच गणपतीची टाईल्स लावणे आवश्यक आहे.
- घराच्या प्रत्येक रूममध्ये खडे मिठाचा बाऊल ठेवणे .
- आठवड्यांतून एकदा खडे मिठाच्या पाण्याने फरशी पुसणे. यामुळे घरामध्ये सुख समृद्धी राहते.
- मुलांची शैक्षणिक प्रगती चांगली होण्यासाठी त्यांना पूर्वेला डोके आणि पश्चिमेला पाय करून झोपवावे.
- मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी पूर्वेला तोंड करून अभ्यासाला बसवावे .

फळे खाणं बेस्टच

ऋतुमानानुसार बाजारात येणारी फळं फक्त उत्तम आरोग्यच नव्हे, तर सौंदर्यवर्धकही असतात. तसंच ही फळं तुमचं सौंदर्य फुलवण्यास मदत करतात. फळं जशी आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण मानली जातात, तसंच ती सौंदर्यासाठी देखील महत्त्वपूर्ण आहेत.


कैरी : हल्ली कैऱ्या बाजारात दिसायला लागल्यात. आता त्या थोड्या महाग असल्या तरी त्या तुमची त्वचा मुलायम आणि कांतिमान बनवण्यास मदत करणाऱ्या आहेत. एक कैरी उकळवून त्याचा गर चेहरा, गळा, मानेवर चोळा, आणि वाळल्यावर धुवा.

संत्री : संत्र्याची साल उन्हात वाळवून वस्त्रगाळ पूड करून ती दुधात कालवा. हे मिश्रण चेहऱ्यावर लावा. तेलकट त्वचेस याचा फायदा होईल. चेहऱ्याचा रंग उजळण्यास मदत होईल.

काकडी : त्वचा ब्लीच करण्यासाठी याचा रस चेहऱ्यावर चोळावा किंवा चेहऱ्यावर फोडी ठेवा. पंधरा मिनिटांनी चेहरा धुवा..

डाळिंब : पिकलेल्या डाळिंबाचे दाणे चेहऱ्यावर दररोज चोळा. त्वचेचा रंग हलका आणि गुलाबी होण्यास मदत होईल. ओठांवरूनही त्याचा रस फिरवा, ओठांचा रंग सुधारेल. चेहऱ्यावरील डाग घालवण्यासाठी डाळिंबाची साल कच्च्या दुधात वाटा आणि ती पेस्ट चेहरा, मानेवर लावा, सुकल्यावर धुवा.






दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!



साई सिद्धनाथ कन्स्ट्रक्शन





दिवाळी निमित्त
हार्दिक शुभेच्छा!

क्षत्रिय इन्फ्रास्ट्रक्चर
प्रा. लि.



बक्षीस

- साधना झोपे

आरोही सुशांतला म्हणाली, मी आता निश्चित झाली. आता माझा वेळ फक्त माझ्यासाठी, माझ्या आवडीसाठी "म्हणजे इतके वर्ष का तुला आम्ही बांधून ठेवले होते. "

छोटी राही शाळेच्या आवारात येत असताना आपली आई आरोही कुठे दिसते का ते बघत होती. शाळेच्या गेट जवळ आरोही देखील राहीला शोधत होती. राहीचे लक्ष आपल्या आईकडे जाताच ती "मम्मा...मम्मा" करत आईकडे धावत आली. तीने आईला मिठी मारली आणि आईला म्हणाली, "मम्मा, बघ मला बाईंनी काय दिले? " काय दिले? "हे बघ फुल दिले" आपल्या हातातील गुलाबाचे फुल आपल्या आईला दाखवत राही बोलली. "अरे वाह" सुंदर टपोरे गुलाबाचे फुल बघून आरोही बोलली आणि राहीचा फुल हातात घेतलेला फोटो आरोहीने पटकन आपल्या मोबाईल मध्ये काढला. माय-लेकी बोलत बोलत गाडीकडे निघाल्या. गाडीवर बसत राही बोलली, का दिले माहिती आहे का?ठठ का दिले? "अग,मी वर्गात शांत बसली, अजिबात रडली नाही आणि सगळा डबा संपवला म्हणून दिले. " राहीची अखंड रस्ताभर अखंड बडबड सुरू होती, पण रस्त्यावरचे इतर गाड्यांचे आवाज, ट्रॅफिक यामुळे आरोहीचे लक्ष समोर रस्त्यावर होते. मधेच राही बोलली, "मम्मा... मम्मा" राही बाळा, आपण घरी जाऊन बोलू ना. बघ रस्त्यावर किती गर्दी आहे.मला गाडी चालवताना ते बघायला हवे ना! "हो मम्मा, नाही तर ॲक्सिडंट होईल. हो ना? " हो रे बाळा. राही देखील आता शांत बसली आणि समोरच्या रस्त्याकडे बघू लागली. घरी आल्यावर राहीने आपले बुट-मोजे व्यवस्थित शु-रॅक मधे ठेवले. तीन वर्षाची राही पण आरोहीने काही नीटनेटकेपणाच्या साध्या साध्या सवयी राहीला लावल्या होत्या. बाहेरून आल्यावर आपल्या चप्पल, बूट नीट जागेवर

ठेवण्यासाठी जेव्हा आरोही राहीला सांगायची तेव्हा सुशांत म्हणायचा, "अग, किती छोटी आहे ती, तिला काय या सवयी लावते?बालपण जगू दे ना तिला " अहो, मी तिचे बालपण जगू देतेच पण काही साध्या साध्या सवयी असायलाच हव्या आणि काही सवयी बालपणीच लागू शकतात. "बरं बाई तुला हवे ते तू कर. तु थोडंच ऐकणार आहे माझे" आरोहीने वाद नको म्हणून जास्त बोलणे टाळले. राहीने बुट मोजे जागेवर ठेवल्यानंतर आपल्या हातातले फुल टिपॉयवर ठेवले. नंतर आरोहीने तीचे कपडे बदलले. नंतर राही हात पाय तोंड धुवून, पुसून आली तिने बघितले की,आईने ते फूल काचेच्या ग्लासात थोडे पाणी घेऊन त्यात ठेवले होते. तिने आइकडे बघितले आणि विचारले, "मम्मा, तु फुल अजून उद्या पण छान रहावे म्हणून पाण्यात ठेवले का? " हो बाळा. आरोहीने दोघींचे जेवणाचे ताट वाढून घेतले. जेवतांना आरोही बोलली, "आता सांग हळूहळू काय झाले आज स्कूल मधे" मम्मा, आजपण क्लासमध्ये सगळेच रडत होते, मी नाही रडली. "अरे वाह,शाहणं माझं बाळ" आणि टिचरने मला बोलवले आणि विचारले की,तुला poem येते का? "मग" मग मी दि्वंक्ल दि्वंक्ल ची पोऐम म्हणून दाखवली. "मस्त" आणि मी पुर्ण टिफीन पण फिनिश केला " गुणाचे ग माझे बाळ" म्हणून मला prize म्हणून rose चे फुल दिले आणि सर्वांना माझ्यासाठी टाळ्या पण वाजवायला सांगितल्या "खुप छान बेटा" माय



लेकींनी गप्पा करत करत जेवण केले. जेवण झाल्यावर राही आपल्या खेळण्यासोबत खेळत बसली. मागचे सर्व आवरून आरोही राहिला झोपवायला आली तेव्हा ती एका डिश मध्ये राहीच्या आवडीचा फणस घेऊन आली.

"आज माझ्या राधाला स्कूल मधे रोजचे फूल मिळाले टिचर कडून आता मम्माकडून

बक्षीस." वा मम्मा माय फेव्हरेट फणस "आणि अजून एक मम्मा पण आपल्या राधासाठी आज ती स्कूल मधे रडली नाही, तिने पोएम म्हणून दाखवली, टिफीन संपवला म्हणून टाळ्या वाजवणार" आरोहीने पण टाळ्या वाजवल्या तर राहीला खूप आनंद झाला."आता हे पटकन संपव आणि झोप" मम्मा,मी संध्याकाळी पप्पा आल्यावर त्यांना पण दाखवेल फूल "हो" राही खुशीत झोपली. तिच्या चेहऱ्यावरचा निरागस आनंद बघून आरोहीला एकदम भरुन आले.थोडावेळ आराम करून आरोहीने आपली डायरी काढली. ती त्या डायरीत काही विशेष गोष्टी लिहून ठेवत असे. आताही तिने राहीच्या पहिल्या बक्षिसाचे लिहण्यासाठी डायरी काढली. आरोहीसाठी आणि खास करून राहीसाठी ती तिच्या आयुष्यातील विशेष गोष्ट होती. बक्षीस, आज माझ्या लाडक्या राधेला...आरोही राहीला लाडाने राधा म्हणत असे...तिच्या वर्गातील छान वागण्यासाठी गुलाबाचे फूल बक्षीस मिळाले.

गुलाबाचे फूल म्हणजे काही विशेष वस्तू नाही पण तिच्या आयुष्यातील ते अनमोल बक्षीस आहे. शाळेतून बाहेर येत असतांना तिचा तो आनंद ओसंडून वाहणारा चेहरा बघून खूप मनाला समाधान वाटले. घरी आल्यावर तिचे ते वर्गातील बक्षिसाचे वर्णन सांगतांना आनंदीत चेहरा अवर्णनीय होता. ते क्षण कायम फोटोच्या रुपात जपून ठेवणार. खरच कुठलीही गोष्ट असो मग ती लहान असो वा मोठी छान असली की कौतुक हे व्हायलाच हवे. मग ते शब्दातून झाले तरी चालते. डायरी मिटतांना आरोहीच्या डोळ्यात पाणी आले. तेवढ्यात राही उठली. आरोहीचे तिच्याकडे लक्ष नव्हते. पण राहीचे लक्ष गेले आणि आपल्या आईच्या डोळ्यात पाणी बघून ती पटकन आई जवळ आली आणि तिच्या तोंडावर हात फिरवत बोलली, "मम्मा, तू रडतेय? " नाही रे बेटा, मग तुझ्या डोळ्यात पाणी का आले? बेटा,ते तर आनंदाचे आहे तुला आज बक्षीस मिळाले ना! अच्छा,मम्मा,हि काय डायरी आहे. हि डायरी ना मी तुला मोठी झाल्यावर वाचायला देईल. "ओके" चल,आता तोंड धुवून घे.मी दूध देते.

मग अभ्यास करून खेळायला जाऊ "हो,आणि संध्याकाळी पप्पा घरी आल्यावर मी त्यांना माझे बक्षीस दाखवणार" हो मग संध्याकाळी राहीचे बाबा सुशांत घरी आले तेव्हा राही शेजारच्या अमोघकडे खेळायला गेलेली होती. टिपॉय वर काचेच्या ग्लासातील फुलं बघून

त्यांनी आरोहीला विचारले, "अरे वा,आज काही विशेष दिनविशेष आहे का? " नाही, मग आज टिपॉयवर चक्क फूल. अच्छा ते होय,ते तुम्हाला राहीच सांगेल बरं बाबा, तुमच्या मायलेकीचे काहीतरी मेतकूट असेल. राही घरी आल्यावर तिने नेहमीप्रमाणे आधी हातपाय धुतले देवाला नमस्कार केला आणि मग आपल्या बाबांजवळ आली. 'पप्पा,आज ना मला शाळेत हे गुलाबाचे चे फूल बक्षीस म्हणून मिळाले "अरे वाह,पण कशाबद्दल?" राहीने सर्व सविस्तर बाबांना सांगितले. बाबांनी देखील तीचे खूप कौतुक केले आणि तीचा पापा घेत म्हणाले, "हे माझ्याकडून बक्षिस माझ्या लाडोला" दिवस सरत होते राही हळूहळू मोठी होत होती. आरोहीच्या डायरीत आता फक्त राहीच्या आयुष्यातील काही विशेष गोष्टी लिहल्या जात होत्या. राहीचे शिक्षण पूर्ण झाले. तिला छान नोकरी देखील मिळाली. तिच्या सोबत शिकणाऱ्या पार्थवर तिचे प्रेम होते. त्याला देखील चांगल्या पगाराची नोकरी लागली. तो नोकरीत व्यवस्थित सेटल झाल्यानंतर दोन तीन वर्षानंतर दोन्ही कडच्या घरच्यांच्या सहमतीने लग्न झाले. राहीचा सुखाचा संसार सुरू झाला.



आरोही सुशांतला म्हणाली, "मी आता निश्चिंत झाली. आता माझा वेळ फक्त माझ्यासाठी,माझ्या आवडीसाठी " म्हणजे इतके वर्ष का तुला आम्ही बांधून ठेवले होते? नेहमीप्रमाणे सुशांतचे गमतीत पण तिरसट बोलणे होतेच.आरोहीने आता तिकडे पूर्ण दुर्लक्ष करायचे ठरवले. पण काळाला बहुतेक हे मान्य नसावे. दबक्या पावलांनी त्यांनी कॅन्सरच्या रूपात आरोहीच्या आयुष्यात प्रवेश केला आणि झपाट्याने आपले हातपाय पसरवले. काही उपाय करण्याची देखील संधी मिळाली नाही. आरोही आपल्या आठवणी ठेवून अनंताच्या प्रवासाला निघून गेली. एक दिवस राहीला आपल्या आईची डायरी सापडली. ती आपल्या छातीशी पकडत राही बोलली, "मम्मा, तू मला हि डायरी मी मोठी झाल्यावर देणार होती. पण त्या आधीच तू निघून गेली. " ती डायरी चाळत असतांना बक्षीस असे लिहून राहीच्या आयुष्यातील पहिल्या बक्षिसाविषयी लिहले होते आणि तिथे राहीला मिळालेले पहिले बक्षीस गुलाबाचे फूल जपून ठेवलेले होते.

With best compliment from

PIONEER
FOUNDATION ENGINEERS PVT. LTD.

PIONEER FOUNDATION ENGINEERS PVT. LTD.

403, ABHIMAN II, OPP. FOREST OFFICE,
TEEN HATH NAKA THANE (WEST) - 400 602

With best compliment from

Maharera Regi. No. P51700055086
www.maharera.maharashtra.gov.in


AITHANE

GATEWAY TO THE FUTURE

OFFICES DESIGNED FOR ATMANIRBHAR INDIA

A FUTURISTIC COMMERCIAL TOWER IN WAGLE ESTATE, THANE

Wagle Estate, Thane (W) | www.aithane.com,
810810 7554/810810 7546



With best
compliments from

NCC

Limited







NCC House, Madhapur, Hyderabad 500 081
ncclimited.com



With best
compliments from



Venkatesh

Construction co.



Happy Diwali



मुस्कं

- संतराम पाटील


इतक्यात दारात डॉक्टरची गाडी वाजली नी म्हादबा इंजेक्शनच्या सुया धुण्यासाठी गरम पाणी घेऊन यायला कारभारणीला हाक दिली कारभारीण पाणी घेऊन लागलीच आली.

रोहिणी नक्षत्र संपून, नुकतीच मृगाची चाहूल लागली होती. सगळी सृष्टी हिरवाईन नटलेली होती. धरतीवर हिरवी शाल पांघरून घालावी आणि हिरवा साज घालून एखादी ललना नटावी अशीच काय तर अवस्था दिसत होती. रानात भात पिकाच्या कोळपणी चालू होत्या,तर इतर पिके घेण्यासाठी शेताच्या मशागती शेतकरी खुबीने करत होते.

शेताच्या बांधावर हिरवा चारा नुकताच फुटून एक वितभर चारा वाढला होता. अशातच बैलजोडीचे औत घेऊन आपल्या शेतात औत घालायचे म्हणून म्हादबा आपल्या शेतात औत घेऊन गेला होता. त्याच्या शेताच्या बांधावर तर चांगली हिरवीगार वैरण बैलाना खाण्याजोगी आली होती. आज दिवसभर औत करायचं आणि संध्याकाळी औत घेऊन जाताना बांधावरची वैरण कापून घेऊन जायचं असे ठरवून म्हादबा औताला आला होता. सोबती कुळव ,नांगर व्हलपाटा,बांडग गाडीत टाकून बैलगाडी घेऊनच तो शेतात आला होता.

सकाळ सकाळी कोवळी उन्हाची किरणे जमिनीवर आपलं अस्तित्व दाखवत होती. तर आभाळात ढगांची गर्दी सुद्धा मधी मधी जमिनीवर पांघरून धरून येत होती. आज दिवसभर औत संपण्यासारखं नव्हतं म्हणून त्याने गडबडीत गाडीची बैल सोडून औत सामान गाडीतून खाली घेतलं आणि नांगरीला एटाक घालून फाळ लुमने लावले, बांधावर चरत आसलेली बैल आणली आणि नांगरीला जुंपुन नांगरायला चालू केले. एका सरळ रेषेत तासाबरोबर तास घालयला चालू केले सकाळच्या वेळेत जेवणाच्या वेळे पर्यंत कसं तरी नांगरूण पुर्ण केले; पण प्रतेक तासाला बैल बांधावरून परत यायला लागले की चारा खायचे

त्यामुळे औत जरा रखडत चालले म्हणून जवळच आसलेल्या दिवटे आण्णांच्या तळावर जाऊन मुस्की आणली आणि दुपारच्या सत्रासाठी ठेवली. तो पर्यंत म्हादबाची कारभारीण जेवण घेऊन आली होती . ती शेतातल्या आंब्याच्या झाडाखाली जेवणाची बुट्टी ठेवून म्हादबाची वाट बघत बसली



लागलीच म्हादबा भुक्यावला असल्याने त्याने जेवन केलं आणि तिथंच आंब्याच्या झाडाखाली विसावला आणि त्याची कारभारीण आल्या पावली घरला परत गेली. आता दुपार टळत चालली होती म्हादबा उठला ती दोन मुस्की घेऊन बैलांच्या तोंडाला बांधली आणि कुळव जोडून कुळवायला चालू केले. कुळवट थोड्या वेळात पुर्ण झाली रान गुळगुळीत होण्यासाठी व्हलपाटा मारला आणि चाबकाची चाबकी मारली तर ती स्पष्ट उमटल आणि धूळवाफ पेरणी करणाऱ्या माणसाला तिकाटणे ओढणाऱ्या माणसाला तिकाटणे चांगले ओढता येईल असे रान झाल्यावर त्याने औत सोडल सोबत आणलेले औत सामान गाडीत भरलं, बांधावरची वैरण कापली आणि वैरणीचा भारा न बांधता तशीच गाडीत टाकली बैल जोडी गाडीला जुंपून तो घरी गेला.

बैल गाडीची सोडली औत सामान तसेच गाडीत ठेवून बैल गोठ्यात नेऊन बांधले. किनीट पडून अंधार झाल्यामुळे गाडीतील वैरण बैलाना घालुनच बैलाना पाणी ठेवून तसाच घरात निघून गेला. दिवसभर बैला बरोबर हंजाहंजा करून दमल्या मुळे इकतिकडे न फिरता घासभर खाऊन तो निवांत झोपी गेला त्याच्या बरोबर सगळे घर घरातील माणसंही निवांत झोपली.

पण रात्रभर गोठ्यात बैलं थोडी नाचत आसल्याचा आवाज होत होता पण बैलाना डास चिलटे चावत आसतील असं समजून घरचे लोक निवांत झोपूनच होते. एकदाची सकाळ झाली घरचे सगळे लोक उठले आणि रोजची कामं करायला लागले पण म्हादबा घरातला गाडीवान आसल्याने त्याला दोन बैल आणि शेताची मशागत याच्या शिवाय दुसरं काम नव्हतं म्हणून हा निवांत बसून

चहा पाणी पान तंबाखू खावुन बटवा कंबरेला खवून च गोठ्यात गेला. जनावरांच्या पाठीमागे जाऊन शेण मागे ओढले दोन्ही बैल त्याला पहाताच उठून उभी राहिली शेपटी नाचवल्या आणि हंबरून माना हलवू लागली म्हादबाने गोरणीत वाकून बघीतलं तर रात्री टाकलेली वैरण तशीच होती. रात्रभर बैलानी वैरणीची काडी मोडली नव्हती, ते बघून म्हादबा घाबरला काय झाले काय नाही याचा त्याला मागमूसही लागेना तिथून तो बाहेर पडला तो तडक देशी दारूच्या दुकानाकडेच शंभर मीली लावली आणि जनावरांच्या डॉक्टरकडे गेला नि म्हणाला "डॉक्टर साहेब घराकडे यायला लागतय" काय रे–म्हादबा काय काम काढलय "डॉक्टर बोलला" साहेब राच्या पसन बैलानी काडी मोडली नाही तवा जरा तपासून दवा पाणी कराय पायजे "ठीक आहे आलो चल पुढे" असं डॉक्टर म्हणाले आणि म्हादबा हालत डुलत गचक मारत गोठ्यात पोहोचला काय झाले काय नाही कुठे एखादं भुत झपाटलय का अणखी काय झालंय याचा अंदाज घेत होता इतक्यात दारात डॉक्टरची गाडी वाजली नी म्हादबा इंजेक्शनच्या सुया धुण्यासाठी गरम पाणी घेऊन यायला कारभारणीला हाक दिली कारभारीण पाणी घेऊन लागलीच आली .

डॉक्टर गोठ्यात मागच्या बाजूनेच गेले दोन्ही बैलाना तपासून बघीतलं बैलाची तब्बेत नॉरमल होती पण म्हादबाच्या समाधाना साठी दोन्ही बैलाना एक एक इंजेक्शन केलं औषध लिहुन दिली आणि ते आपल्या गाडीकडे जाणार इतक्यात म्हादबाची कारभारीण हौसाने हाक दिली "साहेब चहा ठेवलाय घेऊन जावा" आता झाली का पंचाईत साहेबांची मर्दानी चहाला आणि सुवासनीनी कुंकवाला नाही म्हणायचं नसतं म्हणून साहेब चहाला थांबले म्हादबाने लांबलचक घोंगड अंथरलं आणि चहा येईपर्यंत गप्पा रंगल्या इतक्यात म्हादबा वडील दतुबाबा हजर झाले ते धुळवाफ पेरणी करीता कामाला माणसं सांगायला गेले होते त्यानी घरात डॉक्टर आलेचे पाहुन त्याने साहेबांना विचारले "साहेब कसं काय येण केलं " आलो होतो इथेच तुमच्या बैलानी रात्री वैरण खाली नाही म्हणून म्हादबा आला होता "मग काय झालंय बैलास्नी" काय विशेष नाही आता एक एक इंजेक्शन केलेय थोडी औषधं लिहुन दीलेत तासाभराने खातील वैरण "डॉक्टर बोललाकाल पर्यंत व्यवस्थित आसलेल्या बैलाना काय झालंय दत्तू बाबालाही कळेना दत्तू बाबाने या दोघांच्या

बरोबर चहा घेतला पण त्याला जमीन थारा खाऊ देईना " थांबा डॉक्टर, म्हणून तो गोठ्यात गेला रात्रीची वैरण गोरणीत तशीच होती त्यानी दोन्ही बैलांच्या पाठीवर हात फिरवला तसं दोन्ही बैलानी हंबरडा फोडला इकडे तिकडे बघीतलं म्हादबा जी वैरण रात्री टाकली होती त्या वैरणीतील काही वैरण शिल्लक होती.त्या वैरणीत काय आहे काय ते बघीतले वैरणीला शेणाचा मुताचा वास लागलाय काय बघीतलं सगळे व्यवस्थित होते. आता त्यानी आपला मोर्चा गोरणीकडे वळविला गोरणीत जाऊन एका बैलाची वेसण म्होरकी धरून तोंड उचलून धरलं पहातो तर काय चमत्कार म्हादबाने औताला बैल जुंपत आसताना बैलांच्या तोंडाला बांधलेली मुस्की तशीच होती दारूच्या नशेत मुस्की न सोडता तो वैरण टाकून गेला होता.



त्यामुळे रात्रभर बैलानी चारा पाणी खालं पीले नाही त्यानी लागलीच डॉक्टर आणि म्हादबाला हाक दिली आणि म्हादबाला म्हणाले "राती किती रूपयेची ढोसली होतीस" लय नाही बाबा औतास्न येतायेताच तीस रूपयेची घेतली ती "लय शाना हाईस " काय बाबा,तुला मी घेतलेली दारू गोरणीत दिसती व्हय "व्हय रं,सुकाळीच्या त्या दारूच्या नादात त्या बैलांच्या तोंडाला घातलेली मुस्की सोडाय नाहीस नी ती वैरण कशी खाणार नी पाणी कशी पिणार" हे शब्द ऐकून डॉक्टर सुद्धा लगोलग गोरणीत आले पहातो तर काय बैलांच्या तोंडाला मुस्की बांधलेली तशीच होती आणि ते न पहाता मी ही इंजेक्शन देऊन रिकामा झालो हे कसं घडल विचारात आसताना दत्तु बाबा म्हणाले "काय हो डॉक्टर तुम्ही कसलं डॉक्टर पेशंटला अर्धमुर्ध तपासून इंजेक्शन देता हे बरं न्हव" हे ऐकून डॉक्टर ही तोंडात मारले सारखं होऊन आपली जीभ चावत आपल्या गाडीकडे गेला किक मारून सुसाट सुटला आणि दत्तु बाबाने म्हादबाला शिवांची लाखोली वहात बैलांच्या तोंडाला बांधलेली मुस्की सोडली त्याना पाणी पाजले वैरण टाकली आणि गोरणीतून बाहेर आला पण म्हादबा मात्र दत्तुबाबाकडे आरोपीच्या पिंजऱ्यात उभे रहावून एकटक पहात उभा होता आपली नजर शुन्यात लावून...

ओम पब्लिकेशन

- इन्फो डायरी (वैविधपूर्ण माहिती संकलन)
  संपादक / संकलन - डॉ. विलास ज. पवार
- जल - आशय (महाराष्ट्रातील धरण, पाटबंधारे,
  जल संधारण, जल विद्युत अर्थातच संपूर्ण पणे पाणी
  या विषयाला वाहिलेला ग्रंथ.)
  लेखक - राघवेंद्र कुलकर्णी आणि डॉ. विलास ज. पवार
- कल्पतरु युवा - युवा पिढीसाठी दिवाळी अंक
- सुरक्षा अभियान - सुरक्षा या विषयाला वाहिलेले वार्षिक
- सखी संवादिका - फक्त महिलांसाठी दिवाळी अंक
  संपादक - विशाखा पवार
- श्री - गणेश पूजा आणि आरती संग्रह
  संपादक / संकलन - डॉ. विलास ज. पवार
- श्री लक्ष्मीपूजन - श्री लक्ष्मी, कुबेर पूजा आणि कथा, मंत्र संग्रह
- ड्रिंक्स ॲन्ड डाईन -मिनी कॉफी टेबल बुक (मराठी आणि इंग्रजी)
  लेखक -डॉ. विलास पवार

दिवाळी अंकाच्या संपादनासाठी सहाय्य
कथा/कविता/कांदबरी/आत्मचरित्र इत्यादी पुस्तकांच्या
प्रकाशनासाठी सक्रिय मार्गदर्शन


संर्पक

एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे फोन नं. ०२२- ६९३०९१९७

E-mail : vilaspawar@ompublication.com

With best compliment from

MAHARERA No. P51700080549



Address - Plot No. B-59, Ambica Nagar, Wagle Industrial Estate, Thane West - 400604

With best compliments from

CSS

Cyber Safe Society
सायबर सेफ सोसायटी

Founder / Chairman

Dr.Vilas Pawar

Office : M - 3, Paradise Tower, Gokhale Road, Naupada, Thane (W.) - 400 602.
E-mail: vilaspawar234@gmail.com

✆ ०२२-६९३०९१९७ / ९८२११६१६६२

इमानी

- नेहा उजाळे

आबांची सगळी कार्य पार पडली. तेराव्याला गावजेवण घातले गेले. जो तो नंतर आपल्या कामात व्यग्र झाला. सगळे नातेवाईक हळूहळू पांगले. राघवच्या बहिणी सासरी निघताना राघवला भरून आले.

"सुनंदा ए सुनंदा, राघू कुठं हाय?" आबांनी माईंना हाक मारली तशा माई ताबडतोब त्यांच्या पुढ्यात येऊन उभ्या राहिल्या. "काय झालं वो? राघू त्यो काय गोठ्यामंदी हाये. गुरांना चारा घालतुया." माई म्हणाल्या. "बरं! आसुदे आसुदे. सुनंदा आपला राघू लईच सादा हाये म्हनून त्याची चिंता वाटत राहती. कामाला वाघ हाये पर बोलायला शेळी हाये. दुनिया लय वंगाळ हाय लोक फसवित्यात अशा वागण्यानं. जगाचा काय बी अनुभव न्हाई त्यासनी. आपल्या माघारी कस होणार पोराचं हा इचार डोचक्यात घोळीत राहतुया नेमीच." आबा म्हणाले. बोलतां बोलतां आबांचा चेहरा जरा चिंताग्रस्त झाला.

"काय झालया? कोन बोललं का त्यासनी?" माईंनी विचारलं.

"म्या हाय तोवर कोनाची बिशाद हाये त्याला काय बोलाया? पन माझ्या माघारी कस व्हईल त्याचं? काल सकाळच्याला खालच्या आळीतल्या रामू आन सूर्याची लईच जुंपली व्हती. रामूनं सूर्यास्नी ढकललं तर त्यो दगडावर आपटला. सूर्याचं रगत व्ह्यायाला लागलं. राघू तिकडंच व्हता. त्यानं फकस्त येक दोन येळ समजिवलं त्या दोगास्नी पर त्या दोगांनी बी ऐकलं न्हाई त्याचं. आवाजात जरब असाया लागती मानसाच्या. शेवटाला मला बोलिवलं तिकडं. म्या आवाज चढिवल्यावर दोगबी गपगार झालं. म्या रामुलाच बोललो की सूर्याला दवाखान्यामंदी तूच न्यायच. समदा खर्च बी तूच करायचा. गपगुमान घ्येवुन ग्येला त्यो सूर्यास्नी डाक्टरकडं." आबा म्हणाले.

"तुमी हायेसा म्हनून राघू येवढं लक्ष्य घालीत न्हाई. समजतं त्यासनी समद. करल त्यो

तुमच्यावानी समद आन तुमी कशापाई निर्वानीची भाषा करतासा?" माई म्हणाल्या. "म्या काय आज हाये आन उद्या न्हाई. राघूस्नी आयुशभर तर संगत न्हाई ना माझी. सुनंदा, वाईच निंबूपानी दे. सकाळधरंन लई जीव घाबरल्यागत झालाय." आबा म्हणाले.

"वाईच दम धरा, आनते." माई म्हणाल्या.

माईंनी गडबडीत जाऊन लिंबूपाणी आणलं; पण त्या आबांजवळ आल्यावर आबा झोपाळ्यावरून खाली जमिनीवर कोसळले. माईंच्या काळजात धस्स झालं. त्यांनी त्यांच्या मुलाला आणि सुनेला जोरजोरात हाका मारल्या, 9"आरं! राघू, पल्लवी अदूगर या इकडं, आबा पलं, उठीत न्हाईत."

राघव, पल्लवी दोघे धावत आले. आबा काहीचं हालचाल करत नव्हते. राघवने आबांच्या तोंडावर पाणी शिंपडले तरीही आबा शुद्धीवर येईनात. राघवने लागलीच डॉक्टरांना बोलावणं पाठवले. डॉक्टरांनी आबांना तपासून आबा गेल्याचे सांगितले आणि वाड्यावर एकच गोंधळ माजला.

सगळी नातेवाईक मंडळी, राघवच्या दोन विवाहित बहिणी त्यांच्या कुटुंबासकट आल्या. अख्खा गाव वाड्यावर लोटला. ज्याच्या त्याच्या मनाला आबा गेल्याचे दुःख वाटत होते. आबा होतेच तसे. कोणी कुठल्याही प्रकारची मदत मागितली तरी ते तत्परतेने करत. त्यांचा गावात दरारा पण होता. कोणामध्ये तंटा असला की न्याय करायला आबांजवळ येत. कोणीही त्यांचा शब्द खाली पडू द्यायचा नाही. खूप मान होता गावात त्यांना. असा देवमाणूस इतक्या तडकाफडकी गेला याबद्दल सर्व हळहळत होते.

त्यांच्या चितेला अग्नी दिला तेव्हा शोककळा पसरली.

आबांची सगळी कार्य पार पडली. तेराव्याला गावजेवण घातले गेले. जो तो नंतर आपल्या कामात व्यग्र झाला. सगळे नातेवाईक हळूहळू पांगले. राघवच्या बहिणी सासरी निघताना राघवला भरून आले. "कमल ताई, विमल ताई येत जावा अदनंमदनं. आबा तर न्हाई राहीलं पर ह्यो तुमचा भाव हाय तुमचं माह्येरपन कराया." राघव असे बोलल्यावर दोघी बहिणी त्याला मिठी मारून रडू लागल्या. "राघू! सवताची आन माईची काळजी घे रं बाबा. पल्लवी दोन जीवाची हाये तिची बी काळजी घ्ये.

काय बी लागल सवरलं तर सांग आमास्नी." माईंना नमस्कार करून पदराने डोळे पुसत राघूच्या बहिणी सासरी जायला निघाल्या. पंधरा–वीस दिवस बहिणी आणि त्यांची मुले वाड्यावर असल्याने घर भरलेले होते आता ते लोकं गेल्यावर घर एकदम सामसूम झाले होते. आबांना जाऊन आता महिना होत आला. केशवमामांनी वाड्यावर एक चक्कर मारायचे ठरविले. त्यांच्या मनात आले की, आता आबा नसल्याने राघूला मोठ्या माणसाचा आधार नाही. राघू अजून तिशीत पण पोहचला नव्हता त्यामुळे त्याला जगाचे इतके ज्ञान नसेल. त्याला काय मदत हवी असेल तर पाहायला पाहिजे. त्यानिमित्ताने बहिणीला भेटता येईल आणि केशवमामांची मुलगी राघूला दिलेली तर लेकीचीही भेट होईल. केशवमामा वाड्यावर पोहचले तर राघव ओटीवर डोक्याला हात लावून बसलेला. तो खूपच चिंताग्रस्त वाटत होता.

"काय रं? हितं असा का बसलासा? आता तुलाच समदा व्याप निस्तरायचाय. तू असा बसलासा तर कसं चालंल रं बाबा?" केशवमामा गरजले.

मामांना बघून राघू लगबगीनं उठला. "पल्लवी! बघ कोन आलंया, वाईच गुळपानी आन. मामा, बरं झालं तुमी आलासा. मेहनत कराया म्या मागपुढं न्हाई हटणार. शेतामंदी सोनं उगवन. पर येक चिंता पडली हाय." राघू म्हणाला.

"आता रं कनची चिंता पडलीया तुला मर्दा?" केशवमामा म्हणाले.

"मामा! आतापावतूर आबा समदं यवहार बघीत व्हतं, म्या कंदी लक्श घातलं न्हाई. आबांनी किती लोकांस्नी किती पैसं दिलंत काय बी ठावं न्हाई, महिन्यातंन येक वेळ आबा जायचं आन व्याज वसूल करायचं. आबांच्या तेराव्याला समदं गाव जेवलं पर येक बी मानुस पुढं येवून बोललं न्हाई की आबांचं इतकं इतकं पैस हायेत माज्याकडं. आबांनी कुठं लिवून बी ठिवंल न्हाई, काय बी सुधरंना झालंया, आता तुमीच कायतरी तरकीब हुडका." राघू आशेने म्हणाला. केशवमामा विचार करू लागले. यातून कसा मार्ग काढायचा आणि राघूला त्याचे पैसे कसे मिळवून द्यायचे. खूप विचार केल्यावर अचानक त्यांना एक भन्नाट कल्पना सुचली.

"राघू, चल बैलं जुंप गाडीला आनी गावाकडं जा." मामांनी फर्मान सोडले.

"त्यानं काय व्हनार?" राघूला प्रश्न

पडला.

"म्या सांगतोय न्हवं तस कर."



केशवमामा म्हणाले.

"मंग तुमी बी चला माझ्यासंगत." राघूने दोन्ही बैलं गाडीला जुंपले.दोघे मामाभाचे निघाले गावाकडे.

एका घराकडे बैलगाडी थांबली. राघूने बैलं हाकण्याचा प्रयत्न केला तरीही बैलं पुढे जाईचना. दोघांना प्रश्न पडला ही बैलं असे काय करत आहेत?

मामांच्या लक्षात आले, "आरं! ह्या घरातून पैसं द्येत आसतील आबास्नी, उतर आन कर वसुली." राघूला पाहून मुकाट्याने त्या घरातून पैसे दिले गेले. पुढे ज्या ज्या घराजवळ बैलगाडी थांबे तिथल्या घरातील लोकं राघवला व्याज देत होते.

दोन तासांत सगळी वसुली पूर्ण झाली. राघू मामांच्या हुशारीवर खुश झाला. दोघे आता परत माघारी वाड्याकडे जायला निघाले. "त्ये न्हवं मामा, तुमास्नी कसं काय ध्यानात आलं? लई भारी तरकीब हुडकलीत." राघू म्हणाला.

"आरं बाबा! येक वेळ मानसं बेइमान व्हत्यात, पर जनावर इमानी अस्त्यात. मानसांपावतूर लई अक्कल असती त्यासनी. फकस्त त्यासनी बोलता येत न्हाई. आबांसंगत वसुली कराया ही मुकी जनावरं बी जात व्हती, तवा त्यासनी आबा जिथं जायचं ती समदी घरं ठावं झाली व्हती. तूच पाह्यलं न्हवं कस इमानान काम केलया त्यानी. मुक्या जनावरांना काय बी शिकवावं लागत न्हाई. त्यांसनी फकस्त येवढंच माहीत असतंया आपल्या मालकाशी इमान राखायाचं." केशवमामा म्हणाले. राघू प्रेमाने बैलांजवळ गेला. त्यांना पाणी प्यायला दिले आणि मायेने त्यांच्या तोंडावरून हात फिरवला आणि बोलला, "माजं लईच गुनाचं हायेत सोन्या आन हिऱ्या. आज तुमी इमानाला जागलात. लई म्हनजे लईच उपकार झालं तुमचं. आज तुमी माज्यासाठी देवदूत बनलात. चला घरंला आज पुरनावरनाचं चारतो तुमास्नी."

कर्जाचा दगड

- निलेश बामणे

कारण या कर्जाच्या दहा पट पैसे तू लाथाडले होतेस... तीच तुझ्या आयुष्यातील सर्वात मोठी चूक होती. आता तुला फक्त तुझी चूक सुधारायची आहे

विजयने आजच मोबाईलवर एका अर्थतज्ज्ञ असणाऱ्या व्यक्तीची मुलाखत पाहिली. त्यात ती व्यक्ती म्हणाली की, कर्ज घेणे म्हणजे उंच डोंगरावरून एक मोठा दगड खाली ढकलण्यासारखे आहे आणि कर्ज फेडणे म्हणजे तोच ढकलल्यावर खाली आलेला दगड पुन्हा डोंगरावर नेण्याचा प्रयत्न करण्यासारखे आहे. ती व्यक्ती किती छोटे उदाहरण देऊन किती मोठी गोष्ट सांगून गेलेली होती.पाच वर्षांपूर्वी विजयच्या डोक्यावर एक रुपयाचेही कर्ज नव्हते. तो अविवाहित असल्यामुळे आणि घरची कोणाची सध्या फारशी जबाबदारी नसल्यामुळे तो त्याच्यापुरता त्याचा आनंद शोधत, त्याला पुरतील इतकेच पैसे कमावून सुखाने, आनंदाने जीवन जगत होता. अगदी लहान वयात त्याने त्याच्या कुटुंबाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली होती. त्यावेळी त्याने काबाडकष्ट केलेले होते. बाळपण आणि तारुण्य कधी त्याला मनसोक्त जगता आलेले नव्हते. त्याला वाटले होते, ज्या कुटुंबासाठी तो झिजतो आहे, ते कुटुंब भविष्यात त्याच्या कामी येईल आणि त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील. त्यामुळे त्याचे कुटुंब आणि कुटुंबातील व्यक्ती आर्थिकदृष्ट्या स्थिर झाल्यावर त्याने पैशाचा फार विचार करणे सोडून दिले. त्याच्यासाठी फार धावाधाव करणेही सोडून दिले. आपल्या आवडीचे काम, आपल्या हव्या तेवढ्या वेळ करायचे, हवे तेवढेच पैसे कमवायचे, हे त्याच्यासाठी नित्याचे झाले होते.त्याने स्वतःच्या भविष्याचा विचार करून एक रुपयाचीही गुंतवणूक केलेली नव्हती. ना सोने–नाणे जमा केले होते. त्याला ठाम विश्वास होता की, त्याच्या वेळेला त्याचे कुटुंब नक्की त्याला साथ देईल. जेव्हा त्याच्याकडे पैसा होता, तेव्हा तो खर्च करताना त्याने एका क्षणाचाही विचार केलेला नव्हता. असेही म्हणता

येईल की, त्याने लक्ष्मीपेक्षा सरस्वतीला अधिक महत्त्व दिले होते. नंतर कोरोना आला. कोरोना येऊन गेल्यावर अचानक त्याला पायाचा त्रास सुरू झाला. त्यामुळे त्याच्या चालण्या–फिरण्यावर आणि फार वेळ उभे राहण्यावर निर्बंध आले. त्यामुळे त्याला त्याच्या हातातील काम सोडावे लागले, ज्यातून त्याचा खर्च बऱ्यापैकी निघत होता. ती नोकरी नाईलाजाने त्याला सोडावी लागली. त्याचे कुटुंब त्याला दोन वेळचे वेळेवर जेवायला देण्याइतके सधन झालेले होते. पण कोणावर अवलंबून राहणे त्याच्या रक्तातच नव्हते. त्यामुळे त्याने एक दुकान सुरू केले. त्या दुकानाचे डिपॉझिट देण्यासाठी आणि दुकानात गुंतवणूक करण्यासाठी त्याने बँकेतून कर्ज घेतले.त्याला वाटले होते की, ते कर्ज तो सहज फेडू शकेल; पण ते कर्ज फिटलेच नाही. कारण दुकानातून येणारे पैसे दुकानाचे भाडे, लाईट बिल, त्याचा औषधाचा खर्च, मोबाईलचे बिल यावरच खर्च होत होते.आता ते कर्ज फेडण्यासाठी त्याने एका मोबाईल अॅपमधून कर्ज घेतले. ते कर्ज फेडण्यासाठी दुसऱ्या मोबाईल अॅपमधून कर्ज घेतले. करता करता त्याच्या डोक्यावर तीन वर्षांत भलेमोठे नाही म्हणता येणार नाही, पण ते फेडायला त्याला निदान दोन वर्षे तरी लागतील इतके कर्ज झाले. हा! हा! म्हणता दुकानाला तीन वर्षे झाली; पण त्याचे उत्पन्न काही वाढायचे नाव घेत नव्हते. म्हणजे ते वाढवण्यासाठी विजय स्वतः असे काही खास प्रयत्न करत नव्हता, कारण ते दुकान तो नाईलाजाने चालवत होता. ते



त्याच्या आवडीचे काम नव्हते. त्या कामात त्याचे मन रमत नव्हते कारण त्या दुकानात त्याच्या आयुष्यातील तीन वर्षे त्याच्या आयुष्यात काहीही खास न घडता निघून गेलेली होती. त्या तीन वर्षांत त्याच्या हातून खास म्हणावे असे काहीच घडलेले नव्हते. त्याचा त्याला अधिक त्रास होत होता.त्याच्या डोक्यावर आता इतके कर्ज झालेले होते की, आता त्या कर्जाचे हप्ते फेडणे म्हणजे तारेवरची कसरत करण्यासारखे झाले होते. चौथ्या वर्षी त्याच्या पायात थोडी सुधारणा होते न होते, तोच त्याच्या हाताचे दुखणे सुरू झाले. त्यामुळे त्याला नाईलाजाने दुकान बंद करून एखादी छोटीशी नोकरी करण्याचा विचारही सोडावा लागला.आता त्याचे दुकानातील कामही मंदावले. औषधाचा आणि डॉक्टरांचा खर्चही वाढला. घरातून कोणी

काही आर्थिक मदत केली नाही. म्हणजे नेमके त्याच वेळी त्याच्या कुटुंबातील इतर व्यक्तींचीही आर्थिक परिस्थिती नाजूक झाली होती.अनेक महिन्यांचे दुकानाचे भाडे थकले होते. ते देण्यासाठी आणखी एका अॅपमधून लोन! लोनवर लोन, त्याचे हप्त्यावर हप्ते! त्याचा महिना हप्ते फेडण्याचा



विचार करण्यात आणि त्या हप्त्यांचे पैसे उभे करण्यातच जाऊ लागला.त्याला स्वत:कडे आणि स्वत:च्या कामधंद्याकडे लक्ष द्यायला निवांत असा वेळच मिळत नव्हता. त्यामुळे त्याचे उत्पन्न दिवसेंदिवस वाढण्याऐवजी कमीच होत चाललेले होते. चार वर्षांत दुकानाचे वाढलेले भाडे आणि महाग झालेल्या इतर गोष्टी यामुळे त्याच्याकडे फारसे काही पैसे शिल्लक राहत नव्हते. त्यामुळे सध्या त्याचे जे काही सुरू होते, ते कर्जाच्या पैशावर! आज विजयने आणखी एक बातमी वाचली होती. त्या बातमीचा आशय असा होता की, देशातील मध्यमवर्गाचे आयुष्य कर्ज काढून चाललेले आहे. बहुतेक हे खरे असावे, याची विजयला खात्री पटली. विजयच्या मनात आता हा विचार येत होता की, एकच मोठे कर्ज काढून ही वेगवेगळी कर्जे एकदाच फेडून टाकायची आणि काय तो एकच कर्जाचा हप्ता फेडण्यासाठी दुकान बंद करून मिळेल ती नोकरी करावी.पण अनेक अॅपमधून लोन घेतल्यामुळे त्याचा सिबिल खराब झाला. ज्यामुळे त्याला कोणी मोठे, कमी व्याजाचे, अधिक अवधीत फेडता येईल असे कर्ज द्यायलाही तयार नव्हते. त्यात आता त्याच्याकडे पैसे उभे करण्याचा असा कोणताच मार्ग नव्हता.त्याने हात पसरले तर त्याला पैसे देणारे खूप आहेत; पण ते करायला त्याचे मन धजावत नव्हते. तरीही नाईलाजाने त्याला त्याच्या एका नातेवाईकाची मदत घ्यावी लागली, कारण प्रश्न त्याच्या इज्जतीचा निर्माण झाला होता. विजयची त्याच्या स्वाभिमानासाठी लाखाला दोन लाख देण्याचीही तयारी होती. कारण लाखो रुपयांवर त्याने सहज

पाणी सोडलेले होते.आता त्याला त्याची चूक कळली होती. त्याने योग्य वेळी, जेव्हा लक्ष्मीमाता त्याच्यावर प्रसन्न होती, तेव्हा तिचा आदर केला नव्हता. त्या चुकीचीच शिक्षा तो भोगत होता.आता त्याच्यावर अशी वेळ आली आहे की, रोज सकाळी, संध्याकाळी आणि रात्रीही त्याच्या डोक्यात तिचाच विचार असतो. पण आता ती काही त्याच्यावर प्रसन्न होण्याचे नाव घेत नाही. कदाचित हा त्याचा परीक्षेचा काळ आहे अथवा त्याचे भविष्य सुरक्षित व्हावे म्हणून नियतीने टाकलेला डाव आहे. पूर्वी पैशाचा फार विचार न करणारा विजय आता दिवसरात्र पैशाचाच विचार करत असतो. पैशाच्या बाबतीत आपण आपल्या आयुष्यात कोठे कोठे, कसा कसा गाढवपणा केला, हे आठवून तो स्वतःच्याच गाढवपणावर हसत असतो.आज विजयवर जे आर्थिक संकट आलेले आहे, ते आले नाही; त्याने ओढावून घेतलेले आहे. तो त्याच्या भविष्याचा आर्थिक भार त्याच्या कुटुंबातील व्यक्तींच्या खांद्यावर टाकण्याचा विचार करत होता. त्याने कुटुंबासाठी जे केले, त्या बदल्यात; पण तो हे विसरला होता की, हे कलियुग आहे. कलियुगात तुम्ही कोणासाठी काय केले, यापेक्षा आता तुमच्याकडे काय आहे, याला अधिक महत्त्व दिले जाते. तुमच्याजवळ असणारे पैसे कमी झाले की, तुमचा मानही कमी होतो. कारण हल्ली मान मिळवायला आणि तो टिकवायलाही पैसा खर्च करावा लागतो.आज विजयला आर्थिक टंचाईमुळे ज्या छोट्या-छोट्या गोष्टींबाबत तडजोड करावी लागते आहे, ती त्याला कधी करावी लागेल, असा त्याने कधी



स्वप्नातही विचार केलेला नव्हता. पण आता तो विचार तो करणार होता. जगण्यातील आनंद मिळविण्यासाठी कितीही नाही म्हटले तरी पैसा हा लागतोच! इतरांची मदत करायची असेल तर अगोदर स्वतःला इतरांची मदत करण्याच्या लायक बनवावे लागते.आता विजयवर इतरांची मदत घेण्याची वेळ आलेली होती. नाहीतर त्याचे

आयुष्य लोकांना मदत करण्यात खर्च झालेले होते. त्याने त्याच्या आयुष्यात फक्त एकच चूक केली होती. ती म्हणजे त्याने लक्ष्मीमातेचा आदर केला नाही.विजयने घेतलेल्या कर्जातील एक पैसाही कोणत्याही चुकीच्या कार्यासाठी वापरलेला नव्हता. त्याने मनात आणले तर ते कर्ज तो अवघ्या काही महिन्यांतही फेडू शकतो; पण त्यासाठी त्याला त्याचा स्वाभिमान गहाण ठेवावा लागेल, जे त्याला कदापि मान्य नव्हते. त्यामुळे कर्ज फेडण्यासाठी करावी लागणारी तारेवरची कसरत तो करतच राहणार होता.पण आता त्याला पैशाचे आणि पैशाच्या बचतीचे महत्त्व कळल्यामुळे पैशाच्या बाबतीत त्याने मागे ज्या काही चुका केलेल्या आहेत, त्या पुन्हा करणार नव्हता.आता त्याच्या डोक्यावर चढलेले कर्ज कसे लवकरात लवकर फेडायचे, हा एकच विचार त्याच्या डोक्यात आहे. त्यामुळे यापुढे तो एक रुपयाही खर्च करताना विचार करून करणार होता आणि कोणाला एक रुपयाही सोडताना विचार करून सोडणार होता.ज्या काम केल्याने खात्रीलायक पैसे मिळणार असतील, असेच काम करण्यात आपला बहुमूल्य वेळ खर्ची घालणार होता.आता त्याला त्याचे आरोग्यही सांभाळावे लागणार होते. ते म्हणतात ना, "सर सलामत तो पगडी पचास! " आता त्याला जाणीव झाली होती की, कर्जाच्या बाबतीत तो एका चक्रव्यूहात अडकला होता. त्याच्याकडे उत्पन्नाचे कायमस्वरूपी स्रोत असते, तर तो इतका घाबरला नसता; पण आता कर्ज फेडण्याच्या बाबतीत त्याला त्याच्या नशिबावर आणि दैवावर अवलंबून राहावे लागणार होते.कारण त्याने आयुष्यभर चांगुलपणाने, गाढवासारखी प्रामाणिक मेहनत करूनही त्याचे दोन्ही हात रिकामे होते. डोक्यावर डोंगराएवढे कर्ज होते आणि भविष्य अंधारमय होते. तरीही त्याने स्वतःला समजावले हे कर्ज तुझ्यासाठी क्षुल्लक आहे. कारण या कर्जाच्या दहा पट पैसे तू लाथाडले होतेस... तीच तुझ्या आयुष्यातील सर्वात मोठी चूक होती. आता तुला फक्त तुझी चूक सुधारायची आहे.तुझ्यावर आलेली वेळ ही तुला धडा शिकवून तुझे भविष्य सुरक्षित करण्यासाठी आलेली आहे. हे तुलाही माहीत आहे...भविष्य कोणालाही बदलता येत नाही... तसे ते तुलाही बदलता आले नाही. त्यामुळे आता तुला भविष्यावरच स्वार व्हावे लागेल...हा कर्जाचा दगड तुला पुन्हा डोंगरावर न्यावाच लागेल..

बाटलीच्या झाकणाचा रंग आणि त्याचा अर्थ काय? जाणून घेऊ.

दुकानातून पाणी विकत घेताना तुम्ही वेगवेगळ्या ब्रँड्सच्या पाण्याची बाटली पाहिली असेल. ज्याच्या झाकणांचा रंग हा निळा, हिरवा, पिवळा, काळा असल्याचं तुम्ही पाहिलं असेल. अनेकांना वाटतं की हा ब्रँडच्या रंगामुळे त्याच्या बाटलीचा आणि त्याचा झाकणाचा रंग वेगवेगळा असतो पण असं नाही, हा तुमचा चुकीचा समज आहे.

खरंतर पाण्याच्या बाटलीवरील झाकणाचा रंग काहीतरी महित्वाची सूचना देत असतं, ज्याकडे आपण दुर्लक्ष करतो.

१. पांढरं झाकण : मशीन फिल्टर्ड वॉटर

पांढ्रया रंगाच्या झाकणाची बाटली म्हणजे हे पाणी मशीनद्वारे किंवा आरओ प्लांटमधून फिल्टर करून भरलेलं आहे. हे पाणीही प्यायला योग्य असतं, मात्र मिनरल्सची मात्रा थोडी कमी असते.

२. हिरवं झाकण : फ्लेवर्ड वॉटर

हिरव्या रंगाच्या झाकणाच्या बाटल्यांमध्ये फ्लेवर्स मिसळलेले असतात. चव बदलण्यासाठी हे पाणी वापरलं जातं. मिनरल वॉटरइतकं हे शुद्ध नाही, पण हे पाणी सुरक्षित असतं.

३. निळं झाकण : मिनरल वॉटर

जर तुम्ही निळ्या रंगाच्या झाकणाची बाटली घेतली असेल, तर त्याचा अर्थ असा की हे पाणी नैसर्गिक झ्रयातून किंवा मिनरल सोर्समधून आणलेलं आहे. हे पाणी आरोग्यासाठी सर्वांत चांगलं मानलं जातं.

४. काळं झाकण : अल्कलाइन वॉटर

काळ्या झाकणाच्या बाटल्यांमध्ये अल्कलाइन वॉटर असतं, ज्यामध्ये भरपूर मिनरल्स असतात. हे पाणी महाग असतं आणि जगभरातील खेळाडू आणि सेलिब्रिटी हेच पाणी पिणं पसंत करतात.

५. पिवळं झाकण : विटामिन वॉटर

पिवळ्या रंगाच्या झाकणाची बाटली म्हणजे विटामिन्स आणि इलेक्ट्रोलाइट्सनी समृद्ध असलेलं पाणी. हे पाणी शरीराला ऊर्जा देण्यासाठी आणि हेल्दी राहण्यासाठी उपयुक्त आहे.

पुढच्या वेळेस तुम्ही बाहेर पाणीची बाटली खरेदी करताना या झाकणांच्या रंगाकडे नक्की लक्ष द्या. सील तपासा, एक्सपायरी डेट पाहा आणि मुलांनाही ही माहिती सांगा, जेणेकरून त्यांनाही सुरक्षित आणि योग्य पाणी निवडता येईल.

सुरक्षाविषयक कार्य करणारी स्वयंसेवी संस्था

सुरक्षा अभियान

ट्रस्ट नोंदणी क्र. इ-३९५०

रस्ता सुरक्षेविषयक कार्य करण्याच्या रस्ता सुरक्षा व अन्य सुरक्षाविषयी बाबत जाणून घ्यायचे असेल व या क्षेत्रात कार्य करायचे असेल तर संपर्क साधावा :

संस्थापक / अध्यक्ष

डॉ. विलास ज. पवार

ऑफिस : एम - ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) -४०० ६०२

✆ ०२२-६९३०९१९७ / ९८२११६१६६२

For Crises management, Concept Marketing,
Media Management, Event Management, Public Relation &
Other Managing ability and Challenging Works.



Avidmedia
Management & marketing Pvt. Ltd.

Contacts:
022-69309197, Cell - 9167785599

सतीचं वाण

- भारती सावंत

निर्मलाबाईंनी नेहमीप्रमाणे गोड शब्दांत भाषण करून वाण लुटण्यासाठी सर्व सुवासिनींना रांगेतुन येण्यास सांगितले. तर त्यांच्या बाजूला उभे राहून नोकर त्यांच्या हातात साडीचोळी, नारळ

आज शहरातील प्रतिष्ठित असणाऱ्या निर्मलाबाई देशमुखांनी मकरसंक्रांतीचे हळदीकुंकू ठेवले होते. एका माळ्यावरचे चारी फ्लॅट त्यांच्या मालकीचे. त्यांचे यजमान रघुनाथराव देशमुखांनी मंत्रिपदातून भरपूर माया जमा केली होती हे जगजाहीर होते. पण त्यांच्या दानशूर आणि प्रेमळवृत्तीमुळे ते कधीच गोत्यात आले नव्हते, म्हणजे त्यांनी तशी काळजीच घेतली होती. त्यांची दोन्ही मुले होतकरू निघाली होती. राम आणि कुशल, रामायणातल्या बंधूप्रेमाची जोडीच जणू! दोघांनी इंजिनीअरिंग पूर्ण करून सरकारी खात्यात नोकऱ्या मिळवल्या होत्या. त्यांनी आपल्या बाबांसारखे उच्चपदावरील मंत्रीपद न स्वीकारता शासकीय नोकऱ्या पत्करलेल्या होत्या. दोघेही हुशार आणि मेहनती होते.

निर्मलाबाई मध्यमवर्गीय माहेरातून आलेल्या. त्यांनी बालपणापासून मुलांना सुसंस्कारांचे बाळकडू पाजले होते. त्या आपल्या मुलांच्या सर्व हालचालींवर बारीक लक्ष ठेवून असत. मुलांना पॉकेटमनी मोजकाच मिळे. त्यामुळे निर्मलाबाईंचे यजमान रघुनाथराव देशमुख जरी मोठ्या पदावर होते तरी मुलांना घमेंड नव्हती. आईच्या छत्रछायेखाली मुलांनी आपले सर्व शिक्षण पूर्ण केले होते.

हल्ली मात्र निर्मलाबाई जास्तच सुखावल्या होत्या. दोन्ही सुना मोठ्या घरातील मिळाल्याने पाहुणेपै देखील श्रीमंत घरातील होते. दोन्ही सुना उच्चविद्याविभूषित होत्या. दोघीही महत्त्वाकांक्षी असल्याने त्या नोकरीसाठी घराबाहेर पडत. घरात पैसा भरपूर खेळत असल्याने नोकरांचीही कमतरता नव्हती. बस्स?! त्यांच्याकडून काम करून घ्यायचे एवढेच काम निर्मलाबाईच्या वाट्याला होते. पण सुखाचे दिवस येतानाच

व्याधींची मालिका घेऊन येतात. आता नातवंडासंगे त्यांच्या बाललीला पहात, रमत राहण्याचे दिवस असताना निर्मलाबाईंना ब्लडप्रेशर आणि मधुमेह या रोगांनी ग्रासले होते. शहरातील प्रतिष्ठित डॉक्टरां कडून त्यांना औषध गोळ्या चालू होत्या. वरचेवर त्या आपल्या तब्येतीसाठी रक्ताच्या



सर्व टेस्ट करून, शरीराची तपासणी करून घेत. तरीही एकदा लागलेली व्याधी मरेपर्यंत चिकटते हे मात्र तितकेच खरे! दोन्ही सुना आणि घरातील सर्व जण त्या खाण्यापिण्याचे पथ्य नीटपणे सांभाळतात की नाही यावर लक्ष ठेवून असायचे. दोन्ही सुना आणि मुले स्वयंपाकीणकाकूंनी बनवलेला स्वादिष्ट पक्वान्नाचा डबा घेऊन सकाळी बाहेर पडत ते रात्रीच घरी परतत. दिवसभर रघुनाथराव आणि निर्मलाबाईंचेच राज्य असे. दोघेही लंचनंतर थोडावेळ आराम करत आणि झोपाळ्यावर बसून एकमेकांशी हितगुज साधत. कधी वर्तमानपत्रातील बातम्यांवर चर्चा करीत. दोघांचेही वैवाहिक आयुष्य खूपच सुखाचे झाले होते.

पैशांची काही कमी नसल्याने कोणत्याही समारंभाला जाताना निर्मलाबाई सालंकृत होऊनच जात. तसेच त्यांची कपाटे विविध प्रकारच्या रेशमी साड्यांनी खच्चून भरलेली असत. ती कपाटे लावायलादेखील घरात नोकर होते. त्यामुळे निर्मलाबाईंना घरात काहीच काम नसे. जरा आवाज दिला की नोकर हजर होत आणि जे हवे ते आणुन हातात देत. सकाळी मात्र दोघेही आपल्या आरोग्याची काळजी घेत. त्यांच्या फॅमिली डॉक्टरांनी केलेल्या सुचनांनुसार त्यांचा आहार विहार असे. आपल्या बंगल्याच्या सभोवताली दोघे सकाळी फिरायला जात. तेवढेच पाय मोकळे होत आणि कोवळ्या उन्हात फिरताना त्यांना बरे वाटायचे. त्यांना कुठेही फिरायला जायचे असेल

तर बंगल्याच्या पार्किंगमध्येच तीन चार अलिशान गाड्या उभ्या असत. तैनतीला ड्रायव्हरही होते. परंतु रघुनाथराव आणि निर्मलाबाई कारणाशिवाय जास्त फिरत नसत. संध्याकाळी मात्र बंगल्याच्या पाठीमागे असणाऱ्या बागेत दोघेही चालायला जात. तिथे येणाऱ्या समवयस्क लोकांसोबत बाकावर बसून गप्पा मारत. दोघांच्या गोड बोलण्यामुळे त्यांनी अनेक माणसे जोडून ठेवली होती. शनिवार–रविवारी दोन्ही मुले आपापल्या बायका मुलांसोबत बाहेर फिरायला तसेच सिनेमा किंवा हॉटेलला जात. कधी आग्रह केला तर हे दोघेही सोबत जात असत. परंतु जास्तीत जास्त वेळ ते आपला दैनंदिन जीवनक्रम तसाच ठेवत. दुपारी नातवंडे शाळेतून आल्यावर मात्र नोकरांकडून त्यांना गरमागरम जेवण देऊन अभ्यासाला बसवत. कधी कधी हौसेने त्यांना अभ्यासात मदतही करत.



वयाने लहान असणारी नातवंडे कधी कधी हट्ट करत, तेव्हा त्यांच्या खोलीत गोष्टी करत बसत. परंतु त्यांच्या घरात सर्वांना व्यक्तिस्वातंत्र्य होते. नोकरदेखील जुने असल्याने विश्वासू होते. त्यांच्यावर नजर ठेवण्याची गरज नसे. निर्मलाताईंच्या घरी मकरसंक्रांतीचे हळदीकुंकू मात्र फार मोठ्या प्रमाणात होत असे. आजूबाजूच्या परिसरातील सर्व सवाष्णींना त्यांच्या घरी येवून वाण नेण्याची मुभा असे. बंगल्याच्या सभोवार असलेल्या प्रचंड अशा लॉन मध्येच हळदी कुंकवाचा आणि वाण वाटण्याचा मोठा कार्यक्रम होई. सर्व सुवासिनींची ओटी भरली जाई. मकरसंक्रांत जवळ आली की साड्यांच्या मिलचे मालक त्यांच्या घरी येत आणि साड्यांचे गठ्ठे ठेवून जात. मकर संक्रांतीला सर्वांना साड्या देऊन झाल्या तरी रथसप्तमीपर्यंत जितक्या सुवासिनी घरी येतील त्यांना साडीचोळी वाण म्हणून दिली जाई. घरातील सर्व नोकरमंडळी तयारीला असत. त्यामुळे जानेवारी महिन्यात त्यांच्या घरी माणसांची सतत वहिवाट असायची. ज्यांना कळेल ते येऊन साडीचोळीचे वाण लुटून

जात असत. निर्मलाबाई म्हणत, "देवदयेने आपल्याला सर्व काही मिळाले आहे. त्यातील "फुल ना फुलाची पाकळी " समाजातील उच्च, प्रतिष्ठित तसेच तळागाळातील बायकांना वाणं वाटली तर काय बिघडले?" त्यांच्याकडे तसेच घरातील सर्वांकडे सर्व गोष्टींची सुबत्ता होती. कुणाला कशाची काही कमी नव्हती. सुनाही श्रीमंत घरच्या असल्याने बालपणापासून थाटातच वाढलेल्या होत्या. त्यांना कसलीही कमतरता नव्हती. इथेही त्यांना सर्व गोष्टींची सुबत्ता होती. त्यामुळे त्यांची काहीच तक्रार नसे.

या समारंभाला दोघीही सजून नटून तयार होत आणि सासुबाईंच्या या कार्याला योग्य तो प्रतिसाद देत असत. आज मकर संक्रांतीच्या निमित्ताने संध्याकाळी मोठा समारंभ आयोजला होता. दोन्ही सुनांनी ऑफिसमधून सुट्टी घेतली होती. तसेच वाण म्हणून लुटण्याच्या साड्या आधीच आणून घरात ठेवल्या होत्या. हळदी कुंकवाची जय्यत तयारी झाली होती. निर्मलाबाई स्वतः जातीने उभ्या राहून नोकरमंडळींच्याकडून सर्व तयारी करून घेत असत. दिवसेंदिवस वाढणारे वय आणि आजार यामुळे त्यांना ते झेपत नसायचे. तरीही त्यांचा उत्साह कमी होत नव्हता. आज सकाळपासूनच त्यांच्या छातीत दुखत होते परंतु त्यांनी तरीही त्याकडे दुर्लक्ष केले होते. हळदी कुंकवाचा कार्यक्रम आटोपला की डॉक्टरांना घरी बोलावू असे त्यांनी ठरवले होते. आपणाला त्रास होत आहे असे त्यांनी घरात कोणालाही बोलून दाखवले नव्हते. नाहीतर हळदीकुंकू रद्द झाले असते किंवा त्यांना सक्तीने विश्रांती घ्यावी लागली असती. त्यामुळे हळदीकुंकवासाठी आपल्या घरात सुवासिनी आल्यानंतर त्यांना वाण देण्याच्या कार्यक्रमातील आनंदाला त्या मुकल्या असत्या. म्हणून छातीत दुखताना देखील त्या लॉनवरील खुर्चीत येऊन बसल्या होत्या. सर्वांना योग्य त्या सूचना देऊन तयारी नीट झाली की नाही ते पाहत होत्या.

संध्याकाळी दोन्ही सुना आणि नातवंडे तयार होऊन लॉनवर येताच रघुनाथराव आणि निर्मलाबाई यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्हीं सुना आलेल्या सुवासिनींना वाण देणार होत्या. नोकरांनी सर्व जय्यत तयारी केली होती. हा कार्यक्रम आपल्या घरचा समजून आजुबाजुच्या सर्व आयाबाया, मुली मदत करायच्या. निर्मलाबाई यांचा स्वभावच तसा होता. त्यामुळे कशाची उणीव भासू नये याकडे त्यांचा कटाक्ष असायचा. पण

आज दुपारी पुरणपोळीचे जेवण घेतल्यापासून निर्मलाबाईंची तब्येत अजूनच बिघडली होती. अंगात दांडगा उत्साह असल्याने त्यांनी प्रकृतीकडे काहीच लक्ष दिले नाही. सर्व निमंत्रित सुवासिनी बायका येईपर्यंत निर्मलाबाई आणि दोघी सुना तिथे ठेवलेल्या फोमच्या खुर्च्यांवर विराजमान झाल्या. संपूर्ण लॉनभर मांडव घातला होता. आलेल्या सवाष्णींना बसायला खुर्च्या ठेवल्या होत्या. त्यांच्या चहा नाश्त्याची सोय केली होती. सर्व नोकर तैनातीला होतेच. कुणाला काही कमी पडणार नाही याकडे निर्मलाबाईंचे जातीने लक्ष होते. रघुनाथरावांनी या तिघींना पुढे जायला सांगितले होते आणि ते शांतपणे आपली तयारी करू लागले. प्रथम त्यांनी आपला पोषाख चढवला. नातवंडे आपापल्या खोलीत आपापली तयारी करत होती. मकर संक्रांतीच्या हळदीकुंकू म्हणजे सोहळ्याहून काही कमी थाट नव्हता! त्यामुळे सर्व मुलांनी लॉनमध्ये यायचेच हा निर्मलाबाईंचा कटाक्ष असायचा.

त्यांची दोन्ही मुले मात्र अजून कार्यालयातून परतली नव्हती. तसेपण या कार्यक्रमात आपली लुडबूड नको म्हणून दोघे या दिवशी जरा उशीराच घरी परतत. आता कार्यक्रमाला सुरुवात झाली आणि निर्मलाबाईंनी नेहमीप्रमाणे गोड शब्दांत भाषण करून वाण लुटण्यासाठी सर्व सुवासिनींना रांगेतुन येण्यास सांगितले. तर त्यांच्या बाजूला उभे राहून नोकर त्यांच्या हातात साडीचोळी, नारळ देत होते. दोन्ही सुना नाश्ता झाला का पहात मांडवात फिरत होत्या. बायांच्या ओटीत वाण घालत असताना अचानक काही वेळायाच्या आत निर्मलाबाई खाली कोसळल्या. क्षणभर नोकरांनाही काय झाले ते कळालेच नाही. परंतु निर्मलाबाई खाली कोसळताच दोन्हीं सुना पळतच त्यांच्याजवळ आल्या. एकीने त्यांचा श्वास चालु आहे का ते पाहिले तर दुसरीने फॅमिली डॉक्टरांना फोन लावला. एक नोकर रघुनाथरावांना बोलवायला वर पळाला आणि एकाने पाण्याचा ग्लास निर्मलाबाईंच्या ओठांना लावला. पण ते पाणी



पिण्याच्या आतच निर्मलाबाईंनी मान टाकली. मंडपात एकच कल्लोळ सुरू झाला. एवढ्या दानशूर आणि माणुसकीने वागणाऱ्या निर्मलाबाईंना सवाष्णींचे वाण देताना मृत्यू आल्याचे पाहून सर्वजण हळहळू लागले. कोणी म्हणू लागले, "बाई फार भाग्यवान म्हणून असे अहेव मरण लाभले. दुऱ्यांना अखंड सौभाग्य चिंतणारी ही माऊली होती पण देवाने तिच्या आयुष्याचे सोने केले". इतक्यात डॉक्टरही पळत आले. त्यांनी नाडी पाहताच नकारार्थी मान हलवली. सवाष्णीचे वाण देताना सर्व सवाष्णींच्या उपस्थितीतच या सुवासिनीला अहेवमरण आले होते. तिच्या आयुष्याचे सोने झाले होते. इतक्यात दोन्ही मुले तिथे पोहोचली पण त्यांची माऊली स्वर्गस्थ झाली होती. दोघांनी हंबरडा फोडताच मंडपातील साऱ्यांनी डोळ्यांना पदर लावला.आज सर्व सुवासिनींच्या साक्षीने मकरसंक्रांतीचे वाण सुवर्णमय होऊन गेले होते. सती असणाऱ्या निर्मलाबाईंना अहेवपण लाभलं होतं. सर्व स्त्रियांनी त्यांचा मळवट भरून अखेरचे दर्शन घेतले. साडीचोळी लुटायला आलेल्या सुवासिनींनी तिलाच अखंड कुंकवाचं वाण दिलं होतं. निर्मलाबाईंचा मृत्यू सोहळा अविस्मरणीय झाला होता.

वास्तूटीप्स

- लहान मुलांना घराच्या नैऋत्य दिशे मध्ये झोपू नये त्यामुळे त्यांची शैक्षणिक प्रगतीत अडथळे येऊ शकतात.
- घरामध्ये पैसा, संपत्ती, ऐश्वर्य टिकवून राहण्यासाठी घराच्या नैऋत्य दिशेमध्ये तिजोरी किंवा पैशाचे कपाट ठेवावे.
- घरामध्ये शैक्षणिक आर्थिक प्रगती व्हावी यासाठी भडक रंगाचे कपडे वापरणे टाळावे .
- ईशान्य दिशेला वास्तुदोष असेल तर मुलांच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतात
- नवीन घर बांधताना किंवा विकत घेताना घराचा आकार आयताकृती किंवा चौकोनी असावा

शाळा ते शाळाबाह्य

-अस्मिता सावंत

विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याचा महत्त्व प्रकर्षाने जाणवतं. एखादा विद्यार्थी जवळ येऊन आपली अडचण सांगतो, कुणी घरातील समस्यांबाबत शिक्षकांशी निरागसपणे आपले मनोगत व्यक्त करतात.

शाळेचा फळा वाट पाहतोय... शाळेचा वर्ग वाट पाहतोय... शिक्षक मात्र कागदाच्या गर्दीत हरवलाय.... ज्ञानाचा दिवा पेटवणारा हातच थकून गेलाय धड्याची घाई, नोंदणीचा डोंगर रोजचे येणारे आदेशांचे भडीमार मुलांच्या मनात उतरायचं राहून जातं.... अभ्यासक्रमाची पाने मात्र पुढे सरकत राहतात.... खडू हातात आहे पण वेळ नाही शिकवण्याची ओढ आहे पण उसंत नाही... शाळा तर भरते रोज नियमित पण शिक्षण हरवत आहे....

कामाच्या ओझ्याखाली नकळतपणे आजच्या शिक्षकाच्या मनात सुरू असलेल्या प्रश्नाचे प्रतिबिंब म्हणजे ही कविता आहे. मी स्वतः एक शिक्षिका आणि वर्गशिक्षिका म्हणून हा प्रश्न रोज अनुभवते. विद्यार्थ्यांना शिकवायचे आहे, त्यांच्या मनापर्यंत पोहोचायचे आहे, त्यांच्या शंका समजून घ्यायच्या आहेत पण शाळाबाह्य कामाच्या वाढत्या व्यापात विद्यार्थ्यांसाठी हवा असलेला वेळच हातातून निसटत चालला आहे. केवळ मी एक शिक्षिका आहे व मलाच हे प्रश्न भेडसावतात असे नाही तर आजच्या शिक्षण व्यवस्थेसमोर उभा असलेला एक गंभीर प्रश्न आहे.

शिक्षक म्हटलं की डोळ्यासमोर येते ती वर्गात उभी असलेली व्यक्ती. हातात खडू समोर फळा आणि आजूबाजूला बसलेली निरागस मुलं पण आजच्या शिक्षकांच्या जगण्यातलं वास्तव यापेक्षा खूप वेगळं झालं आहे. अध्यापनाबरोबरच विविध ऑनलाईन नोंदी, शासकीय पोर्टल वरील माहिती भरणे, अहवाल तयार करणे, सर्वेक्षणे, विविध योजनांची अंमलबजावणी, प्रशिक्षण, मीटिंग अशा अनेक जबाबदाऱ्या शिक्षकांना पूर्ण कराव्या लागतात. यातील काही काम निश्चितच आवश्यक आहेत. शिक्षण व्यवस्थेच्या

नियोजनासाठी माहितीची गरज असते. शासकीय योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना मिळाला पाहिजे. शाळेच्या कामकाजात पारदर्शकता असणं महत्त्वाचं आहे. मात्र या सर्व कामांचा व्याप इतका वाढतो की मूळ अध्यापनासाठी असलेला वेळ व मानसिक ऊर्जा कमी पडू लागते. कधी एखादा अहवाल तातडीने मागवला जातो. कधी ऑनलाईन माहिती भरण्याची अंतिम मुदत जवळ आलेली असते तर कधी अचानक नवीन कामाची जबाबदारी येते. एक काम पूर्ण होत नाही तर लगेच दुसरं काम समोर उभे राहत. अशावेळी शिक्षकानं नेमकं काय करावं? अशा परिस्थितीत खरंच असह्य होतं. काम करण्याची इच्छा असूनही वेळेच्या मर्यादा आणि सततच्या सूचनांमुळे मनावरती ताण निर्माण होतो. शिक्षक काम चुकार आहे म्हणून नाही तर एकाच वेळी अनेक जबाबदाऱ्या पार पाडताना होणारी ओढाताण समजून घेणे आवश्यक आहे.



शाळा हे केवळ पाठ्यपुस्तक शिकवण्याची जागा नाही. ती मुलांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारी त्यांच्या भाव विश्वाला समजून घेणारी आणि त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणारी विश्वासाची जागा आहे. विशेषतः वर्गशिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नातं हे अत्यंत महत्त्वाचं असतं वर्गशिक्षिका म्हणून मला विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याचा महत्त्व प्रकर्षाने जाणवतं. एखादा विद्यार्थी जवळ येऊन आपली अडचण सांगतो, कुणी घरातील समस्यांबाबत शिक्षकांशी निरागसपणे आपले मनोगत व्यक्त करतात. अशा या छोट्या छोट्या संवादातून मुलांच्या मनाचा ठाव घेता येतो. त्यांच्या वागण्यात झालेला बदल लक्षात येतो एखादा मुल शांत का आहे? एखादा मुल अभ्यासात मागे का पडत आहे? याची कारणं समजून घेता येतात. विद्यार्थ्यांच्या भाव विश्वात डोकावता येते. वर्गशिक्षक म्हणून विद्यार्थ्यांशी असलेल्या नातं मला खूप जवळून अनुभवायला मिळतं. मुलं आपल्याशी केवळ अभ्यासाच्या विषयी बोलत

नाहीत तर घरातील काही समस्या, कुणी मित्रांमध्ये झालेले वाद, कुणी नवीन मैत्रीबद्दल सांगतं. 'मॅडम मधल्या सुट्टीत मला खूप बोलायचं आहे तुमच्याशी...!' असे म्हणून विद्यार्थी शिक्षकांशी विश्वासाने सगळं बोलत असतात पण आज अनेकदा मधल्या सुट्टीत सुद्धा शिक्षकांना वेळ मिळत नाही कधी एखादी नोंद पूर्ण करायची असते. कधी अहवाल पाठवायचा असतो तर कधी दुसऱ्या कामासाठी तयारी करावी लागते. परिणामी मुलांशी सहजपणे होणारा संवाद कमी होत जातो.

मुलांना शिकवण महत्त्वाचा आहेच पण त्यांना समजून घेणे ही तितकच महत्त्वाचा आहे. प्रत्येक मुलाची शिकण्याची गती वेगळी असते. प्रत्येकाची कौटुंबिक पार्श्वभूमी समजून घेण्याची क्षमता आणि भावनिक गरज वेगळी असते . प्रत्येकाची कौटुंबिक पार्श्वभूमी समजून घेण्याची क्षमता आणि भावनिक गरज वेगळी असते या सगळ्याचा विचार करण्यासाठी शिक्षकाला विद्यार्थ्यांसोबत वेळ घालवता आला पाहिजे. शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधलं हे नातं केवळ तासिकेच्या वेळापत्रक बसवता येत नाही त्यासाठी मोकळा वेळ संवाद आणि संवेदनशीलता आवश्यक असते.

शाळांमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करण्यावरती मोठा भर दिला जातो नियोजनानुसार पाठ शिकवले जातात घटक पूर्ण होतात आणि अभ्यासक्रम पुढे सरकत राहतो. मात्र या प्रक्रियेत एक महत्त्वाचा प्रश्न मागे पडतो. मात्र या प्रक्रियेत एक महत्त्वाचा प्रश्न मागे पडतो तो म्हणजे विद्यार्थ्याला खरंच किती समजला आहे अभ्यासक्रम पूर्ण करणं आणि विद्यार्थ्यांचे अध्ययन पूर्ण होणं या दोन वेगवेगळ्या प्रकारच्या बाबी आहेत. एखादा धडा शिकून झाला म्हणजे त्या धड्यातील संकल्पना प्रत्येक विद्यार्थ्याला समजल्या असं होत नाही काही मुलांना लगेच समजतं तर काहींना पुन्हा समजून सांगावं लागतं. काहींना उदाहरणांची गरज असते तर काहींना सरावातून विषय आत्मसात करता येतो. मात्र शिक्षकावरच इतर कामांचा ताण असेल तर उजळणी पुनरावृत्ती सराव आणि वैयक्तिक मार्गदर्शनासाठी पुरेसा वेळ मिळत नाही पुढचा धडा पूर्ण करण्याच्या घाईत मागील धरायची उजळणी अपुरी राहते परिणामी अभ्यासक्रमाचं पान पुढे सरकत पण काही विद्यार्थ्यांच्या मनात संकल्पनांची पायाभरणी अपुरी राहते. याचा परिणाम विद्यार्थ्याच्या गुणवत्तेवरती होतो. परीक्षेत गुण मिळवणं

महत्त्वाचं असतं तरी विषय समजून घेणे, स्वतः विचार करणं, प्रश्न विचारण्याची सवय आणि शिकवलेल्या ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग करणे या गोष्टी सुद्धा अधिक महत्त्वाच्या आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण द्यायचं असेल तर शिक्षकाला शिकवण्यासाठी नव्हे तर शिकवलेलं विद्यार्थ्याला कितपत समजलं हे तपासण्यासाठी वेळ मिळायला हवा. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या गतीनुसार शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे.

शिक्षकालाही स्वतःचा एक वैयक्तिक आयुष्य असतं. त्यालाही भावना आहेतच. कौटुंबिक जबाबदाऱ्या, स्वतःच्या आयुष्यातील अनेक प्रश्न, दिवसभर शाळेतील काम पूर्ण केल्यानंतरही घरी आल्यावर ऑनलाईन नोंदी, अहवाल किंवा दुसऱ्या दिवसाच्या कामाची तयारी अशा सततच्या धावपळीत शिक्षकाला स्वतःसाठी,कुटुंबासाठी आणि मानसिक विश्रांतीसाठी वेळ मिळणं कठीण होतं कामाचा ताण वाढत राहीला की चिडचिड थकवा अस्वस्थता आणि कामाबद्दल उत्साह कमी होण्याची शक्यता निर्माण होते. याचा परिणाम नकळत अध्यापनावरही होऊ शकतो. कारण अध्यापन हे केवळ माहिती देण्याचं काम नाही. त्यासाठी उत्साह, संयम, कल्पकता आणि विद्यार्थ्यांशी भावनिक नातं आवश्यक असतं. शिक्षकाचं मनच सतत तणावाखाली असेल, तर त्याच्याकडून अपेक्षित असलेली सर्जनशीलता आणि संवेदनशीलता टिकवून ठेवणं अवघड होतं.शिक्षकाच्या मानसिक स्वास्थ्याकडे लक्ष देणं म्हणजे केवळ एका कर्मचाऱ्याची काळजी घेणं नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेची काळजी घेणं होय. उपाय केवळ शिक्षकानेच शोधायचे का? या प्रश्नाकडे केवळ तक्रार म्हणून पाहून चालणार नाही. शिक्षणव्यवस्थेतील प्रत्येक घटकाने यावर विचार करण्याची गरज आहे. शिक्षकांची जबाबदारी कमी करावी, असा याचा अर्थ नाही. उलट, शिक्षकाची जबाबदारी अधिक परिणामकारकपणे पार पडावी यासाठी त्याला योग्य वातावरण आणि आवश्यक वेळ उपलब्ध करून द्यावा, हा यामागचा मुख्य विचार आहे. शिक्षणाचा खरा उद्देश केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणं नसून विद्यार्थ्यांच्या मनात ज्ञानाची, विचारांची आणि माणुसकीची ज्योत पेटवणं हा आहे. ही ज्योत तेव्हाच तेजस्वी राहील, जेव्हा ती पेटवणाऱ्या शिक्षकाच्या हातात खडू असेल आणि मनात शिकवण्यासाठी पुरेसा वेळही असेल. शिक्षकाला वेळ द्या, विद्यार्थ्यांना भविष्य द्या!

With best compliments from

Indianewsnet.com™


The News Portal In Cyber World

Chief Editor : Dr. Vilas Pawar

NEWS PORTAL

Marathi & English

HAPPY Diwali



दिवाळी निमित्त
हार्दिक शुभेच्छा!



फेडरेशन ऑफ कमर्शियल प्रिमायसेस ॲन्ड इंडस्ट्रियल इस्टेट को. ऑप. सोसायटी लि. ठाणे डिस्ट्रीक्ट

डॉ.विलास ज.पवार
अध्यक्ष

डॉ. अनिल खडतरे
सचिव



वंदना श्री.काटदरे
खजिनदार



कार्यालय : एम - ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (प.) - ४०० ६०२.
फोन : ०२२-६९३०९१९७
Email: fed.premises@gmail.com

फटफजिती

- भारती सावंत

आईच्या लक्षात येण्यापूर्वीच पाल काढून आपल्या कपाटात ठेवू असे ठरवून तो आईला म्हणाला, "आई कुठे आहे ती पाल? मी तिला ठेचूनच काढतो" असे म्हणत तो स्टूलावर चढून कपाटात पाल शोधू लागला.

कालचीच गोष्ट ! मी मोबाईलवर तंगड्या वर करून मस्तपैकी सर्फिंग करत आरामात सोफ्यावर लोळत होतो. निवृत्त जीवनाचा पुरेपूर आस्वाद घेत मी फोमच्या मऊशार, गुबगुबीत अशा सोफ्यावर बसून अधुनमधून मित्रांनी पाठवलेले खुमासदार, अर्धनग्न ललनांचे फोटो, व्हिडिओ पहाण्याचा लाभ घेत होतो. ऑफिसमधून निवृत्त होऊन चारच महिने झाले होते. सकाळी नऊ ते संध्याकाळी सात अशी गेली चाळीस वर्षे नोकरी करून जीव नुसता शिणुन गेला होता त्यामुळे निवत्तीच्या आधीच रिकाम्या वेळेचा कसा फायदा घ्यायचा, सौ. च्या हातचे गरम चमचमीत खायचे आणि निवांत लोळत पडायचे याची मनाशी आधीच आखणी झाली होती. मोबाईलवर व्हिडिओ, रिल्स पहायचे. मित्रांशी मस्त चॅटींग करायचे, चावट विनोद शेयर करायचे आणि निवृत्तीनंतरचे आयुष्य पेन्शन संपवत मस्त मजेत जगायचे ठरवले होते. सौ. ला देखील आधीच सांगुन ठेवले होते, "अहो गृहमंत्री आम्ही आयुष्यभर खूपच खस्ता खाल्ल्या आहेत. त्यामुळे आता मी माझ्या जीवनाचा खरा आनंद लूटणार आहे" सौ.ने माझ्या जीवनातील चढउतार पाहिले असल्याने ती म्हणालीपण "अहो आयुष्यभर तुम्ही आमच्यासाठी खूप काही केलेत. आता आम्हीं तुमच्यासाठी करणार. तुम्ही फक्त आराम करायचा" मला त्यावेळी माझ्या सौ..चा किती अभिमान वाटला म्हणून सांगु! मी आनंदाने तिचा हात कुरवाळला होता. आज तरी आठवड्यातील हक्काच्या सुट्टीचा वार! चिरंजीवदेखील घरातच होते. आपल्या रूममध्ये बसून मित्रांसोबत फोनवर बोलत काय अकलेचे तारे तोडत होते देव जाणे! मला त्याच्याशी काही देणे घेणे नव्हते. चिरंजीव आय टी कंपनीत


नोकरीला असून लाखोंचे पॅकेज कमवत होते. आम्ही आमची जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडली होती त्यामुळे कुणाच्या कामात उगाचच नाक खूपसायची मला काय गरज ! मी आपला माझा दिवस आनंदात घालवत होतो. तसे अधूनमधून सौ.ला घेऊन सिनेमाला, शॉपिंगला आणि छोट्या ट्रीपला जात होतो. एकूण सगळे बरे चालले होते. जीवनात याच्यापेक्षा सुख आणखी काय असणार बरे!



तर असा मी सुखी प्राणी माझ्या मोबाईलमध्ये डोके खुपसून निवांत पडलो होतो. तितक्यात किचनमधून जोराची किंकाळी ऐकायला आली. पहिल्यांदा मी सोयीस्करपणे तिकडे दुर्लक्ष केले. पण किंकाळी नंतर बायकोच्या विव्हळण्याचा आवाज ऐकू आला. त्या आवाजावरून किचनमध्ये आता काय पहायला मिळणार या भीतीपोटी मी किचनकडे धावलो. पाहतो तर काय! आमची सौ. स्टुलावरून चक्क खाली पडली होती आणि स्टूल तिच्या अंगावर पडला होता. एकूण चित्र पाहता माझ्या तोंडातून हास्याची लहर बाहेर पडली. एवढी खाली पडलेली असतानाही तिच्या नजरेने ती बरोबर हेरली आणि ओरडली, 'हसताय कसले फिदीफिदी, इथे या आणि मला हात द्या' मी देखील थोडा गंभीर चेहरा करून म्हणालो, 'अगं पण असं कसं झालं? तू स्टुलावर चढली होतीस की स्टूल तुझ्यावर? माझ्या शाब्दिक वाग्ड्.बाणांनी ती घायाळ झाली तरीही डाफरत मला म्हणाली, "आधी मला हात देऊन उठवा मग सांगते कोण कोणावर चढले ते. इथे माझे कंबरडे मोडलेय आणि तुम्हाला विनोद कसले सुचतात? " सौ. असे बोलताच मला तिची दया आली. मी तिला वर उठवण्यासाठी हात पुढे केला पण हाय रे दैवा! ती उठण्याऐवजी मीच तिच्या अंगावर ढासळलो. अगाई ग! आई गं! असे किंचाळत ती पुन्हा माझ्यावर खेकसली, तुम्ही कुठल्याच कामाचे नाहीत, एक काम तुम्हाला धड करता येत नाही. मला उठवायचे सोडून तुम्ही आणखी माझ्याच अंगावर काय पडताय? बिनडोक कुठचे! "माझ्या मनात आले घरात राहून फुकटचे खा खा खाऊन ही फुगलीय आणि मलाच दूषण लावतीय पण तिने केलेला अपमान घट्ट गिळून मी मोठ्या ताकदीने

जोर लावला आणि तिला बसती केली. इतक्यात चिरंजीव बाहेरून टवाळकी करून घरात शिरले आणि मोबाईलमध्ये आमचा फोटो घेत बोलले, काय आई बाबा, या वयात साल्सा डान्स करताय की काय?"

चिरंजीवांनी अकलेचे तारे तोडल्याचे ऐकून सौ.च्या रागाने परिसीमा गाठली. ती चिरंजीवांकडे वळून म्हणाली, "मेल्या दिवसभर गावात उंडारत बसतोस. कुठले काम नाही की धंदा आणि आई वडीलांची चेष्टा सुचते काय तुला?" झालेला प्रकार चिरंजीवांच्या लक्षात आल्यावर चेहऱ्यावरील हसू दाबत तो आईजवळ गेला आणि म्हणाला, "काय झाले आई? तुला फार लागले तर नाही ना? काय करत होतीस वर चढून? " तशी सौ. फिस्कारली, "काल्ट्या काल बोललास ना पापड खायचेत तुला म्हणून स्टूलावर चढून वरच्या डब्यातले पापड काढत होते तर शेल्फमधली पालच अंगावर पडली त्यामुळे माझा तोल गेला आणि मी स्टूलावरून खाली पडले. अगाई गं! कंबरडे चांगलेच शेकून निघालेय" आईकडून पाल पडल्याचे ऐकताच चिरंजीव चाकटले कारण काल आईने त्याला पॉकेटमनी न देण्यासाठी बाबांना सक्त ताकीद दिली होती. या गोष्टीचा राग येऊन चिरंजीवांनी आईला घाबरवण्यासाठी वरच्या शेल्फमध्ये नकली पाल आणुन ठेवली होती. आई लगेचच त्या शेल्फकडे जाईल असे त्याला वाटले नव्हते. तो सहज आईची गंमत करायला गेला आणि आज आईला स्टूलावरून खाली पडून मुका




मार बसला. आता आईला आपणच खोटी पाल ठेवली आहे हे समजले तर खैर नाही हे त्याच्या लक्षात आले.

आईच्या लक्षात येण्यापूर्वीच पाल काढून आपल्या कपाटात ठेवू असे ठरवून तो आईला म्हणाला, "आई कुठे आहे ती पाल? मी तिला ठेचूनच काढतो" असे म्हणत तो स्टूलावर चढून कपाटात पाल शोधू लागला. तशी आई अजून जोरात किंचाळली, "अरे मेल्या, ती पाल अजून

काय तिथेच रहाणार का मी तिथे गेल्यावर? पळाली असेल एव्हाना. आता कशाला मारतोस? मला दोघांनी धरून बेडरूमपर्यंत न्या आणि गाडी काढून डॉक्टरकडे न्या. पालीला मारतोय वीर पुत्र". आता सौ. ला डॉक्टरकडे घेऊन जायचे म्हणजे आपल्या खिशाला मोठाच खड्डा पडणार या कल्पनेनेच माझ्या अंगात लगेच ताप भरला. उसने अवसान आणून मी म्हणालो, "अगं आजचा दिवस बघूया लगेच डॉक्टरकडे जायची घाई कशाला? तुझी कंबर दुखते का ते! कुठे मुका मार लागलाय का ते पण एक दोन दिवस पाहू नि मग डॉक्टरकडे जाऊ" तशी कंबर दुखावलेली असूनही सौ. तारस्वरात केकटली, "माझी कंबर मोडलीय, मला हलवायला पण येईना आणि दोन दिवस कसली वाट पहाताय? मुकाट्याने कपडे चढवा आणि गाडी काढून दोघेही आधी हॉस्पिटलमध्ये चला". सौ च्या या हुकमतीच्या आवाजाने आम्हा पितापुत्रांची दातखिळीच बसली. फाशी द्यायला चाललेल्या कैद्याप्रमाणे आम्ही दोघे निमूटपणे कपडे घालू लागलो. आता आईची तब्येत ठिक होईपर्यंत घरातली आणि बाजारची सर्व कामं आमच्या दोघांनाच करावी लागणार असा अभद्र विचार मनात येऊन आईला जास्त काही झालेलं नसावं असे मनोमन देवाला विनवत चिरंजीव पार्किंगमधून गाडी काढायला बेसमेंटला गेले आणि अस्मादिकांनी आपल्या काडीसारख्या हातांनी सौ. च्या हाताला धरून तिचा देह पेलवत लिफ्टमधून हळूहळू खाली आणले. खाली दोघांनी मिळून तिला गाडीत मागच्या सीटवर बसवले आणि येणाऱ्या हसण्यावर नियंत्रण ठेवत तोंडाने उगाचच चुकचूकत हॉस्पिटलच्या वाटेने चालू पडलो. चिरंजीव मात्र उगाचच आईची चेष्टा करायला गेलो म्हणून मनातल्या मनात पश्चात्तापाने पोळू लागले.

चारोळ्या

दुनियेचं हसू होईल
अन् इज्जतीचा पंचनामा
'समजून घेऊ' जग म्हणतं
अन् पडद्याआडून जाहीरनामा!



इथं कुणी कुणाची निंदा करते
स्तुती मात्र क्वचित
तिरस्काराने एकमेकांच्या
संपली माणुसकीही निश्चित

- निशा शिंदे

With best compliments from

K H construction



With best compliments from

ASHTASIDDHI

DEVCON PVT. LTD.

CONSTRUCTION | DEVELOPERS | INTERIOR DESIGNERS

AAKASH ANANT MULEY
DIRECTOR


Mob. 8097739935
Gmail- ashtasiddhidevcon@gmail.com
web- www.ashtasiddhidevcon.com
add: 114, Mahalaxmi Square, Tata Power, Dombivali East- 421203

With best compliments from

Dhruv Bhatt

Mansarovar Cad Engineering LLP





With best compliment from




SAKET

infra



With best compliment from





Jaihind

constructions









काव्यसृष्टी

सातबारा

तो सातबारा पिढ्यानपिढ्यांचा
नावे चढवत उतरवत होता
तो कुळाचा पुरावा होताच
पण नात्यांत दुरावाही होता

स्वार्थासाठी झाले भाऊ वायले
बाप गेला ढगाआड
रक्ताच्या नात्याला कळ नाही आली
नात्यांत कागद आला आड

तूझ माझं करता करता
शेवटी मधी आला बांध
बहिणीला म्हंटले जा सही देऊन
सुखरूप तुझ्याघरी नांद

गाव चावडीवरती चर्चा चालू
दस्तऐवज विषय महसूलात
पोरांसाठी केलं रक्ताच पाणी
त्या कष्टाला ओढलं कोर्टात

येताना एकटे आलो
जाताना एकटे जाणार
या शरीरावरच हक्क नाही
तर सातबारावर कसा राहणार

मला जास्त तुला कमी
कष्टाची नका करू विभागणी
एकाच बापाची लेकरे सारी
मिळूनी सारे घालू मातीला खतपाणी

सातबारा म्हणे.....
तुझ्या बापाच्या कष्टाचा मी पावती
माझ्यावर ओढले तुझ्या पूर्वजांची प्रिती
आयत्या पिठावर रेघोट्या ओढणारे तुम्ही
कागदासाठी नका संपवू नाती गोती

-निशा खरात/शिंदे

बायको का रुसली?

एक दिवस बायको रुसली, कोपऱ्यात बसली
विनोद सांगूनही, नाही ती हसली
कान पकडून माझे, मी म्हणालो, "सॉरी"
पण काही केल्या ती नाही बधली
सांग ना प्रिये, माझी काय चूक झाली
म्हणून तू अशी फुरंगटून आहे बसली
नाकाचा शेंडा उडवून बायको. मग म्हणाली
अहो असे कसे तुम्ही, तुम्हाला माझी नाराजी नाही . का कळली
अहो, मला कबूल करूनही तुम्ही आईला नाही आणली
किती दिवस झाले मी तिला नाही बघितली
तुम्हाला, माय–लेकीच्या प्रेमाची किंमत नाही का कळली
का तुम्हाला तुमच्या सासूची आठवण नाही झाली
अग, कामाच्या गडबडीत माझी चूक झाली
तूला कबूल करूनही ही गोष्ट राहून गेली
पण प्रिये, माफ कर ना मला हया वेळी
उद्या आपण दोघे जाऊन आईला सन्मानाने आणू आपल्या घरी
रुसलेली बायको, हसत माझ्याजवळ आली
हसत–हसत, तिने मला प्रेमाने मिठी मारली
तुम्ही खूप चांगले आहात ती म्हणाली
आणि बायकोचा रुसवा घालवण्यात माझी युक्ती कामाला आली

- सुरेश देहरकर

तू स्तब्ध रहा

स्तब्ध रहा तू स्तब्ध रहा
सभोवतालचे वातावरण पाहुनी
तू स्तब्ध रहा
मनातच ठेव तू दुःख तुझे
सांगू नकोस या जगाला
कारण ,
रामकृष्णही याच भूमीत अवतरूणी गेले
मानवाला काहीतरी शिकवूनी
बुद्धांनीही सोडले घरदार स्वतःचे
कारण दुःख पाहवत नव्हते त्यांना जगाचे
वीर नेते ही स्वातंत्र्य देऊनी गेले
हळहळ करण्या व्यतिरिक्त माणसाने काही ना केले
म्हणूनच म्हणते,
तू स्तब्ध रहा, तू स्तब्ध रहा !
सभोवतालचे वातावरण पाहुनी
तू स्तब्ध रहा!

- प्रज्ञा शैलेश आवटी

आरसा

चकचकीत अशा पृष्ठभागावर
प्रकाश किरण करिता नर्तन
आभासी प्रतिमा दिसते सुंदर
आरसा म्हणती त्यास सर्वजन

प्रत्यक्षाहून भासे प्रतिमा सुंदर
आरसा करी असे जादू मंतर
आधी प्रतिमा मग चेहरा नंतर
वेड लावी हा सर्वांस बिलंदर

मित्र जगताचा असे आरसा
खरंच बोलणं त्याचा वारसा
मानव दानव वा असे भगवंत
सर्वांवर त्याचे उपकार अनंत

सुमंत पुरवी हट्ट श्रीरामाचा
आणी चंद्र ऐन्यात नभीचा
शिवशंकर करी उमेस अर्पण
अद्भुत अशी भेट 'मणीदर्पण'

पाहिल्याविना रोज दर्पणी
असेल का मानवजात कुणी
आरशाविना ना साजशृंगार
सौंदर्यसुंदरी होतील बेकार

धातू काच आणि जलदर्पण
सर्वांहून सुंदर परि मनदर्पण
अधम चांगली सर्वच करणी
जनास दावी तो अंत:करणी

आरसा महात्म्य असे अनंत
त्याविन जगणे कुणा पसंत!
सकाळ झाली आरशात बघू
झटपट उरकून कामास निघू

–प्रा.अरुण सु.पाटील

उभा ग कृष्ण मुरारी

पाऊस आला चिखल झाला, रिमझिम येती सरी
वाट पहातील घरात माझ्या, कशी जाऊ मी घरी
वाटे मधे उभा ग , कृष्ण मुरारी!!धु!!
आज बाजारी आले होते बाई,!
दही दुध ही विकले नाही !!
या या पावसान केला सारा घात!
नाही गिर्हाईक उभ्या बाजारात!!
रिपरिप त्याची नाही थांबली!
पडल्या सरीवर सरी! वाटेमधे उभा ग कृष्ण मुरारी!!१!!
वेडीवाकडी बाजाराची वाट !
आडवळणीच आहे पायवाट !!
अधुन मधुन येती सरवाट!
वेळ झालीया पडेल किनट!!
दाट धुके नी रात काळोखी !
भीती दाटली ऊरी!वाटेमधे उभा ग कृष्ण मुरारी!!२!!
कृष्ण सावळा गोकुळात राजा !
गोप गड्यासह बासरी नी बाजा !!
राधा गौळणी करू आम्ही पुजा!
होईल गोकुळात गाजा नी वाजा !!
भर रस्त्यावर उभा राहीला!
कृष्ण सखा गीरीधारी, वाटेमधे उभा ग कृष्ण मुरारी!!३!!

जाते माघारी बाजार सरला!
या गोपीनु जाऊ आम्ही घरला !!
दुधा तुपाचा हंडा नाही सरला!
तोल कुणाचा नाही का सावरला!!
कवी संतराम कवन करतो,!
लेखणी शस्त्र दुधारी , वाटेमधे उभा ग कृष्ण मुरारी!!४!!

-संतराम नाना पाटील

वास्तुटीप्स

घराच्या मुख्य दरवाज्याचेही काही नियम आहेत.

१)घराच्या मुख्य दरवाज्यासमोर रस्ता नसावा. दरवाज्यासमोर रस्ता असल्यास आपल्या विकासात वाधा येते.

२)दरवाज्यासमोर मोठे झाड असल्याने घरातील मुले नेहमी आजारी पडतात.

३)दरवाज्यासमोर नेहमी पाणी वाहते ठेवल्याने नेहमी आर्थिक नुकसान होत असते.

४)दरवाज्यासमोर मंदिर असेल तर घरात कधीच सुख नांदत नाही.

५)घराच्या मुख्य प्रवेशव्दारासमोर स्तंभ (खांब) असतील तर त्या घरातील महिला नेहमी आजारी पडतात.

६)जमिनीच्या तुलनेत घराचा दरवाजा खोलगट भागात असेल तर घरातील मुख्य पुरुष व्यसनाधीन व नेहमी दु:खात वुडालेला असतो.

७) घरासमोर रस्ता, मंदिर असेल तर घरासमोर अधिक जागा सोडल्याने दोष नाहीसे होतात.

८)घराचे मुख्य प्रवेशव्दार घरातील इतर दरवाज्यांपेक्षा मोठे असावे.

पाऊसधारा

ढगांनाही कळू लागले
पुढे-पुढे आज सरकायला हवे,
काळेभोर रूप दाखवून
रिमझिम सरींनी बरसायला हवे.

पाऊसधारा बरसू लागता
गारवा पसरला सर्व ठिकाणी,
गरमागरम चहा-भजींसह
आस्वाद घेतला प्रत्येकांनी.

शहरातील रस्ते, गावच्या वाटा
ओल्याचिंब न्हाऊन निघाल्या,
चातकाने जलाचा घोट घेता
कोकीळा स्वरांत गाऊ लागल्या.

हिरवळ आता बहरून आली
शुभ्र धुक्याची चादर पसरली,
निसर्गाचे हे रम्य रूप पाहता
धरतीवरील सारी चिंता विसरली.

उंच डोंगर, हिरव्या टेकड्यांवरून
फेसाळ धबधबे वाहू लागले,
भटकंती करणारे वाटसरू आता
कुतूहलाने ते न्याहाळू लागले.

जीवनातील हा अद्भुत अनुभव
खूप काही शिकवून जातो,
'झाडे लावा, पर्यावरण वाचवा
सामाजिक संदेश देऊन जातो.

-भूषण सहदेव तांबे

विनोद

बाबा: तू वर्षभर अभ्यास करत नाहीस आणि परीक्षा जवळ आली की पुस्तकं उघडून बसतोस!

मन्या: बाबा, शांत समुद्रात नाव वल्हवायला कुणालाही आवडतं.... खरी मजा तर समुद्र खवळलेला असताना नाव वल्हवण्यातच आहे!



टीप्स

घराजवळ मोठे झाड लावू नये

दक्षिण दिशेचे स्वामी मंगळ आहे आणि या दिशेचे देवता यम आहेत. जर तुमचा मंगळ शुभ नसेल तर ही दिशा सतत घरामध्ये कोर्टातील अडचणी, राग आणि अन्य गोष्टींचे कारण ठरते. त्यामुळे अशा दिशेमध्ये वास्तुदोष असेल तर त्रिकोणी झेंडा लावा आणि घराच्या समोर तुटलेले कोणतेही सामान ठेवू नका. तसंच मुख्य दरवाजाजवळ कधीही कोणतेही मोठे झाड लावण्याची चूक करू नका. असं केल्यामुळे घरातील शांतता खराब होते आणि घरात सतत अशांतता राहाते.

मुख्य दरवाजाजवळ मोठा घळ पाणी भरून ठेवा

पश्चिम दिशेचा स्वामी हा चंद्र आहे. या दिशेचा वायू हा देव आहे. वास्तुशास्त्रानुसार, चंद्र चांगला असेल तर घरात शांतता आणि सुखशांतता लाभते. तर चंद्र अशुभ असल्यास, व्यक्ती चंचल असतात आणि त्यामुळे योग्य काम होत नाही. अशा परिस्थितीत घरात नेहमी एक मोठी बादली अथवा भांडे पाण्याने भरा आणि त्यात सुगंधित फूल कायम ठेवा. रोज हे फूल बदलत राहा. असं केल्यामुळे घरात शांतता नांदते.

घराचे दार दक्षिणमुखी नसावे

आपण बऱ्याचदा ही गोष्ट ऐकतो; पण याचं नक्की कारण काय हे आपल्याला माहीत नसतं. खरं तर हिंदू संस्कृतीनुसार मृत व्यक्तीचे पाय हे दक्षिण दिशेला करून ठेवले जातात. त्यामुळे दक्षिण बाजूला नकारात्मक ऊर्जा असते असं म्हटलं जातं. म्हणूनच कोणत्याही घराचं दार हे दक्षिणमुखी नसावं असंही सांगण्यात येतं. जर तुमचं दार दक्षिण बाजूला असेल तर त्याला पर्याय म्हणून तुम्ही त्याच दाराच्या समोर मोठा आरसा लावू शकता. ज्यामुळे घरात नकारात्मक ऊर्जा प्रवेश करू शकणार नाही.

पाककृती

फ्लॉवर बटाटा फ्राय भाजी




साहित्यः १/२ किलो फ्लावर,२ मध्यम बटाटे,२ टोमॅटो,२ टीस्पून तिखट कमी जास्त आवडीनुसार, २ टीस्पून धने पावडर, १ टीस्पून साखर, मीठ चवीनुसार,कोथिंबीर बारीक चिरलेली,१ टीस्पून आल्याचे तुकडे, चार–पाच कढीपत्त्याची पाने,फोडणी करता तेल, मोहरी, जीरे,हिंग, हळद.

कृतीः प्रथम फ्लॉवर स्वच्छ धुऊन त्याचे मध्यम आकाराची फुले किंवा तुरे कादून घ्या. तसेच बटाटा आणि टोमॅटोच्या मध्यम फोडी करून घ्या.आले,कोथिंबीर बारीक चिरून घ्या. आता एका कढईमध्ये तेल घालून ते तापले की त्यात मोहरी, जीरे, हिंग, हळद घालून खमंग फोडणी करा. आता त्यामध्ये आल्याचे तुकडे, कढीपत्ता व थोडी कोथिंबीर घालून व्यवस्थित परतून घ्या. नंतर त्यामध्ये बटाट्याच्या फोडी घालून त्या सोनेरी रंगावर परतून घ्या आणि नंतरच टोमॅटो घालून टोमॅटो पूर्ण शिजवून घ्या.आता टोमॅटो शिजले की यामध्ये तिखट आणि धने पावडर घाला आणि छान पैकी परतून घ्या. नंतर यामध्ये साखर,मीठ घालून पुन्हा व्यवस्थित परतून घ्या आणि मग फ्लॉवरचे तुरे घालून भाजी परत व्यवस्थित परतून घ्या नंतर भाजीवर पाण्याचा हबका मारून झाकण ठेवून मंद आचेवर भाजी पूर्णपणे शिजवून घ्या. वरून भरपूर बारीक चिरलेली कोथिंबीर घाला. तयार झाली आपली खमंग फ्लॉवर बटाटा फ्राय भाजी. भात पोळी बरोबर ही गरमागरम भाजी सर्व्ह करा.

॥शुभ दिवाळी॥

बटाटा-बेसन शेव



साहित्य: ३ वाटी बेसन, ३ उकडलेले बटाटा १, १/२ चम्मच तिखट, मीठ चवीनुसार, पिचं आफ हींग, १/३ टी स्पून खायचा सोडा, १ टीस्पून हळद, १ टी स्पून ओवा, तलवणने साठी तेल,


कृती: एका पातेल्यात उकडलेले बटाटे मॅश करून घ्यावे व बेसन घालून त्यात चवीनुसार मीठ, तिखट, ओवा, हींग, हळद घालून एकत्र करून घ्यावे व पाणी घालून भिजवावे, पीठ जास्त घट्ट हि नको आणि पातळही नको, मिडियम भिजवावे म्हणजे शेव हलकी आणि खुसखुशीत होतात व नंतर शेव च्या साच्यात भिजवलेले बेसन-बटाटा चे पिठ चमच्याने भरून घ्यावे व नंतर मंद आचेवर लगेच गरमागरम तेलात शेव पिळून घ्यावीनंतर दोन्ही साईड ने आलटून पालटून खरपुस तळून घ्यावेअश्या प्रकारे आपली खुसखुशीत बेसन-बटाटा शेव तयार.

क्रिस्पी कारले भजी

साहित्य: १/४ किलो कारलं, ३ चमचे बेसन, २ चमचे कॉर्नफ्लॉवर, १ चमचा मैदा, १ चमचा मसाला, १ चमचा हळद, १/२ चमचा चाट मसाला, १ चमचा साखर, १ चमचा तीळ, सात-आठ लसणाच्या पाकळ्या, १ चमचा लिंबूचा रस, चवीप्रमाणे मीठ तळण्यासाठी तेल.

कृती : प्रथम कारले स्वच्छ धुऊन त्याचे फिंगर्स सारखे पातळ तुकडे करून घेणे व त्यात थोडे मीठ घालून पाच मिनिटे ठेवावे व नंतर स्वच्छ धुऊन त्यात बेसन, कॉर्नफ्लॉवर, मैदा, मसाला, मीठ, हळद, तीळ, लसणाचे बारीक काप, चाट मसाला, मैदा, साखर सर्व घालून एकजीव करून घेणे गॅसवर तेलाची कढई ठेवून मिक्स केलेले कारले थोडं मोकळं करून टाकावे. मध्यम आचेवर क्रिस्पी होईपर्यंत तळून घेणे कुरकुरीत कारल खाण्यास तयार.

कारल्याची आंबटगोड भाजी



साहित्य: २५० ग्रॉम कार्ली, १/२ टेबलस्पून चिंच कोळ, टेबलस्पून गुळ, १/२ टिस्पून तिखट, १टिस्पून जीरे पावडर, १ टिस्पून गरम मसाला, ८-१० लसूण पाकळ्या, १ १/२ टेबलस्पून तेल, १/२ टिस्पून मोहरी, १/२ टिस्पून हळद, १/४ टिस्पून हिंग, मीठ चवीनुसार.


कृती: प्रथम कारली स्वच्छ धुऊन त्याची साल काढून फोडी करून घेतल्या. त्यांना मीठ चोळून पाच-सात मिनिट ठेवून दिले. मग पाण्याने स्वच्छ धुऊन टाकले.आता गॅसवर कढई मध्ये तेल गरम करून त्यात मोहरी, हिंग, हळद यांची फोडणी करून ठेचलेला लसूण घालून परतले. मग त्यात कारल्याच्या फोडी घातल्या व चार पाच मिनिट वाफवून घेतले.आता एका डिशमध्ये दाण्याचे कूट, तिखट, मीठ, गरम मसाला, धने जिरेपूड हे सर्व काढून घेतले. मग ते वरील भाजीत घालून मिक्स केले.मसाला परतून झाल्यावर त्यात गरम पाणी घातले. व उकळी आल्यावर गुळ व चिंचेचा कोळ घालून भाजी शिजवून घेतली.तयार झालेली कारल्याची आंबट गोड भाजी बाऊलमध्ये काढून सर्व्ह केली. ही भाजी छान टेस्टी होते.

खजूर-मस्क मेलन ज्युस

साहित्य: १/२ टरबूज/खरबूज/मस्क मेलन, ६ खजूर.

कृती : प्रथम सर्व साहित्य एकत्र करून घ्या मग टरबूज कापून आतील बिया काढून टाकून साल सोडून बाकी टरबूज चे तुकडे करून घ्या ते तुकडे मिक्सर जार मध्ये घेऊन बारीक करून घ्या मग त्यात खजूर बिया काढून घाला व पुन्हा मिक्सरमध्ये फिरवून घ्यामग तयार झाले आपले खजूर मस्क मेलन ज्युस, खजूर घटलेमुळे वरून साखर घालनेची आवश्यकता नाही,ज्युस सर्व्ह करताना त्यात बर्फ तुकडे घाला व वरून सजावटीसाठी कोणतेही ड्राय फ्रूट तुम्ही वापरू शकता,मी अक्रोड व गुजबेरी चा वापर केला आहे

मेथी–पनीर पराठा




साहित्यः स्टफिंगसाठी लागणारे साहित्य- २ टेस्पून तेल, १/२ टीस्पून जीरे, १ वाटी मध्यम आकाराचा बारीक चिरलेला कांदा, १ टेस्पून बारीक चिरलेली लसुण पाकळी, १ बारीक चिरलेली हिरवी मिरची, १ कप मेथीची पाने, १/२ टीस्पून हळद, १ टेस्पून तिखट, १/२ टीस्पून किचन किंग मसाला, १/२ टीस्पून गरम मसाला, १ कप किसलेले पनीर, चवीनुसार मीठ.

पराठा बनविण्यासाठी लागणारे साहित्य- १ कप कणिक, १ टीस्पून जीरे, चवीनुसार मीठ, १ टेस्पून तेल, थोडेसे पाणी.

कृतीः सर्व प्रथम कणकेमध्ये जीरे, तेल, चवीपुरते मीठ आणि थोडे पाणी घालून पराठ्यासाठी कणिक मळून घ्यावी आणि ५ ते १० मिनिटे मुरण्यासाठी बाजूला ठेवावी. आता गॅसवर मध्यम आचेवर कढई ठेवून त्यात तेल घालावे. तेल गरम झाले की त्यात जीरे घालावे. जीरे तडतडल्यावर त्यात बारीक चिरलेला कांदा घालून गुलाबी होईपर्यंत २ मिनिटे परतून घ्यावा. त्यानंतर त्यात बारीक चिरलेला लसूण घालावे.आता त्यात हिरवी मिरची आणि स्वच्छ धुतलेली मेथीचे पाने घालून दोन ते तीन मिनिटे भाजी परतून घ्यावी.आता त्यात हळद, तिखट, किचन किंग मसाला आणि गरम मसाला घालून सर्व साहित्य व्यवस्थित मिक्स करून घ्यावे आणि गॅस बंद करून घ्यावे. (किसलेले पनीर घालण्याआधी गॅस बंद करून घ्यावा, जेणेकरून पनीर जळणार नाही.)आता त्यात किसलेले पनीर आणि चवीनुसार मीठ घालून मिक्स करून घ्यावे. आपले स्टफिंग चे सारण तयार आहे.आता मळलेल्या कणकेची छोटी पोळी लाटून त्यात हे स्टफिंगचे सारण मधोमध भरून पोळीची किनार सर्व बाजूंनी दुमडून व्यवस्थित बंद करून घ्यावी.त्याला थोडी कणिक लावून पोळी लाटून घ्यावी. गॅसवर मध्यम आचेवर तवा ठेवून त्यावर पोळीला दोन्ही बाजूंनी तेल लावून खरपूस भाजून घ्यावी.पराठ्याचे मधोमध कट करून चार भाग करून घ्यावे आणि सर्व्हिंग डिश मध्ये काढून गरमागरम पराठा सर्व्ह करावा.

स्टीम कोबी वडी



साहित्यः १२५ ग्राम कोबी (किसलेला), २०० ग्राम बेसन, २–३ टीस्पून तांदूळ पिठ, १ टीस्पून हळद, २ टीस्पून लाल तिखट, १ टेबलस्पून आलं लसूण पेस्ट, ५-६ कोथिंबीर पाने, १–२ टीस्पून तीळ, चवीनुसार मीठ.

कृतीः किसलेल्या कोबी मध्ये चिरलेली कोथिंबीर, आलं लसूण पेस्ट, हळद आणि लाल तिखट घालावे. बेसन आणि तांदूळ पिठ घालून मिक्स करावे. ह्यात मीठ आणि तीळ घालून चमच्याने मिक्स करावे. (तूम्ही ही स्टीमर किंवा कुकर मध्येही बनवू शकता.) भांड्याला ब्रशने तेल लावावे आणि त्यात कोबीचे मिश्रण घालून पसरवून घ्यावे. वरून तीळ घालून १५–२० मिनिटे स्टीम करावे किंवा कुकर मध्ये ३ शीट्या द्याव्यात. थंड झाल्यावर कट करून घ्याव्यात. एका पॅनमध्ये २–३ टीस्पून तेल गरम करून त्यात वडे दोन्ही बाजूंनी तांबूस शॅलो फ्राय करून घ्यावेत. कोबीची वडी तयार! टोमॅटो केचप सोबत सर्व्ह करा!

डाळींब बिट पौष्टिक रस



साहित्यः १ मोठे डाळींब, १ मध्यम आकाराचे बिट, चिमूटभर जीरे पूड, चवीनुसार काळे मीठ.

कृतीः मुठभर पुदिन्याची पाने स्वच्छ धुवूनडाळींब सोलून दाणे काढून घ्या. बिट स्वच्छ धुवून, साले काढून तुकडे करून घ्यावे. मिक्सरच्या भांड्यात डाळींब दाणे, बिटचे तुकडे, काळे मीठ, जीरे पूड, पुदिन्याची पाने आणि एक ग्लास पाणी घालून बारीक करून घ्या. मिश्रण गाळून दोन ग्लास मध्ये भरून सर्व्ह करा. आवडत असल्यास गार करून द्या.

क्रिस्पी मेथी मुठीया



साहित्यः २ मोठ्या जुडी बारीक मेथी,१ चमचा मीठ, १/२ चमचा हळद, १ चमचा धने पावडर,१ चमचा जिरे पावडर,१ चमचा साखर, २ चमचे तीळ, २ चमचे आलं मिरची लसूण पेस्ट, २ चमचे दही, १ चमचा चाट मसाला, १ पळी तेल, १/२ लिंबाचा रस, १ चमचा ओवा,१ वाटी बेसन, १ वाटी तांदळाचे पीठ, १ वाटी गव्हाचे पीठ, तळण्यासाठी तेल.

कृतीः प्रथम मेथी कापून स्वच्छ धुऊन घ्यावी. पाणी निघून गेल्यावर एका पातेल्यात घेऊन त्यात आलं मिरची लसूण पेस्ट, हळद, साखर,दही, धणे पावडर, जिरे पावडर, मसाला, चाट मसाला, साखर, लिंबाचा रस,ओवा घालुन एकजीव करावे. नंतर त्यात गव्हाचे,तांदळाचे व बेसन सम प्रमाणात घालून चांगले एकजीव करून घ्यावे पाणी लागल तरच घ्यावे. गोळा तयार झाल्यावर त्याचे छोटे तुकडे करावे. पिठाच्या गोळ्या हाताने थोडा लांबट आकर देउन सगळे तयार करुन घ्यावे गॅसवर कढई ठेवून मंद आचेवर खरपूस तळून घ्यावे खाण्यास तयार.

बहुगुणी दुधी ज्यूस

साहित्यः १ मध्यम आकाराचा दुधी, १/२ चमचा काळे मीठ, १/२ लिंबाचा रस.

कृतीः प्रथम दुधी किसणीने किसून घ्यावा व त्यात मीठ घालून पाच मिनिटे ठेवून द्यावे म्हणजे रस भरपूर निघतो पाच मिनिटानंतर तो हाताने किंवा एका पातळ कपड्यांमध्ये घेऊन पिळून काढावा. ज्यूस पिळून काढल्यावर तो गाळणीने गाळून घ्यावा व नंतर त्यात अर्धा लिंबू पिऊन सर्व्ह करण्यास तयार.



With best compliments from

Sai Siddhanath Construction

(Govt. Regd. Contractor)



Head Office: 602, Damodar Apt., Behind Ashok Talkies, Near Datta Mandir, Thane (W)-400 602 Office Phone: 8879003120/8108103204/8879003111 | Fax: 022 25386073 E-mail: saisiddhanath@yahoo.co.in

With best compliments from

DILESH SANKHE



Contractor
PWD
Palghar

HAPPY Diwali

दिवाळी निमित्त हार्दिक शुभेच्छा!



स्वामी कृपा एंटरप्राइजेस

मुरबाड, शहापूर आणि ठाणे जिल्ह्यातील जमीन खरेदी आणि विक्री
तसेच डेव्हलप करणे, कन्स्ट्रक्शन, स्विमिंग पूल व गार्डन करणे
सगळी कामे खात्रीशीर आणि प्रमाणिकपणे करुन मिळतील.

२० वर्ष कामाचा अनुभव
मो.९०७६१ १९९११

SAI SANTOSHI
ENTERPRISES

विश्वास हीच परंपरा
नाविन्य हेच वैशिष्ट्य

खाजगी वने आणि आदिवासी जमिनी हस्तांतरण याबाबत मार्गदर्शन.
शेतकरी बनण्यासाठी नियमानुसार कागदपत्रांची पूर्तता करून देण्यासाठी खात्रीशीर...